REGISTERED NO 5, 1875

# वऱ्हाडसमाचार.

पुस्तक ९ अकोला. रविवार ता० ४ माहे एप्रेल सन १८७५ इ० अंक १४

## जाहिरात.

### वऱ्हाडसमाचाराचीकिंमत.

| | रु. |
|---|---|
| वर्षाचे अगाऊ | ५ |
| सालअखेर | ७ |
| फुटकळ अंकास | ०४ |
| डांकहशील | |
| वर्षाचे अगाऊ | १०८ |
| " अखेर | २ |

नवीन वर्गणीदार होऊ इच्छिणारे लोकांकडून आगाऊ वर्गणी आल्या खेरीज पत्र सुरू केलें जाणार नाहीं

### नोटिसीबद्दल.

| | |
|---|---|
| मराठी, दर ओळीस | ०१०६ |
| तीच नोटिस दुसरे खेपेस | ०१ |
| इंग्लिश लिपींत दर ओळीस | ०४ |
| " दुसरे खेपेस | ०२ |

## जाहिरखबर.

### चाळीस रुपयांचें बक्षीस.

तारीख १८ व २० माहे मार्चचे दरम्यान एक नोट शंभररुपयांची ज्यावर नंवर $\frac{K}{4}$ १४०१७ आहे ती चोरीस गेली आहे. जो कोणी अशी बातमी देईल कीं, त्याजवरून चोर धरला जाऊन शिक्षेस पात्र होईल त्याजला खालीं सहीकरणार याजकडून चाळीस रुपये बक्षीस मिळतील. बातमी देण्यास कोणी अनमान करू नये. व कोणी व्यापाऱ्यानें त्या नोटीचा पैसा कोणाला प्रामाणिकपणानें दिला असल्यास लवकरच जाहिर केल्यास बरें होईल. तारीख १ माहे एप्रिल सन १८७५ इसवी. मुक्काम अकोलें.

( सही ) सी. ए. डब्ल्यु. देविस

नादारी मु० नंबर २—१८७१ इसवी. डनलाप साहेब बहादुर असिस्टंट कमिशनर कोर्ट वडनेरें जिल्हे उमरावती यांजकडून.

नोटिस—नादार हजारीमल कन्हयालाल वहिवाटदार विरदीचंद दुकान उमरावती याचा माल लिलाव व येणें वगरे वसूल झाल्याबद्दल एकंदर रक्कम रुपये १०९८२८११ आफिशियलअसायनी कोर्ट उमरावती येथें जमा आहेत त्याचे हिस्से दामाशाईप्रमाणें वटवडा होण्याकरितां आफिशियलअसायनीचे कोडतांत तारीख १० माहे एप्रिल सन १८७५ इसवीची उमरावती येथें नेमून नोटिस देण्यांत येते कीं सदरहू नेमले तारखेस ज्या इसमांचें नादाराकडे घेणें असेल त्यांणीं आफिशियल असायनी कोर्ट उमरावती येथें हजर व्हावें आणि नेमले दिवशीं हजर नराहिल्यास गैरहजर असलेले इसमास हिस्सा नमिळतां हजर असलेले लोकांसच हिस्सा दिल्हा जाईल. तारीख ३० माहे मार्च सन १८७५ इसवी.

( सही इंग्रजी ) ए. जे. डनलाप.
असिस्टंट कमिशनर
जिल्हे उमरावती.

## विक्रीचीं पुस्तकें.

खालीं लिहिलेलीं पुस्तकें आमचे छापखान्यांत विक्रीस तयार आहेत. हीं पुस्तकें रोख किंमत देणारास मात्र मिळतील बाहेर गावचे नेणारांस डाकहाशिल शिवाय पडेल.

| | रु- आ. पै |
|---|---|
| पोथ्या वगैरे | |
| रामनवमी व्रतोद्यापन कथा | ०—२— ० |
| अनुस्मृती | ०—३— ० |
| गायन प्रकाश | ०—४— ० |
| विवेकसिंधु | ०—८— ० |
| चतुश्लोकी भागवत | ०—४— ० |
| पंचायतन नामावली | ०— ३ —० |
| शिवसहस्त्र नामावली | ०— ३— ० |
| विष्णुसहस्त्र नामावली | ०—३ —० |
| चक्रव्यूह | ० —१— ० |
| भुपाळ्या | ०— १— ० |
| व्यंकटेशस्तोत्र | ० — २—० |
| धावे | ० — १—० |
| हरिपाठ | ० – १ – ० |
| नळाख्यान | ० – ३ –० |
| आर्या मोरोपंती द्रोणपर्व | २ – ० – ० |
| ,, ,, मंत्ररामायण | १–८ – ० |
| वामन पंडितकृत श्लोक भाग पहिला | ० – १२– ० |
| सदर्हू भाग दुसरा | ० –१२– ० |
| गणपतीचे श्लोक | ० – ० – ६ |
| गीतामहात्म | ० – ६ – ० |
| रजोदर्शन शान्ती | ० – ६ – ० |
| मोडीकित्ते | ०—०—६ |
| आर्या | ०—१—० |
| शृंगारशतक भर्तृहरिकृत | ०—६—० |
| नीती शतक | ०—६—० |
| ध्रुवाख्यान | ० —१—० |
| वाचनसंबंधी | |
| रुक्मिणहिरण नाटक | १–८— ० |
| हरिश्चंद्र नाटक | १–८ —० |
| वालिवध नाटक | ० —६—० |
| वसंतमाला | १—४—० |
| गोपीचंद राजाचें नाटक हिंदुस्थानी | ०– १२– ० |
| बालज्ञान | ०—२ – ० |
| इंग्लिश पहिल्या बुकाचें भाषांतर | ०—२ –० |
| सिंव्हासन बत्तिशी हिंदुस्थानी | ० —८— ० |
| अंकलिपी | ० —०—६ |
| कशीप्रकाश | ०—१२–० |
| वेताळ पंचविसी | ०—८—० |
| कायद्यासंबंधी | |
| नादारीचे रूळ | ०—६—० |
| मुं. इ. मुलकी सर्क्युलरें | ४—०—० |
| स्माल काज कोर्टाचा कायदा सन १८६५ चा आक्ट ११ | ० —४—० |
| सन १८६५चा आक्ट १ धारा बसविण्याचा | ० – ४ – ० |
| पोलिसखात्याकडील रूळ | ०–३–० |
| फौजदारी काम चालविण्या विषयीं कायदा | २–०—० |
| क्रिमिनल प्रोसिजरकोडची विल्हेवारी | १–८— ० |

## नोटिसा.

नोटिस—सूर्यभान वल्द रामाजी घोडे रहाणार मौजे नागापूर तालुके अकोट यांस खालीं सही करणार याजकडून देण्यांत येते कीं तुह्मी आमचा गुमास्ता विश्वनाथ याजला दुकानचे नावे दोन हजार रुपयांचे दोन खरीदीखतें सेत आणि घर व जनावरें व भांडीं वगैरेबद्दल तारीख ४ माहे मार्च सन१८७४ इसवी रोजीं लिहून दिलीं व तीं तुह्मीच रजिस्टर करण्यासाठीं सबरजिस्टर याजकडेस हजिर केलीं व परतही तुह्मीच आणिलीं असून आजपावेतों आमचे दुकानीं आणून दिलीं नाहींत व त्यांत लिहिलेली मिळकतही आमचे ताब्यांत दिली नाहीं दोन तिन वेळ तुह्मास ती मिळकत व खरिदीखतें मागितलीं असतां तुह्मी दिलीं नाहींत यास्तव या नोटिसीनें कळविण्यांत येते कीं आजपासून पंध्रा दिवसांत खरिदीखतें दोन व त्यांत लिहिलेली मिळकत आणून देऊन आमची रतिद घ्यावी व तुमचे कांहीं रुपये आमचेकडे राहिले आहेत ते घेऊन जावे ह्या मुदतींत असें न कराल तर तुह्मावर दिवाणींत दावा केला जाईल व ह्या नोटिसीचे खर्चासह तें तुह्मास द्यावें लागेल कळवे तारीख २९ माहे मार्च सन १८७५ इसवी

( सही )रामदत किसनदयाळ व
हिवाटदार तनसुकदास
दस्तुर खुद्द.

नोटिस—मोहोनलाल सुरजमल मारवाडी जालनापुरकर हल्लीं दुकान नांदगाव स्टेशन जिल्हा खानदेश यांस खालीं सही करणार इजकडून देण्यांत येते कीं, माझा भ्रतार रामचंद्र खंडेराव हे तुमचे उमरावती एथील दुकानांत गुमास्ते होते ते मरण पावले त्यांची तनखा रुपये ३०० तुह्माकडेस येणें आहेत ते रुपये तारीख १५ एप्रिल सन १८७५ इसवीचे आंत आह्मास देऊन आमची पावती घ्यावी. सदरील मुदतींत रुपये न दिल्यास तुह्मावर रीतीप्रमाणें फिर्याद करून रुपये घेऊ. ही नोटिस रजिस्टर केली असून हिजबद्दल सर्व खर्चही तुह्मास द्यावा लागेल. कळवे तारीख ३१ माहे मार्च सन १८७५ इसवी·

( सही ) साळुबाई भ्रतार रामचंद्र
खंडेराव कुळकर्णी शेलवडकर इचे निशाणी खुद्द.

नोटिस—विष्णाजी वल्द कृष्णाजी टिकार रहाणार मौजे गाडेगाव प्रगणे अडगाव तालुके अकोट यांस विष्णाजी वल्द नवलाजी हानोळ रहाणार जवळ तालुके खामगाव याजकडून देण्यांत येतें कीं माझे मुलीची सोयरीक तुमचा मुलगा गणु याशीं सुमार दोन महिने झाले हरसिंग ताथोडे यांचे मार्फत तुह्मी समक्ष नसतां तुमचा बंधु चंदु व बाप कृष्णाजी यांशीं झाली. व पुढें आह्मी मुलास पागोटें बांधलें तेव्हां ही तुह्मी समक्ष नव्हतां नंतर तुह्माकडून तुमचा भाऊ चंदु व बाप कृष्णाजी व सदरील हरसिंग वगैरे लोक येऊन मुलीस डागिने घातले त्यानंतर आह्मास असें मालुम झालें कीं तुह्मास महाव्याधी ह्मणजे रक्तपिती आहे त्यावरून आह्मी तुमचे घरीं अंबोकर विठोबा कोल्हे वगैरेसह येऊन तुह्मास समक्ष पाहिलें तर तुमचे अंगावर रक्तपिती दिसून आली व याचप्रमाणें तुमचे मुलासही हें दर्द होईल सबब झालेली सोयरीक रहित करून मुलीवर घातलेले डागिने ते वेळेस आम्ही बरोबर आणिले होते ते देत असतां तुह्मी घेतले नाहींत. नंतर कांहीं दिवसांनीं आमचे गावीं तुह्माकडून सदरील हरसिंग, कृष्णा व चंदु वगैरे लोक आले तेव्हांही आम्ही सदरील प्रमाणें डागिने देण्यास राजी आहों ते घेऊन रशीद द्यावी ह्मणून सांगितलें तेव्हां सदरील इसमानीं इतर चार लोकांसमक्ष रद्द झाल्याचें कबूल करून डागिने घेण्याचेंही कबूल केले फक्त पावती देण्यास मात्र इन्कार केला व आम्ही पावतीशिवाय डागिने देऊं शकत नाहीं ह्मणून सांगितलें. त्यावर ते लोक परत गेले. आतां तुह्मास कळविण्यांत येतें कीं, प्रथम सोयरीक होतेवेळेस व पागोटें बांधते वेळीं तुह्मी घरीं असून आमचे नजरेस न पडतां कपटानें सोयरीक केली. ती सोयरीक, पुढें कपट उघडकीस आल्यावर आम्ही रद्द केली. आणि हें करणें तुमचे बंधु चंदू व बाप कृष्णा यांणीं आमचे गावीं मान्य करून डागिने न घेतां परत गेले. आतां तुमची आमची सोयरीक राहिली नाहीं. तुह्मी आपले डागिने रशीद देऊन घेऊन जावे असें न कराल तर यापुढें तुमचे कोणतेही कृत्यास किंवा नुकसानीस आम्ही जबाबदार नाहीं. तुह्मी सरकारदरबार केल्यास त्याचे खर्चासही आम्ही जबाबदार नाहीं. तुह्मी आपले डागिने ही नोटिस पावल्यापासून १५ दिवसांत घेऊन जावे व रशीद द्यावी. ही नोटिस देण्यास तुह्माकडूनच कारण झालें आहे करितां ह्या नोटिशीचा खर्च तुह्मास द्यावा

लागेल. तारीख २६ माहे मार्च सन १८७५ इसवी

( सही ) विष्णाचे वकीलपत्रावरून आबाजी खंडेराव वकील.

---

नोटिस—नारायणसा देवसा लाड दुकान आलेगाव याशीं खालीं सही करणार याजकडून नोटिस देण्यांत येते कीं, तुमचे नांवशीं आमचे नावचा पुर्जा रुपये ९९ चा असोन आह्मी तुह्मास दोन तीन वेळ सांगितलें कीं. तुमचे रुपये व्याजासुद्धां हिशोब करून घ्यावे आणि आमचा पुर्जा काढून द्यावा तर तुह्मी ऐकत नाहीं करितां या नोटिशीनें कळवितों कीं सदर हू नोटिशीचे तारखेपासून आठ दिवसांचे आंत रुपये घ्यावेत न घ्याल तर आह्मी सावकारींत अनामत ठेवू व पुढें व्याज तुह्मास मिळणार नाहीं ही नोटिस दिली कळावें. तारीख २ माहे एप्रिल सन १८७५ इ०

( सही ) नवलाजी वल्लद भगवान पाटील वस्ती चरणगाव

निशाणी खुद्द.

---

नोटिस—रा. गोविंद माधव देशपांडे वस्ती अकोलें हल्लीं मलकापूर व गंगाधर नोरावरमल साहु दुकान अकोलें यांस कळावें कीं तुमचे नावानीं मुखत्यारपत्र आठ रुपयांचे कागदावर दिलें होतें तें दोन चार वेळा मागितलें असतां दिलें नाहीं करितां आजरोजीं रद्द केलें असे. कळावें. तारीख २ माहे एप्रिल सन १८७५ इ०

( सही ) नारायण अमृत देशपांडे वस्ती अकोलें दस्तुर खुद्द.

---

नोटिस—छित्र्या वल्लद गिरम्या महार रहाणार वानखेड पिंपरी नजीक तेल्हारें तालुके जळगाव जिल्हा अकोला यास खालीं सही करणार याजकडून नोटिस देण्यांत येते कीं तुह्मी आह्मापासून कर्जाऊ रुपये २२ घेतले त्याचे व्याजासुद्धां रुपये ४४ झाले असून आजपर्यंत तुह्मी दिले नाहींत करितां आम्ही तुह्मावर कोर्टांत फिर्याद केली त्यांत फैसल ५७८६ सत्ताव न रुपये सहा आण्यावर झाला आहे तर सदर्हू रुपये १५ दिवसांचे आंत आह्मास आणून द्यावे नाहीं तर रीतीप्रमाणें पुन्हा तजवीज करण्यात येईल कळवि तारीख ३ माहे एप्रिल सन १८७५ इसवी मुक्काम अकोलें.

(सही) दीनदयाळ रामबकस दस्तुर खुद्द.

## जाहिराती.

आम्ही खालीं सही करणार सर्व लोकांस जाहीर करितो कीं आमचा टप्पा अकोल्यापासून इंगोलीपावेतों घोड्याचे गाडींतून जाण्याचा सुरू झाला आहे; व अकोल्यापासून इंगोलीस जाणारे जे पासेंजर त्यांस वाशिमापावेतों सदर्हू गाडींतून नेणें व वाशिमाहून अकोल्यापावेतों आणण्याचें हल्लीं सुरू केलें आहे. इंगोलीचा टप्पा हल्लीं चालू नाहीं याजकरितां ज्या लोकांस वाशिमपावेतों पासेंजर दाखल होणें असल्यास त्याचे दर—सरदार लोकांस एका इसमाचे रुपये ७ द्यावे लागतील व त्यासमागमें बोजा १० शेर जाईल व एतद्देशीय लोकांस एका इसमास रुपये ४ पडून बोजा ५ शेर पावेतों जाईल याप्रमाणें दर आहेत तारीख ३ माहे एप्रिल सन १८७५ इसवी

( सही ) बहेमनजी उकडजी आणि कंपनी दुकान अकोलें.

---

सर्व लोकांस कळावें कीं, बरजोरजी मंचरजी फारशी राहणार खामगाव याजपाशील स्थावर माल आह्मापाशीं पूर्वीं खरेदी असून तो त्यास सदरील किमतील परत दिला त्याचे किमतीबद्दल रुपये बरजोरजी मंचरजी याजकडेस येणें व दुसरें बुलढाणें दुकान शराकतीसंबंधी व मुंबईचे फिर्यादीबद्दल असे तिन्ही मिळून एकंदर बरजोरजीकडेस रुपये येणें झाले त्याजबद्दल त्याजकडून गाहाणाबद्दल दस्तैवज लिहून घेतेले ते.

५० प्रत दस्तैवज ता० १८ फेब्रुवारी सन १८७५ इसवीचा रोखा रु.

७०० प्रत दस्तैवज तारीख १८ मार्च सन १८७५ इसवीचे गहाणखत याऐवजी गहाण

१ कजबे जळंब तालुके खामगाव एथील सरव्हे नंबर ४११, एकर ७८३, आकार ६८

१ कजबे लाजुड तालुके मलकापुर एथील सरव्हे नंबर २०२, एकर २९८१२, आकार ३२.

---

१५०१ प्रत दस्तैवज ३ तारीख १८ माहे फेब्रुवारी सन १८७५ इसवीचा या ऐवजी गहाण

मौंजे हातें तालुके बाळापूर जिल्हा अकोला एथील शेत ८

| सर्वे नंबर | एकर |
|---|---|
| ६३ | ३२८१९ |
| १०७ | २०८७ |
| ९१ | २२८२५ |
| ९६ | ९८२१ |
| ६० | ३१८३५ |
| ६२ | १३८२७ |
| १७४ | २३८२९ |
| ६१ | २०८२८ |

१९०१ प्रत दस्तैवज तारीख १८ माहे फेब्रुवारी सन १८७५ इसवी या ऐवजी गहाण

१ पेठ खामगाव जमालपुरा एथील दुकानें तीन ३ आमचे ताब्यांत दिलीं

१ मौंजे हातें तालुके बाळापुर जिल्हे अकोले एथील सेत ४

| नंबर | एकर | आकार |
|---|---|---|
| १०९ | २३८२० | ३१ |
| ८५ | १६८५ | २० |
| ११० | १५८८ | १८ |
| २१३ | ३३ | ४० |

सदर्हू प्रमाणें निरनिराळे दस्तैवज लिहून घेऊन रजिष्टर करून घेतले आहेत हें सर्वांस जाहिर व्हावे. कोणी गहाण किंवा खरिदी घेईल त्याची त्याजवर जबाबदारी आहे कळावें तारीख १ माहे एप्रिल सन १८७५ इसवी.

[ सही ]खरशेटजी माणकजी उंढवारेवाला दस्तुर खुद्द.

## धर्मसिंधु.

( प्राकृतभाषांतरसहित. )

विक्रीस तयार.

धर्मजिज्ञासु लोकांस कळविण्यांत येतें कीं, हा ग्रंथ ज्या कोणास घेणें असेल त्यानीं खालीं सही करणारांच्या नांवें मुंबई मध्यें काळकादेवीच्या रस्त्यावर निर्णयसागर छापखान्यांत किं० रु० ६. ट० हां० १२ आणे पाठविले असतां त्वरित पुस्तक रवाना केलें जाईल. टिकिटा पाठविणें झाल्यास वर्तावळ्यासुद्धां पाठवाव्या. नाटपेड पत्र घेतलें जाणार नाहीं. तारीख ५ एप्रिल सन १८७५ इसवी.

( सही )जावजी दादाजी

---

## पत्रव्यवहार

या सदराखालील मजकूर पत्रकर्त्याच्या मतास मिळूनच असतील असें समजूं नये

---

रा. रा. वऱ्हाडसमाचारकर्ते यांस—

वि. वि. आपला व माझा परीचय नाहीं ह्मणून खालीं लिहिलेला मजकूर आपल्या जगमान्य पत्रीं छापून प्रसिद्ध करण्यास अनमान होणार नाहीं, अशी खात्री ठेऊन हा प्रथमच प्रयत्न करीत आहे.

मी फिरत फिरत ह्या कुरणखेड गावीं आलों हा गाव ४१५शें घरांच्या वस्तीचा असून गांवास नदीवगैरे असल्याकारणानें बराच टुमदार दिसला. गावांत लष्करी लोकांच्या गाड्या गल्ोगल्लीं पडल्या असून कांहीं नदीवरही होत्या; गावांतील उताऱ्याच्या जागा लष्करी लोकांनीं व्याप्त होऊन शिवाय रस्त्यावरही पुष्कळ लोक उतरले होते अशी लष्कऱ्यांची एकच गर्दी होऊन गेली आहे. एथें औटपोस्ट असल्याकारणानें ६ कान्स्टेबल व १ हेड कान्स्टेबल आहे. पोलिसचा बंदोबस्त चांगला असल्याबद्दल गावकरी लोकांनी सांगितलें याचप्रमाणें सरकारी शाळा असल्याबद्दल समजल्यावरून काल सायंकाळचे ४ वाजतां मी तेथें गेलों होतों. ६०ठांवर मुलें हजर दिसलीं; दोन मास्तर होते एक हेडमास्तर, व एक असिस्टंटमास्तर, दोघेही आपापल्या कामांत दक्ष व हुशार आसावेत असें त्यांच्या वर्ग शिकविण्याच्या शैलीवरून दिसून आलें; असिस्टंट मास्तरचा व माझा एका विषयांत दोन घटका वादविवाद झाला त्यांत त्यांणीं माझ्या शंकेचें समाधान फार उत्तम रीतीनें केलें. पाटिलकीचें काम देशमुखाकडेस असून कुळकर्णिपणाचें काम देशपांडे याजकडेस आहे. पत्रकर्ते महाराज मजला पुस्कळ मजकूर लिहावयाचा आह पण मूळचा मी वऱ्हाडी असून वर्तमानपत्रांत पाठविण्याकरितां मजकूर लिहिण्याचा हा पहिलाच प्रसंग आहे याजमुळें माझ्या लिहिण्याची शैली आपल्या पसंतीस पडते किंवा नाहीं याचा संशय आहे तो दुर झाला ह्मणजे पुनः पत्रद्वारें आपली भेट घेण्यास उमेद येईल. कळावें लोभ करावा ही विनंती तारिख. ३० माहे मार्च सन १८७५ इसवी.

एक फिरस्ता

---

### हिंदुलोकांतील बाल्यावस्थेंत लग्न करण्यापासून गैरफायेद.

रा. रा. वऱ्हाडसमाचारकर्ते यांस—

वि. वि. माझ्या ह्या खालीं लिहिलेल्या चार ओळी येत्या अंकांत छापून प्रसिद्ध कराल अशी आशा बाळगून हें पत्र लिहिलें आहे.

माझें पहिलें लग्न माझे बापानीं माझे वयाचे सहावें वर्षीं केलें व माझी बायको लग्नांत सुमारें साडेतीन वर्षांची होती. नंतर लग्न झाल्यावर माझी अल्पवयी पत्नी, देवी येऊन दीड वर्षानें मरण पावली. पुढें माझे बापानें माझे अकरावे वर्षीं पुन्हा लग्न केलें. ती स्त्री लग्नांत आठ वर्षांची होती तीही पूर्वींचे स्त्रीप्रमाणें एक वर्षभर राहून यमसदनास जाती झाली. नंतर माझे घरांतील सर्व वडीलमाणसें व गावांतील बरेच लोक हे सर्व "बायको माऱ्या" ह्या शद्बांनीं हांका मारूं लागले व कितीएक 'सन्याशी कां आतां होईना असें' ह्मणूं लागले हल्लीं ही माझे बापानें माझें लग्न करण्याची उमेद बाळगून लग्न केलें आहे. ह्याही स्त्रीस देवी वगैरे अद्याप कांहींएक निघाल्या नाहींत व वय सहा वर्षांचे आहे पुढें काय होईल तें खरें! लहानपणीं लग्नकरण्यापासून कसे फायदे होत आहेत याचा सूज्ञ वाचकांनीं विचार करावा. तारिख ३१ माहे मार्च सन १८७५ इसवी.

एक विद्यार्थी.

---

वऱ्हाडसमाचार

मिती फाल्गुन वद्य १३ शके १७९६

## वडोदे कमिशनचा रिपोर्ट व लोकांचीं मतें.

कोणतीही महत्वाची गोष्ट घडून येण्याची असली ह्मणजे सर्व मनुष्यांचीं मनें तिकडे लागून रहातात व त्या गोष्टीपासून काय निष्पन्न होईल तें समजण्याविषयीं सर्वांस अतीशय उत्कंठा असते हा स्वाभाविक नियम आहे. व या नियमाप्रमाणें हल्लीं वडोदे प्रकरणाच्या निकालाकडे सर्व लोकांचें चातकाप्रमाणें लक्ष लागलें आहे ह्यांत नवल नाहीं. हल्लीं मुंबईस जो रिपोर्ट तयार होत आहे तो तर कोणास समजला नाहीं; परंतु लोकांची मनोवृती अगदी अधीर होऊन नाना प्रकारचे तरंग बाहेर पडावयास लागले आहेत. कित्येक वर्तमानपत्रें ह्मणतात कीं ६ कमिशनरापैकीं चौघांचीं मतें मल्हारराव महाराज यांजवरील दोषारोप शाबीत होत नाहीं अशीं आहेत व दोघांचीं त्याविरुद्ध आहेत.

बांबेग्याझेट पत्रकर्त्याच्या ऐकण्यांत असें आलें आहे कीं सिंद सरकार, जयपुरचे महाराज व सर दिनकरराव या ३ नेटिव पंचांचीं मतें महाराजांतर्फे आहेत व ३ युरोपियन पंचांचीं मतें गायकवाडावर दोष शाबीत होतो अशीं आहेत व ज्या अर्थीं सर रिचर्ड कौच हे अध्यक्ष आहेत त्याअर्थीं त्यांस एक मत जास्त देण्याचा अधिकार आहे व असें झालें ह्मणजे गायकवाडावर च्यार्ज शाबीत होईलच, हें वर्तमानपत्रकर्ते इतकेंच लिहून उगीच राहिले नाहींत तर त्यांणीं असेंही प्रतिपादन केलें आहे कीं नेटिव पंचांचीं मतें राजकीयकारणानीं दूषित झालीं असल्यामुळें त्यांनीं गायकवाडाचे पक्षास अनुकूळ अशीं मतें दिलीं असावीं सर दिनकरराव हे ब्राह्मण आहेत व त्याणीं केवळ नेटिव राज्याच्या व धर्माच्या अभिमानास्तव ( गायकवाड दोषी आहेत असें सिद्ध असतांही ) आपलें मत उलट दिलें असावें व आपल्या मताप्रमाणें मत देण्यास सिंदे सरकार व जयपुरचे महाराज यांचीं मनें वळविलीं असावीत. गायकवाडतर्फे जे धाकटे खटपटी वकील आहेत त्यांणीं दिनकरराव व सिंदे सरकार यांची भेट घेऊन त्यांस मल्हारराव महाराजांस अनुकूळ असें मत देण्याविषयीं आग्रह केला असावा.

हे असले दोष नेटिव्ह पंचांवर ग्याझेटकर्त्यानें ठेविले आहेत ह्याचा परिणाम काय होतो तो पहावा. मि. शांताराम नारायण (महाराजांचे वकील) यांगीं तर ग्याझेटकर्त्यावर बेअब्रूची फिर्याद केली आहे. व दिनकरराव, सिंद सरकार हेही उगीच बसतील असें आह्मास वाटत नाहीं. ज्यांच्या योग्यतेची. अधिकाराची, व प्रामाणिकपणाची लार्ड नार्थब्रुक साहेबांस खात्री आहे व ह्मणूनच ज्यांस ह्या प्रकरणांत नेमिलें त्यांजवर ग्याझेटकर्ता असे दोष आणूं शकतो तेव्हां त्याचे धाडसास काय ह्मणावें. ह्या पत्रकर्त्याच्या मत्सरी स्वभावाच्या लिहिण्यामुळें सरकारचें तर कांहीं हित होत नाहींच परंतु सर्व इंग्रज लोकांचीं आपणाविषयीं मतें व मनांतील हेतु ग्याझेटकर्त्याप्रमाणें असतील असा संशय उत्पन्न होऊन परस्परांमध्यें द्वेषभाव उत्पन्न होऊन लोकांची राजनिष्ठा ढळमळूं लागण्याचा संभव मात्र उत्पन्न होतो. असो, ह्याप्रमाणें कमिशनच्या निकालाविषयीं दोन गप्पा झाल्या. तिसऱ्या प्रकारचे लोक असें ह्मणतात कीं, जाऊं द्या हो. एकंदर पुराव्यावरून जरी गायकवाड निर्दोषी आहेत असें सरकारास वाटलें तरी सरकार काय तसाच निकाल करून महाराजांस पुन्हा गादीवर बसवितील ? कारण सरकारास असें वाटणार नाहीं काय? कीं, आम्ही एवढा प्रचंड व्यूह रचून जो एकवेळ दोष आणला काय आणि तो परत घ्यावा काय? व जरी कदाचित् महाराज गायकवाड दोषांतून मुक्त झाले तरी त्यांस गादी मिळण्याचा संशयच आहे. परंतु ही लोकांची चूक आहे. लार्ड नार्थब्रुक सारखे हिंदुस्थावर प्रतिनिधी असतां अशी गोष्ट कधीं होणार नाहीं असें आम्ही ह्मणतों. गायकवाडास पुन्हा गादीवर बसविल्यानें इंग्रज सरकारचे न्यायीपणाविषयीं सर्व हिंदुस्थानभर कीर्ति होईल व सर्व राजे रजवाडे व प्रजा ह्यांचें इंग्रजसरकारावर अधिक प्रेम जडून त्यांची खात्री होईल कीं, इंग्रज सरकारची इच्छा सर्व राज्यें सुधारून लोकांस सुख व्हावें अशीच आहे तीं आपले घशांत यावीं अशी बिलकुल इच्छा नाहीं. लार्ड नार्थब्रुक ह्यांच्या ध्यानां हे सर्व विच्यार येतीलच असें सर्व समंजस लोकांस वाटत आहे. असो. ह्या कमिशनचा रिपोर्ट दोन तीन दिवसांपूर्वींच रवाना होणार होता व सरशेवटचा व्हाइसरायकडचा जो निर्णय होणार तोही पुढील आठवड्यापर्यंत कळेल असा तर्क आहे व तो निर्णय सर्व एत्तद्देशीय लोकांचे मनाप्रमाणें व्हावा असें आम्ही इच्छितों.

---

**बडोदे कमिशनची ताजी खबर**

शुक्रवारचे टाइम्समध्यें असें लिहिलें आहे कीं जयपुरचे महाराज व सर रिचर्ड मीड ह्यांचे मल्हाररावावरील दोषाबद्दलचें मत कांहींच बाहेर पडलें नाहीं परंतु बाकीच्या पंचां पैकीं मि० मेल्व्हील यांचे मत गायकवाडावर च्यार्ज निःसंशय शाबीत होतो असें असल्याची अफवा निघाली आहे व सर रिचर्ड कौच, महाराज शिंदे सरकार व सर दिनकरराव ह्यांचें मत असें आहे कीं गायकवाड सरकारावरील वहिमांतून जरी महाराजांनीं आपणास मोकळें केलें नाहीं तरी त्यांच्या विरुद्ध जो पुरावा कमिशनपुढें आला आहे त्यावरून महाराजांवरील आरोप शाबीत होत नाहीं.

बडोदे शहरांतील खबर— बडोद्याचे टाइम्सचे बातमीदाराचें पत्रावरून असें समजतें कीं दामोदरपंत, अमीना आप्या, रावजी वगैरे असामीस कमिशन आटोपल्यावर सोडून दिले होतें त्यांस पुन्हा पकडलें आहे पुन्हा पकडण्याचें कारण बरोबर समजलें नाहीं. रावजीच्या पायांत बेड्या घातल्या आहेत असें ह्मणतात. रावजी व दामोदरपंत यांस शिक्षेची माफी कमिशनचे पूर्वींच केली आहे त्यांस काय वाटेल. सर्व लोक ह्मणत आहेत कीं ईश्वरा आह्मास गजानन पालिस इन्स्पेक्टरापासून सोडीव. नजमुद्दीन व समसुद्दीन बोहरी ह्यांस जामिनावर सोडलें आहे. नुरुद्दीन व हाकीम हे अद्यापि पहाऱ्यांत आहेत.

वर सांगितलेले दोन्ही बोहऱ्यांस दररोज क्यांटोनमेंट माजिस्त्रेट पुढें आणून त्यांचे हिशेबांच्या वह्या तपासतात कमिशनसें पुढें ज्या जबान्या त्यांणां दिल्या त्याच खऱ्या आहेत असें ते ह्मणत आहेत पंत व महाराज ह्यांस आह्मी कधींही सोमल दिला नाहीं परंतु कर्नल बारटनकरितां सोमल पाहिजे आहे अशी पत्रें डाक्टर सिवर्ड व मिस्तर बोइव्ही ह्याजकडून आह्मास आलीं असें ते ह्मणत आहेत.

---

## वऱ्हाड

---

हवेचें मान या आठवड्यांत अगदीच बदलून गेलें आहे. आकाश रात्रंदिवस बहुतकरून ढगांनीं भरलेलें असतें मधून मधून वारा मोठ्या झपाट्यानें वहातो. हवेंत गारवा बराच आला आहे.

डा० सिंक्लेअर विद्याखात्याचे डायरेक्टर हे आजारी असल्याविषयीं आम्ही पूर्वीं लिहिलेंच आहे. आतां असें समजतें कीं त्यांनीं एक महिन्याची हक्काची रजा घेतली व ही रजा ते चिखलदऱ्यासच घालविणार. डा० सिंक्लेअर रजेवर आहेत तोंपर्यंत त्यांचें काम मि० इलियट साहेब ए. इन्स्पेक्टर हे पहातील.

---

तारिख २७ मार्च रोजीं संपणाऱ्या आठवड्यांत वऱ्हाडांतून व मध्यप्रांतांतून एकंदर १३२६० कापसाचे फुल प्रेस्ड गठ्ठे व ५४४ डोक्रे मुंबईकडे गेले.

---

उमरावतीचे स्पे. सबरजिस्ट्रार रा. रा. जयराम कृष्ण यांच्या मुलांचा जोडा शाळेंत हरवला ह्मणून त्याणें आपले बापास सांगितलें त्यावरून जयरामपंत दादास राग येऊन त्यानीं शाळेंत जाऊन कोणच्या मुलानें घेतला वगैरेची चौकशी पोलिशीं धाटणीवर चालविली.. व चौकशी नंतर जयरामपंत आण्णानीं एथील पोलिस सुपरइंटेंडेंट कचेरींतील कान्स्टेबल हरबाजी विठ्ठल याचा मुलगा त्याच शाळेंतील एक विद्यार्थी यानें नेला ह्मणून ठरविलें त्यांस असें वाटलें कीं आपण पोलिशी धाटणीवर चौकशी केली परंतु आपणास कोणी कांहींच विचारलें नाहीं. त्यावरून आपणास पोलिसाचे पूर्ण अधिकार आहेत असे मनांत मांडे खाऊन लगेच त्याणीं त्या कान्स्टेबलाच्या अपरोक्ष त्याच्या घराचा झाडा घेतला. परंतु जोडा सांपडला नाहीं. त्या पोलिस कान्स्टेबलानें याबद्दल मे० बर्न साहेब यांचे कोर्टांत इ० पि० कलम ५०० प्रमाणें फिर्याद केली होती. पुढें अपसांत समजले असें कळतें. प्र. सिं.

---

## वर्तमानसार

---

तारिख ३१ मार्च रोजीं. शिंदे सरकार पुण्यास गेले बरोबर ३ । ४ शें लोक आहेत.

बळरामपुरच्या महाराजास गवरनर जनरलच्या कायदे कौन्सिलांत मेंबर नेमिलें

सर लुईस पेली बडोद्याचे रेसिडेंट ता. १२ रोजीं विलायतेस जाणार व त्यांचे जागीं ह्मैसूरचे कमिशनर सर रिचर्ड मीड यांची नेमणूक होणार असें ह्मणतात.

गेल्या मंगळवारीं पुण्यास मोठें वादळ झालें.

बहार हेरल्डवरून समजतें कीं, एक युरोपियन व एक नेटिव्ह असे दोघे आगगाडीच्या एका डब्यांमधून पाटणा व फतवा यांचे दरम्यान जातअसतां युरोपिअनानें नेटिवास मारामार करून गाडी चालत असतां बाहेर ढकलून दिलें. नेटिवास कांहीं इजा झाली नाहीं. युरोपियनास शेजारच्या स्टेशनावर पकडलें तेव्हां तो दारू पिऊन मस्त झालेला आढळला. त्याची चौकशी माजिस्त्रेटासमोर होऊन त्या युरोपियनास तीन महिन्यांची शिक्षा झाली.

मि० सूटर मुंबईचे पो० क० बडोद्याच्या चौकशीचा अखेर निकाल झाल्यावर विलायतेस रजेवर जाणार व तसेंच डा० सिवर्ड बडोद्याचे क्यां० माजिस्त्रेट हेही जाणार असें समजतें.

तारीख २० मार्च रोजीं संपणाऱ्या आठवड्यांत ग्रे. इं. पे. रेलवेचें उत्पन्न ६४७६६५ रुपये झालें.

अशी एक गप्प उडाली आहे कीं सर दिनकरराव यांस बडोद्यास व्यवस्थापक नेमणार.

नागपुरचे सिव्हिल सरजन डा० बीटसन यांची बदली नागपुराहून कराची ह्मणून तेथील कांहीं युरोपीयन गृहस्थांनीं गवरनर जनरल साहेबांकडे अर्ज केला आहे.

पालमाल ग्याझिटवरून समजतें कीं, एशिया खंडांत रशिया सरकारची लढाऊ फौज ६०८,००० आहे खेरीज ३२६९० घोडेस्वार आणि ११२ तोफा आहेत. याशिवाय प्रसंग आल्यास २५७५०० पायदळ पलटण व घोडेस्वार रिझर्व पैकीं ९६५० उपयोगास येणारे आहेत.

ब्रह्मदेशाचें प्रकरण अधिक कठीण दिसावयास लागलें आहे. मद्रासेहून रंगुनकडे व ब्रह्मदेशाच्या सरहद्दीवर फौज चालली आहे. गोऱ्या २१ व्या पलटणीची टोळी रंगुनहून बसेनकडे गेली आणि थायटमेथोकडे तीनहजार मनुष्यें पाठविण्याची तयारी चालली आहे असें टैम्सवरून कळतें.

परशिया नावाची आगबोट नुकतीच मुंबईस आली, तींतून आठ असामी इटालियन व दोन ब्रह्मीलोक आले आहेत. याच आगबोटीवर एक इंग्लिश कर्नल होता त्यानें वाटेंत या लोकांस तुह्मी कोणीकडे जातां असा प्रश्न केला. त्यावरून त्यांणीं असा जबाब दिला कीं, आम्ही कांहीं शास्त्रीय शोध लावण्याकरितां हिंदुस्थानांत जात आहो. कर्नलास त्यांचें बोलणें खरें वाटलें नाहीं व ते कांहीं गुप्त कामाकारितां आले आहेत, असा त्यास संशय आला व तो त्यालोकांचे टेहळणीवर होता, तेव्हां त्यांचे चालचर्येवरून हे हिंदुस्थानांत कोठेतरी दारूचा कारखाना स्थापन करण्याकारितां जात असावेत असें त्यास वाटलें. पुढें आणखी पुनः त्याणें त्यांस विचारलें तेव्हां त्यांणीं पूर्वींचा जबाब न देतां रेशमाचा कारखाना आह्मी हिंदुस्थानांत स्थापन करणार आहों असा जबाब दिला हे लोक आतां रंगून किंवा मिरत एथें जाण्याचे बेतात आहेत.

ह्मैसुरचे राजाची कांहीं मिळकत बंगलोरास आहे ती म्युनिसिप्यालिटीचे करास पात्र आहे किंवा नाहीं असा संशय निघाला होता; परंतु ती मिळकत म्युनिसिप्यालिटीच्या करास पात्र नाहीं असें ठरलें.

ने. ओ.

नगर जिल्ह्यांतील पारनेरचे माजी डे. पोस्टमास्तर मि. भार्गव मोरेश्वर हे हुद्याच्या नायानें कांहीं आफरातफर करून पळून गेल्यावरून ते सरकारच्या चाकरीस निरुपयोगी आहेत असा ठराव झाला.

मद्रास इलाख्यांत तिरपातूर येथें तारीख १३ मिनहू रोजीं धरणीकंपाचा धक्का

बसला व कांहीं वेळपर्यंत मोठी गर्जना चालू होती.

मेसर्स. बाळा मंगेश व हुरमसजी अरदेसर वाडिया या उभयतांस श्री. मल्हारराव यांणीं आपल्यावरील प्रकरणाचा निकाल होईपर्यंत बडोद्यास ठेवून दररोज २०० रुपये प्रत्येकास देण्याचें कबूल केलें आहे.

बडोद्यास असलेल्या एका पोलिस इन्स्पेक्टरानें राणीसाहेब ( श्री. मल्हारराव यांच्या राणीसाहेब अथवा कैलासवासी गणपतराव महाराज यांच्या ) यांच्या मागें गेल्या दोन चार दिवसांपासून असा तगादा लाविला आहे कीं, तुह्मी आपला खासगी जामदारखाना दागिनेवगैरे सुद्धां सरकारी खजिन्यांत पाठवून दिला पाहिजे. या हुकुमास त्या इन्स्पेक्टर साहेबांनीं सर ल्युई पेली यांची सला घेतली किंवा नाहीं हें समजत नाहीं.

श्रीमंत कैलासवासी आईसाहेब महाराज सातारा यांच्या पदरच्या नौकर लोकांचा एक तक्ता येथील पोलिटिकल एजन्ट साहेब यांणीं तयार करून सरकाराकडेस पाठविला होता त्याजबद्दल विचार होऊन सरकारानें २६९ लोकांस तहाहयात पेनशन व १४७ लोकांस बक्षीस देण्याचें ठरविलें. हल्लीं पेनशन करून द्यावयाचें त्या लोकांचे चेहरेपट्टीचें वगैरे काम सुरू आहे. अ. द.

टोल्स बील ( नाक्यांनीं गाड्यांवर व माणसांवर जकात घेण्याबद्दलच्या कायद्याचा मसुदा ) आपल्या एथील कौन्सिलांत तयार होऊन हिंदुस्थानचे गवर्नर जनरल यांकडेस मंजुरीसाठीं गेलें होतें त्यास लार्ड नार्थब्रुक साहेबांनीं मंजुरी दिली नाहीं. ह्या कायद्यापासून गरीब गुरीब लोकांवर जुलूम होईल अशा मतलबाच्या अर्ज्या सरकारांत गेल्या होत्या हें वाचकांच्या स्मरणांत असेलच. गवर्नर जनरल साहेबांनीं कायद्यास मंजुरी न देण्याचीं कारणें समजलीं ह्मणजे याबद्दल आह्मांस कांहीं लिहावयाचें तें लिहूं. कारण हें बिल मुंबई एथील कौन्सिल पुनः सजवून पाठवील यांत संशय नाहीं.

गेल्या रविवारीं संध्याकाळीं पुणें मुक्कामीं रास्ताच्या वाड्यांत बडोद्याच्या संबंधानें मोठी सभा भरली होती. ही सभा सरदार व इनामदार लोकांनीं भरविली होती. श्री. आपासाहेब कुरुंदवाडकर हे अध्यक्षस्थानीं होते. या सभेंत बडोदे कमिशनांत युरोपियन व नेटिव यांची सारखी संख्या असण्याविषयीं जी प्रथमच्या अर्जांत केलेली विनंती ती सरकारानें मान्य केल्याबद्दल त्याचे आभार प्रदर्शित करावे; मल्हारराव महाराजांवरील खटल्यांत कांहीं अर्थ नाहीं असें दिसून आल्यावरून त्यांस मुक्त करावें असे दोन ठराव झाले.

दिल्ली एथें गेल्या मंगळवारीं भरलेल्या दरबारांत एकंदर ३९० राजे, सरदार वगैरेंच्या मुलाखती झाल्या त्या समयीं व्हाईसराय यांणीं भाषण केलें. त्यांणीं प्रिन्स आफ वेल्स यांचा हिंदुस्थान पहाण्यास येण्याचा विचार आहे असें कळविलें. जयपुरचे महाराज व शिंदे सरकार ह्यांनीं बडोद्याच्या कमिशनांत बसण्याचें कबूल केल्यानें आपणास फार समाधान झालें असें सांगितलें. हें ऐकून दरबारास जमलेल्या लोकांनीं त्यांच्या खटल्याचा निकाल काय झाला हें जाणण्याविषयीं उत्कंठा दर्शविली तें पाहून व्हाईसराय ह्मणाले कीं, कमिशनरांचा अद्यापि रिपोर्ट आला नाहीं.

चीन देशाच्या फौजेंत ६७० मांगोलियन तारतार लोकांच्या कंपन्या आहेत, १०६००० चिनी घोडेस्वार व ९,००,००० पायदळ आहे याशिवाय ८,२०,००० कवाईत न शिकविलेले लोक आहेत सर्व मिळून लष्कराची १९८०००० संख्या आहे.

आगकाड्यांच्या पेट्याबद्दल एका फ्रेंच गृहस्थानें एक नवीन पेटी केली आहे. हींत एक प्लाटिनम धातूची तार आडवी लाविलेली असते एक कमान केलेली असते ती दाबली ह्मणजे वरील तार तांबडी होते व त्यावर विडी पेटावितां येते. या पेटींतच वाईनच्या अर्कांत किंवा केरोसिन तेलांत भिजविलेला कापूस ठेविला ह्मणजे तो दिव्याप्रमाणें पेटतो. या पेटीला थंड हवेपासून पेटण्याचें मुळींच भय नाहीं.

सु. प.

## राणीचे पहिले चिरंजीव हिंदुस्थानांत येणार.

महाराणीचे चिरंजीव व त्यांचे मागें गादीचे वारस प्रिन्स आफ वेल्स हे येत्या हिवाळ्यांत हिंदुस्थान पहाण्यास येणार अशी बातमी तारायंत्रद्वारें कळण्यांत आली आहे, व अशाच मजकुराचें भाषण दिल्ली दरबारांत लार्ड नार्थब्रुक यांणीं केलें तेव्हां ह्या राजपुत्राचा येथें येण्याचा खास निश्चय झाला ह्यांत कांहीं संशय नाहीं. ही वार्ता ऐकून कित्येक लोकांस आनंद तर ह्मणता येत नाहीं, परंतु बरें वाटलें असावें असें आह्मास वाटतें, परंतु अशा लोकांचे विचार पोक्तपणाचे आहेत असें ह्मणतां येत नाहीं. दूरवर विचार केला असतां ह्या राजपुत्राचें हिंदुस्थानांत येणें नफ्याचें नसून उलटें तोट्याचें आहे असें वाटतें. प्रथमदर्शनीं पुढील ह्मणणें खरें दिसतें. ज्याचे सत्तेखालीं पृथ्वीचा बराच भाग आहे व तो राजा आपल्या प्रजेच्या कल्याणाची कळकळ बाळगितो अथवा बाळगितो असें दाखवितो, त्यास आपलें राज्य, आपली प्रजा, त्यांची स्थिति वगैरेंचें पूर्ण ज्ञान करून घेणें इष्ट आहे हें प्रत्येक समजस मनुष्य कबूल करील तशांत ज्यास पुढें गादीवर बसून एक मोठें राज्य हकारावयाचें आहे त्यास तर असें ज्ञान असणें फारच महत्वाचें आहे, विशेषेंकरून हिंदुस्थानासारख्या अफाट, भाषा, रूढी धर्म वगैरे गोष्टींनीं फारच भिन्न देशावर ज्याचें स्वामित्व होणार त्यानें जर तो देश स्वतः डोळ्यांनीं पाहून त्याची बरोबर माहिती करून घेतली नाहीं तर तो आपल्या मोठ्या महत्वाचे कर्तव्यास जागला नाहीं असेंच ह्मणणें बरोबर होईल. प्रिन्स आफ वेल्स हे जर असा स्तुत्य उद्देश मनांत धरून हिंदुस्थानांत येतील तर आमचें कांहीं ह्मणणें नाहीं. परंतु एकंदर विचार केला असतां हाच उद्देश त्यांचा असेल असें आह्मास वाटत नाहीं, आणि जरी कदाचित असला तरी तो त्यांचा उद्देश सिद्धीस जाईल असें आमचें तरी निदान मन घेत नाहीं.

ह्या राजपुत्राचें आजपर्यंतचें वर्तन पाहिलें तर मोठेंसें वर्णनीय आहे असें नाहीं. यांचा स्वभाव उदार आहे. हे स्नेहाचे कैवारी आहेत हें खरें. परंतु ह्यापेक्षांही विशेष गुण त्यांचे आंगीं असावयाचे होते. याचे वयास सुमारें चाळीस पंचेचाळीस वर्षें असतील. इतक्या काळांत खरोखर आपल्या भावी प्रजेची कळकळ त्यांस असती तर ते या पूर्वींच हिंदुस्थान पाहून जाते, परंतु तसें त्यांचे हातून झालें नाहीं. हिंदुस्थानचें राज्य ह्मणजे पोरखेळ नव्हे. इंग्लंडाचें स्वामित्व हिंदुस्थानावर आहे ह्मणूनच इंग्लंडाचें युरोपांत कांहीं थोडें वजन आहे. नाहीं तर त्याची स्थिति बहुतकरून स्पेन बेलजम वगैरे अल्प स्वल्प राज्यासारखी असती हें सर्व कबूल करतात. फार काय परंतु मोठमोठे मुत्सद्दी हिंदुस्थानचें नांव निघाल्यावर असें ह्मणतात कीं, "हिंदुस्थान देश राणी मुगुटाचा अति मौल्यवान हिरा आहे" आजपर्यंत ह्या राजपुत्रानें ऐष आरामांत वेळ घातला. प्यारिस, बर्लिन वगैरे छान च्छोक शहरांत यांनीं पुष्कळ वेळ जाऊन वास केला. परंतु आपले हातीं पुढें मोठें राज्य येईल ह्मणून तें राज्य उत्तम रीतीनें चालविण्यास लागणारी सामुग्री ह्मणजे चांगलें वर्तन व मानसिक धर्म वगैरेंची जोगवण यांनीं मुळींच केली नाहीं. मोठमोठ्या बुद्धिमान, सुष्ट व पूज्य लोकांस जवळ केलें नाहीं, आपल्या आईच्या कारकीर्दींत घालवेल तितकें मन घालून राजकारस्थानची जी युरोपभर एक शाळा बनली आहे तींत आपलें मन जसें सुशिक्षित असावें तसें करून घेतलें नाहीं. हें आमचें नेटिवाचें ह्मणणें नाहीं, परंतु इंग्लंडांतील जीं वर्तमानपत्रें ह्या राजपुत्राचे दोषावर पांघरूण घालण्यास होईल तितकें करून झटतात त्यांचे असे बोल आहेत. हें पर्वा ह्या राजपुत्राचे कर्जाबद्दल जी चर्चा झाली त्या वेळेस विदित झालें. अशा राजपुत्रानें इतक्या दिवसांत हिंदुस्थानाकडे डुकून देखील पाहिलें नाहीं. व आतां मात्र येण्याचा निश्चय केला हें ऐकून आह्मास मुळींच आश्चर्य वाटत नाहीं. प्यारिस, बर्लिन, लंडन वगैरे नटाव्या शहरांनीं या राजपुत्रास किती दिवस तोषवावें ? हीं स्थळें जरी इंद्रभुवनें असलीं तरी कधींना कधीं तरी त्यांचा कोणाही मनुष्यास वीट येणारा आहे मग प्रिन्स आफ वेल्स यासारख्या नव्या नव्या गोष्टींवर प्रेम ठेवणाऱ्या राजपुत्रास येणार नाहीं हें कदापि होणार नाहीं. मुंबई, कलकत्ता जरी पारिसनाहीं तरी पारिस पाहून पाहून वीट आल्यावर त्या शहरीं त्यांनीं यावें हें सहजच आहे, प्रिन्स आफ वेल्स येतात तर येऊंद्या! राजनिष्ट प्रजेप्रमाणें हाडाचीं काडें करून, व पोटास चिमटा घेऊन आह्मी त्यांचें आगतस्वागत करूं. दीपोच्छाह करून ध्वजस्तंभ उभारूं त्यांनीं नको ह्मटलें तरी करूंच करूं हट्टानें करूं! परंतु येवढा शीण आह्मास त्यांनीं दिला नसता तर मोठेंसें नुकसान झालें असतें असें मात्र नाहीं. कारण त्यांचें येथें आगमन ह्मणजे केवळ हवा पालटणेंच आहे.

आतां घटकाभर असेंही घेऊन चाललें कीं, ह्या राजपुत्राचे मनांत खरोखर हिंदुस्थान देशाची कशी स्थिति आहे तें पाहवे व त्याअन्वयें पुढें हात फाविल त्या वेळेस त्यांतील प्रजेचें कल्याण करावे असें आहे तरी हें कसें घडेल कोण जाणें. थोड्या दिवसांपूर्वीं येथें डयुक आफ एडिंबरो आले होते त्यांनीं हिंदुस्थान देश काय पाहिला? हे राजपुत्र ज्यावेळेस मुंबईस आले त्यावेळेस आह्मी खुद्द तेथें हजर होतों आणि आह्मी शपथपूर्वक असें सांगतों कीं, त्या प्रसंगीं या देशांतील लोकांची स्थिति कशी आहे हे पाहण्याचें तर राहूं द्या, परंतु त्यांचें त्यांना मी कोण ह्मणून संशय पडून मतीला भ्रम झाला असेल यांत संशय नाहीं. एका चोवीस तासांत छपन्न दक्षन मेजवान्या, भेटी, दीपोत्साह व बाल. बिचाऱ्या राजपुत्राचे मनास अवसर तरी होता काय. अन्नावर अन्न आणि वस्त्रावर वस्त्र. प्रिन्स आफ वेल्सची तरी ही स्थिति होणार! ते जेथें जातील तेथील लोक उजळ पोषाख करतील, दिवे लावतील, देणग्या देतील, नाचतील व नागडतील. हा होईल एक अगर दोन दिवसांचा खेळ, परंतु वर्षभर बसतील त्यांचें पारणें फेडीत. प्रिन्स आफ वेल्स यांस ही मोठी मौज वाटेल. लोक श्री० वाटतील कारण अशा एक दोन दिवसाचे धुमाकुळांत जेवढें चांगलें तेवढेंच त्यांचे नजरेस पडेल. परंतु याचा काय उपयोग. इंग्रजी अमलांत हजारों प्राणी अन्न अन्न करतात ते नजरेस पडतील काय? रत्नागिरी वगैरे पुष्कळ ठिकाणीं अर्धा कोंडा व अर्ध्या कण्याचा भात त्यांचे नजरेस पडेल काय? कित्येक युरोपियन गुराप्रमाणें नेटिवांस मारतात तें त्यांचे नजरेस पडेल काय? सरकारचें पोलीस गरीब रयतेवर जुलूम करतात त्याचा त्यांस अनुभव येईल काय. सारांश आज सर्व हिंस्थानभर जुलूम ह्मणून जी ध्वनी निघत आहे ती त्यांचे कानीं जाईल काय? नाहीं तर मग शेकडों असे राजपुत्र येथें आले तर आह्मा गरिबांस काय उपयोग. आमचे संस्थानिक लोकांची तर केवढी हवेलंडी होणार? नांव सोनाबाई आणि पायांत कथलाचा वाळा. आपल्या नावाप्रमाणें दरजा तर राखला पाहिजे? ह्मणून प्रिन्स आफ वेल्स आल्यास या संस्थानिकांच्या सावकारांची मात्र चंगळ! असो, सारांश इतकाच कीं, हे राजपुत्र येणारच तर येऊं द्या! आह्मी त्यांचा मान मरातब तंतोतंत ठेवूं, परंतु आह्मा गरीब रयतेस जो विनाकारण शीण होईल त्याची आठवण मात्र पुष्कळ दिवस राहील. राजनिष्टेनें वागणें हें आमचें ब्रीदच आहे, परंतु राजानें आम्हावर कृपादृष्टी ठेवावी येवढेंच मागणें, नाहीं तर

॥ आले आले गेले गेले ॥
॥ वाया लोकां भागविलें ॥

ज्ञा. प्र.

हें पत्र अकोलें एथें खंडेराव बाळाजी फडके यांचे वऱ्हाडसमाचार छा. छा. प.

REGISTERED NO 5, 1875

# वऱ्हाडसमाचार.

पुस्तक ९ अकोला, रविवार ता० ११ माहे एप्रिल सन १८७५ इ० अंक १५

## जाहिरात.

### वऱ्हाडसमाचाराचीकिंमत.

| | रु. |
|---|---|
| वर्षाचे अगाऊ | ५ |
| सालअखेर | ७ |
| फुटकळ अंकास | ०४ |
| डांकहशील | |
| वर्षाचे अगाऊ | १०८ |
| " अखेर | २ |

नवीन वर्गणीदार होऊ इच्छिणारे लोकांकडून आगाऊ वर्गणी आल्या खेरीज पत्र सुरू केलें जाणार नाहीं.

### नोटिसीबद्दल.

| | |
|---|---|
| मराठी, दर ओळीस | ०१०६ |
| तीच नोटिस दुसरे खेपेस | ०१ |
| इंग्लिश लिपींत दर ओळीस | ०४ |
| " दुसरे खेपेस | ०२ |

GREAT INDIAN PENINSULA RAILWAY
CONVEYANCE OF COTTON
TO COLABA SIDINGS
NOTICE.

### नोटिस.

### ग्रेट इंडियन पेनिनसुला रेलवे.

कुलाबा येथील साइडिंग्सकडे कापुस नेणें.

या लेखाच्या द्वारानें जाहिरखबर दिली जाते ऐशीजे, एप्रिल महिन्याची तारीख १ ली गुरुवार या दिवशीं आणि या दिवसांनंतर दुसरी जाहिरखबर देईपर्यंत या कंपनीनें मुंबईत आणलेला कापूस, जर मालक सांगतील तर, थेट कंपनीच्या कुलाबा येथील साइडिंग्सकडे नेण्यांत येईल.

या रेलवेकडून जास्ती अंतरावर कापूस नेला जाईल त्याबद्दल ही कंपनी मुंबईस कापूस आणण्याविषयीं साधारण नेहमीं जें हशील घेते त्याखेरीज दर मणास एक पै प्रमाणें जास्त हशील घेण्यांत येईल.

कुलाब्यास कापूस रवाना केला असल्यास मुबईतील दुसऱ्या स्टेशनावर करतात त्याप्रमाणेंच "साइडिंग्स" येथें कापूस स्वाधीन करून घेण्याची तजवीज खासगी रीतीनें कापूस रवाना करणारांनीं स्वतःच केली पाहिजे.

एक दिवस अथवा एक दिवसाचा भाग याबद्दल दररोज दर मणास चार आणे, कापूस पोंचल्यापासून २४ अवरांच्या आंत तो घेऊन जाण्याची तजवीज न केल्यास, सर्व कापसावर वखारीचें भाडें ह्मणून आकार घेतला जाईल.

कापूस कुलाबा येथील "साइडिंग्स" कडे रवाना करावयाचा आहे असें तो रवाना करणाऱ्यांनीं रवानगीचिठींत लिहिलें पाहिजे. याप्रमाणें कुलाब्यास कापूस रवाना करण्याविषयीं हुकूम नसल्यास आजपर्यंत येत होता त्याप्रमाणें तो बोरीबंदर येथें आणिला जाईल.

**हेनरी कांडर,**
जनरल ट्र्याफिक म्यानेजर.

मुंबई ता० २२ माहे मार्च
सन १८७५ इसवी.

## जाहिरात.

स्त्रीगीतसंग्रह. भाग तिसरा.
किंमत आणे ६ सहा.

पहिल्या दोन भागांप्रमाणेंच ह्यांत स्त्रियांच्या ह्मणण्यांतयेणारीं अशीं देवादिकांच्या रसाळ कथेचीं गाणीं असून चित्तरंजनार्थ उखाणे आहेत. गाण्याचा भावार्थ कठीण शद्बांवर टीपा इत्यादि पूर्ववत् आहेत.

ज्यांस हें पुस्तक घेणें असेल त्यांनीं खालीं सही करणाराकडेस डांकहशीलासुद्धां किंमत आणे ७ सात पाठविली असतां पुस्तक रवाना करण्यांत येईल.

महादेव गोपाळ पठवर्धन,
क्लार्क निसबत जनरल ट्राफिक
म्यानेजर, जी. आय. पी रेलवे
मुंबई, बोरीबंदर.
मुंबई, गणेशवाडी, नाना शेंडे याची चाळ

## नोटिसा.

नोटिस—मेहेरबान न्यु बिरार कंपनी लिमिटेडचे एजंट मुक्काम अकोट यांस सटवा वल्लद कोंडी माळी हमाल व बळी वल्लद बापुजी शेलार हमाल वस्ती रेलवेस्टेशन अकोलें यांजकडून नोटिस देण्यांत येते कीं, आपले प्रेसाचें सामान अकोल्याहून अकोटास पोंचविण्याबद्दल जानू वल्लद कचरू महार यानें कंत्राट घेतलें होतें तें त्यानें आह्मास देऊन आमच्या मार्फत आपणाकडे माल रवाना करविला. व त्याप्रमाणें आह्मी तो सर्व माल आपणास दिला आहे. असें असतां जानू यानें आमचे ठरावाचे रुपये आह्मास दिले नाहींत दगाबाजी केली त्याजबद्दल त्यावर तजवीज करावयाची आहे परंतु त्या अगोदर आपणास कळविण्यांत येतें कीं जानूचा त्याबद्दलचा पैसा आपणाकडे जो देणें निघत असेल तो कृपाकरून त्यास आपण देऊं नये. जानूचा आमचा निकाल होईपर्यंत अमानत ठेवावा. मेहेरबानांस कळावे तारीख ५ माहे एप्रिल सन १८७५ इ.

( सह्या ) बळी बापुजी सेलार
सटवा कोंडी माळी
दस्तुर खुद्द.

नोटिस—संभाजी वल्लद नथुजी वस्ती मौजे शेलु तालुके अकोलें यांशीं नोटिस देणार रेणी मर्द संभाजी वस्ती अकोलें. मी तुह्मी लग्नाची बायको आहें व मला तुझे पोटच्या दोन मुलीही झाल्या आहेत. तुह्मी पूर्वींपासून अकोल्यास रहात होतां मजला तुह्मी अकोल्यास ठेवून सुमारें अडीच वर्षें झालीं. लग्नाचे निमित्त्यानें मौजे मजकुरीं गेला असोन आपण परत येत नाहीं अकोल्यास तुमचें घर होतें त्यांत मी कांहीं दिवस राहिल्यें नंतर मजला खाण्यास नसल्यामुळें पुढें मी आपले बापाचे घरीं मुलीसुद्धां येऊन राहिल्यें. मी आपले बापाकडून व पंचांकडून पुष्कळ पत्रें लिहविलीं कीं आपण येऊन मजला घेऊन जावें व माझे अन्न व खर्चाची सोय करावी ह्मणोन कळविलें परंतु स्वतां आपण कांहीं येत नाहीं व मला घेऊन जात नाहीं व अन्नवस्त्रही देत नाहीं याबद्दल या नोटिसीनें कळविते कीं या नोटिसीचे तारखेपासून ८ दिवसांत येऊन मला घेऊन जाऊन अन्नवस्त्र द्यावें तशी तुमची मर्जी नसल्यास मला सदरी लिहिल्या मुदतींत फारकती करून द्यावी याप्रमाणेंही न कराल तर पुढें तुमचेवर ८ रुपये प्रमाणें दरमहा मागील अडीच वर्षेंपर्यंत अन्नवस्त्र मी आपले बापाचे घरीं राहून खाल्लें त्याबद्दल तुह्मापासून खर्चा सुद्धा फिर्याद करून पैसा घेतला जाईल व पुढें मी दुसरा पाटाचा नवरा करीन. कळावे तारीख ४ माहे एप्रिल १८७५ इसवी.

( सही ) रेणी मर्द संभाजी निशाणी हातची बांगडी

**वऱ्हाडसमाचार**

मिती चैत्र शुध्ध ६ शके १७९६

## पुण्याच्या लोकांचा स्तुत्य उद्योग.

अलीकडे सार्वजनिक हिताच्या बहुत गोष्टीमध्यें पुण्याचे लोक अग्रेसर असतात व त्यांतील कित्येक गोष्टींत त्यांनां चांगलें यशही आलेलें आहे हें पाहून आह्मांस संतोष वाटतो. बडोद्याच्या चौकशीच्या कामीं हाय कमिशनांत नेटिव थोर गृहस्थ निमें तरी नेमावे ह्मणून पुणेंकरांनीं हिंदुस्थान सरकारास अर्ज केला होता त्याचा विचार होऊन २ राजे व एक दिवाण असे तीन नेटिव गृहस्थ त्या कामिशनांत नेमिले गेले हें आमचे वाचकांस ठाऊक झालेंच आहे. हल्लीं बडोद्याच्या चौकशीचें काम पुरें झालें, तींत श्रीमंत रा. मल्हारराव गायकवाड यांवर शाबीद होण्यासारखा कांहीं प्रकार न दिसून बरीच लटपट उघाडीस आली व हिंदुस्थान सरकारचा आखेरचा ठराव बहिर पडण्यास अजून अवकाश आहे असें पाहून त्या बाबदींत आपले रयतेचे उद्गार हिंदुस्थान सरकारास कळावे ह्मणून पुण्याच्या लोकांनीं पुन्हा रास्त्याचे वाड्यांत दोन आठवड्यापूर्वीं आणखी येक मोठी सभा करून तींत सर्व संमतानें बडोद्याच्या बाबदींत एक अर्ज पाठविण्याचा ठराव केला व तो अर्ज तयार करून हिंदुस्थान सरकारास पाठविला. त्याची एक प्रत पुण्याच्या मंडळीनीं आह्मांकडे पाठविली आहे तिजबद्दल आह्मी त्यांचे आभार मानितों व हा अर्ज तयार करण्याची त्यांनीं योग्य वेळीं उत्तम संधी साधीली याबद्दल संतोष मानितों. असे अर्ज ठिकठिकाणाहून व्हावे हें अती अवश्यक आहे व त्याप्रमाणें सातारा खानदेश वगैरेकडे खटपट चालू आहे हें ऐकूनही आह्मास संतोष होतो. आमचे वऱ्हाड प्रांतांतूनही असा एक अर्ज जावा अशी बहिरील लोकांस मोठी उमेद व तशी आह्मासही इच्छा आहे परंतु तिचे सुफलतेविषयीं आह्मी फार साशंक ह्मणून तसें कांहीं इकडे घडतें नाहीं याजबद्दल निरुपाय समजतों. तरी आगच्या वऱ्हाड प्रांताच्या लोकांस बाहेरील प्रजा आपलें कर्तव्यकर्म कशी बजावते हें वेळोवेळ कळवित गेल्यानें कालांतरानें तरी त्यांनां आपले कर्तव्याविषयीं उत्साहबुद्धी उत्पन्न होईल अशी आह्मी आशा करितों.

पुणेंकरांनीं हा जो नवीन अर्ज हिंदुस्थान सरकारास पाठविला आहे हा मोठ्या शहाणपणाचा व पोक्त विचाराचा आहे याजवर हजारों लोकाच्या सह्या झाल्या आहेत. या अर्जांत हिंदुस्थान सरकारानें नेटिव कमिशनर नेमिल्याबद्दल व त्यांची निवड चांगली केल्याबद्दल स्तुती करून आभार मानिले आहित व पुढें दुर्दैवानें असे प्रसंग आल्यास अशाच मार्गाचें अवलंबन करण्याविषयीं सरकारास शिफारस केली आहे. चीफ जस्टिस कौच साहेब यांस या कमिशनाचे अध्यक्ष नेमिलें आहे त्या अर्थीं योग्य इनसाफ होण्यास कांहीं शंका नाहीं असें हिंदुस्थान सरकारास त्यांनीं सुचाविलें आहे. तसेंच चौकशीमध्ये श्री० मल्हाररावांवर आणिलेला आरोप फार दुर्बल होता व तशा फुसक्या आरोपावरून इंग्रज सरकारच्या न्यायाच्या कोणत्याही कोर्टास, जुरीस, अथवा असेसरास आरोपिताला शिक्षा देतां येणार नाहीं असें सुचवून मल्हाररावांवर शाबिदी दिसत नाहीं त्यावरून त्यांची गादी त्यांस आपण न्यायानेंच देउं शकाल अशी ही ध्वनी गर्भित केली आहे, व शेवटास हेंही सांगितलें आहे कीं मराठी राज्यें व त्यांतील रेसिडेंट यांचें प्रेम परस्पर कसें असतें व एकमेकांचीं येक एक बातमी मिळविण्यास व खबदव कर

त्यास कसे तत्पर असतात व तशामुळें परिणाम काय होऊं शकतो ही गोष्ट हिंदुस्थान सरकारापुढें ठेऊन या पुढें या कामीं कांहीं सुधारणा होण्याविषयीं हिंदुस्थान सरकारानें लक्ष्य द्यावें अशीही त्यास पुण्याच्या मंडळींनीं शिफारस केली आहे.

## श्री० मल्हारराव गायकवाड.

या आठवड्यांत दररोज ज्यीं वर्तमान पत्रें व तारेंतील वातम्या आह्मी वाचीत गेलों त्यावरून याच आठवड्यांत श्री० मल्हारराव गायकवाड यांस पुन्हा राज्यावर बसविलें हें लिहिण्याचा आनंद कारक प्रसंग या अंकांत येईल असें वाटलें होतें व त्याकरितां काल दोन प्रहरची डाक येई पर्यंत आह्मी त्या मजकुराची चातकापरी वाट पाहिली परंतु तो योग घडून आला नाहीं.

या चौकशीचें कागदपत्र विलायतेंत गेले त्यावरून गायकवाडावर विनाकारण मुकदमा सुरू केला याजबद्दल तिकडील लोकांनीं हिंदुस्थान सरकारास मोठा टपका दिला. व गायकवाडावरिल आरोप फारच दुर्बळ आहे सबब त्यांस पुन्हा गादीवर बसवावें, क्षुल्लक गोष्टीवरून गायकवाडावर आरोप-आणिला ही मोठी चूक आहे व अशा चुका पुन्हा होऊ देऊ नयेत असेंही लंडन टाइम्स, डेली टेलीग्राफ वगैरे विलायतच्या पत्रांतून लिहिलें आहे.

हिंदुस्थान सरकारास कमिशनचा रिपोर्ट पोंचल्यावर त्यांनीं विलायतेस स्टेट सेक्रेटरीकडे तारेंतून खबर कळविली त्यावरून गेल्या मंगळवारीं लंडन येथें इंडिया कौंसिलाची स्पेशल सभा भरली होती पण तींत काय ठराव झाला तो अजून बाहेर पडला नाहीं असें विलायतेहून वर्तमान आलें आहे.

आह्मांस भरवसा आहे कीं एक दोन दिवसांत हा ठराव बाहेर पडेल. व ईश्वर करो आणि तो ठराव श्री० मल्हारराव यांस पुन्हा राज्यावर बसविण्याविषयीं असो.

## बांबेग्याझेटकर्त्यावर फिर्याद.

नेटिवांच्या हिताविषयीं सर्वकाळ बहुतांशीं विरोधी असें मुंबईस ग्याझेट या नावाचें नियाचें एक इंग्रजी वर्तमानपत्र आहे. त्यानें बडोद्याच्या चौकशीच्या कामांत विरुद्ध लिहिण्याची तर केवळ कमालच केली. कर्नल फेर यांस विषप्रयोग झाल्याची गोष्ट बाहेर निघाली मात्र, तोंच ग्याझेट कर्त्यानें अकलेचा दिवा पाजळला कीं हें कृत्य मल्हारराव गायकवाड यांनीं केलें असावें. तस्मात इंग्रज सरकारानीं त्याला गादीवरून काढून काळ्या पाण्यावर पाटवावें व राज्य खालसा करावे. चौकशी वगैरेची कांहीं जरूर नाहीं. पण असल्या मूर्खपणाच्या व अविच्याराच्या गोष्टी सरकारानें ऐकिल्या नाहींत, कारण त्या एके ण्यास अमर्याद होत्या. पुढें सरकारानें हाय कमिशन नेमिलें व चौकशी सुरू झाली तरी ग्याझेट कर्त्याची दोषदृष्टीची तुतारी वाजतच होती. नंतर अभिप्राय लिहिण्याचें काम मुंबईस चालू झालें व कांहीं जणांचे अभिप्राय गायकवाड दोषी नाहींत असें असल्याची वदंता बाहेर पडली त्या बरोबर ग्याझेटकर्त्यानें पुन्हा नेटिवावर आपलें गालिकास्त्र उचललें. एके पत्रांत ग्याझेटानें असें लिहिलें होतें कीं महाराज शिंदे व सर दिनकरराव यांचीं मनें गायकवाडाचे वकिलीचें काम करणारानें त्यांच्या घरीं खेपा घालून वळविलीं व त्यांकडून गायकवाडास अनुकूल असे अभिप्राय देवविले- ही गोष्ट शिंदे व सर दिनकरराव यांस अत्यंत दूषणास्पद होय सबब त्यांनीं अब्रू घेतल्याची फिर्याद तात्काल करावयाची परंतु ते थोर लोक ह्मणून त्यांनीं तसल्या हलकटाशीं साम्ना करूं इच्छिला नाहीं, पण सर्वांनींच तसें स्वस्थ बसणें बरोबर नाहीं ह्मणून गायकवाडतर्फे कमिशनांत वकील असलेले थोर गृहस्थ मि० शांताराम नारायण यांस तो अपमान सहन झाला नाहीं व त्यांनीं ग्याझेटकर्त्यावर माजिस्त्रेट कोर्टांत रा० बा० नाना मोरोजी यांपुढें लायबलची फिर्याद दिली त्यावरून त्या पत्राचे मालक व प्रसिद्ध करणारे मि० म्याक्लिन साहेब यांस समन्स झालें. त्यांनीं आपलेवती वकील दिला व त्यानें डिफेन्सची तयारी केली नव्हती ह्मणून गुरुवारपर्यंत मुदत मागून घेतली.

गुरुवारीं रा. बा. नाना मोरोजी यांपुढें या फिर्यादीची चौकशी सुरू झाली. मि० म्याक्लीन -बांबेग्याझटचे छापणारे व प्रसिद्ध करणारे आणि त्यांचे सालिसिटर मि० क्रेग हजर होते फिर्यादीतर्फे मि. पेन यांचें भाषण झाल्यावर मि. शांताराम यांची जबानी झाली व एक साक्षीदार मि. रघुनाथ नारायण खोटे यांची साक्ष झाली व दोघा सालीसिटरांचे दरम्यान वादविवाद झाले. म्याक्लीन साहेबांचें एक पत्र हजर करण्याकारितां पुन्हा शनवार पर्यंत मुकद्दमा तकूब झाला आहे. व हा सेशनपर्यंत न जातां माफीवर मिटेल असें धोरण दिसतें.

## स्त्रीगीतसंग्रह

### भाग तिसरा.

या पुस्तकाचे पहिले दोन भाग रा० महादेव गोपाळ पटवर्धन मुंबईच्या रेलवेपैकीं क्लार्क यांनीं छापून प्रसिद्ध केलेले आमचे वाचकांस माहीत असतीलच. त्यांनीं सांप्रत त्याच प्रकारच्या गाण्याचें तिसरें पुस्तक छापून प्रसिद्ध केलें आहे व त्याची एक प्रत आह्मांस पाठविली तिजकरितां आह्मी त्यांचे अभार मानितों.

पटवर्धन यांनीं स्त्रियांचे उपयोगाकारितां चालविलेला क्रम फार हितावह आहे व त्यांच्या पुस्तकाचा चांगला खप [illegible] आहे असें त्यांचेच लिहिण्यावरून समजून आह्मास संतोष होतो- व या उत्साहानें ते ही उत्तेजित होत्साते या ग्रंथाचे ४थे ५वे ६ वे भाग लवकरच छापून प्रसिद्ध करितील अशी आह्मी उमेद बाळगितों.

गाणीं मिळविण्याची व तीं सुव्यवस्थित रीतीनें छापण्याची पटवर्धन मजकूर हे चांगली खटपट करितात वत्यायोगें स्त्रियांस तशींच पुरुषासही त्यांचीं पुस्तकें उपयुक्त होतात याजबद्दल त्यांची आह्मी तारीफ करितों.

## वऱ्हाड

कालच्या शनिवारच्या मागील शनिवारीं जुडिशियल कमिशनर कोर्टांत मि० ब्रान्सन साहेब बारिस्टर मुंबईहून आले होते. खामगावचे सावकार शेट दुलीचंद ओंकारदास यांणीं आपला मुनीम साहेबराम याजवर १८००० रुपये बाकी घेण्याविषयीं डिपुटी कमिशनर कोर्टांत फिर्याद लाविली होती ती मुदतींत नाहीं ह्मणून त्यांनीं काढून टाकिली तिजवर हें अपील होतें व दुलीचंदाचे वतीनें ब्रान्सन साहेब बारिस्टर होते त्यांनीं फिर्याद मुदतींत आहे असें प्रतिपादन केलें व ती त्यांची तक्रार जुडिशियल कमिशनर साहेबांनीं मंजूर करून डिपुटी कमिशनर साहेबाकडे मुकद्दमा चालविण्याकरितां पाठविला.

रा. रा. हणमंतराव रामचंद्र मेहेकरचे तहशिलदार ८ दिवसांची रजा घेऊन मुलीचे लग्नाकरितां उमरावतीस गेले होते ते तो लग्नसमारंभ आटपून व एथें येऊन मेहेकरासपरत गेले.

जुडिशियल कमिशनर साहेबासमोर १६वे व १७वे तारखेस सेशन चालणार आहे. मुकद्दमे २ आहेत. प्रासिक्युटर कोण नेमिले समजलें नाहीं. दरखेपेस दर मुकद्दम्यास नवा नवा प्रासिक्युटर नेमण्यापेक्षां सरकार एका हुशार वकिलाची कायम नेमणूक करील तर बरें होईल.

अकोल्याच्या म्युनिसिप्यालिटीनें गेल्या आठवड्यापासून अकोल्यास आठवडे बाजारावर बजारसेस नामें पट्टी घेण्याचा ठराव करून तो अमलांत आणिला. रविवारीं सुमार ४० रुपये उत्पन्न झाले.

मूर्तिजापुरचे वामनराव गोविंद जमादार यांनीं कुळाचे रोखे ग्रहणात मांगास दान देण्याची धमकी कुळास दिल्यावरून मि० मुबारकअली तहशिलदार यांपुढें त्यावर फौजदारी मुकद्दमा झाला आहे व तहशिलदाराचें आपलें नीट नाहीं सबब हा मुकद्दमा त्यांपुढें चालू नये अशाविषयीं जमादार यांणीं बारिस्टरच्या अभिप्रायासहित उमरावतीस डिपुटी कमिशनर साहेबाकडे अर्ज केला होता पण तो नामंजूर झाला. आतां हा मुकद्दमा कधीं चालणार तो पहावा. बहुत लोकांचें लक्ष्य याकडे लागलें आहे. व ग्रहण नुकतेंच होऊन गेलें तर त्या दिवशीं त्यांनीं धर्मवासनेनें दानार्थ सिद्ध ठेविलेले रोखे संकल्पाप्रमाणें मांगास दिले किंवा नाहीं व त्यांपासून करार करून घेतला किंवा नाहीं तें समजत नाहीं. याजकरितां जमादार मजकूर ही गोष्ट कळवितील तर त्यांची दानशूरता व धारिष्ट सर्वांस चांगलें कळून येईल.

अडगावचे एकस्ट्रा असिस्टंट कमिशनर रा. रा. पुरुषोत्तमराव नारायण यांचे कोर्टांत काम बरेंच तुमलें असल्यामुळें इकडून रा. रा. गोविंदराज अय्या तहशिलदार मदतीस पाठविण्याचा विच्यार निघाला होता तसेंच पुरुषोत्तमराव यांकडून अधिक काम होणार नाहीं तर मेहनत घेऊन पुष्कळ काम करणारे रा. रा. श्रीकृष्ण नरहर यांस त्या जागेवर नेमिलें जाईल असेंही त्यांस कळविलें होतें असें ऐकितो व त्यावरून पुरुषोत्तमराव यांनीं आपणास मदत नको व आपणच अधिक काम करीत जाऊ असें कळविलें त्यावरून तो बेत रहित झाला व अलिकडे पुरुषोत्तमराव यांनीं मेहनत घेऊन पुष्कळ फैसल केले असें समजतें. ही गोष्ट वाचून आश्चर्य वाटतें. अस्तु. पुरुषोत्तमरावांनीं हेकेडपणा न करितां वरिष्ठांच्या कलाकडे डोल दिला हें बरें केलें.

अकोला हायस्कुलांत ५० रुपयांच्या असिस्टंट मास्तरची जागा रिकामी आहे तिजवर रा. अंताजी नारायण सिरपुरचे मास्तर यांस नेमिल्याचें कळतें. म्याट्रिक्युलेशन पास झाल्याखेरीज कोणास हायस्कुलांत नेमावयाचें नाहीं असा डायरेक्टर साहेबांचा मागें ठराव झालेला असतां हे बिनपरिक्षेचे गृहस्थ नेमून जुन्या नियमास हरताळ लावण्याची अवश्यकता कां उत्पन्न झाली तें कळेल तर बरें होईल. कारण जाहिरनामा लाविला असतां एवढ्या जागेवर मुंबईहून म्याट्रिक्युलेशनवालेच काय पण लिटिलगो पासही मिळाले असते यांत संशय नाहीं असें बहुतांचें मत आहे याकरितां विद्याखात्यानेंच विद्याबंधन संबंधाचें काम, नियमाचा भंग करून, करणें अप्रशस्त होय असें आह्मांस वाटतें.

देऊळघाटच्या नबाब साहेबांचे चिरंजीव मे० सलामुलाखान साहेब हे अकोल्यास हायस्कुलांत विद्याभ्यास करण्याकरितां आले आहेत ही गोष्ट त्यांस मोठी स्तुत्य समजली पाहिजे.

चिखलीस नवीन नेमणूक झालेले तहशिलदार मि० लक्ष्मण बाळाराम हे आपले कामावर रुजू होऊन तेथून मि० अबदुलबारी तहशिलदार हे इलिचपुरास आपले नेमणुकीवर जाऊन रुजू झाले.

इकडे गुरांच्या रोगाची सांत आली आहे. अकोल्यांत पुष्कळ लोकांचे चांगले चांगले बैल, गायी, व म्हशी एकेक दोनदोन दिवसांचे आजारानें तडकाफडकीं मरण पावल्याचें आमचे पाहण्यांत आलें आहे. या रोगावर सरकारमार्फत कांही दवा प्रसिद्ध होईल व ती लोकांस देण्याची तजवीज केली जाईल तर फारचांगलें होईल.

उमरावती—मे० ग्रांट साहेब यवतमाळ्याकडेस रेजिस्ट्रेशनचीं दप्तरें तपासण्याकरितां गेले होते ते गेल्या बुधवारीं परत आले.

मे० लैन साहेब ज० इ० आ० पी० हे चिखलदऱ्याकडे गेले आहेत.

जळगाव—येथील माजि रजिस्टूर कारकून विष्णुपंत यांची लटपटीची वर्तणूक कधीं कधीं तेथील पेषकार रा० मोहनीराज गोविंद यांचे दृष्टोत्पत्तीस आली असतां त्यांनीं तिकडेस कनाडोळा केला सबब त्याबदल त्यानां ही वरीष्ट अधिकाऱ्यानीं दोष दिला आहे; असें कळतें.

वणी—येथें ए० अ० क० रा० रा० आत्माराम भिकाजी यांचें कोर्ट आहे तें तेथून हलवून राळेगावास नेऊन स्थापन करण्याचा विचार आहे. प्र. सिं.

---

## मागाहून आलेल्या नोटिसा.

नोटिस—पांडू वल्लद विष्णाजी पाटील रहाणार सांगवी यांस चोखाराम कनुलाल दुकान सांगवी उपरी तुह्मी करार केला होता कीं एका महिन्यांत दस्तैवज करून देईन त्यास फार दिवस झाले दुसरी सालबंदी आली आतां आठ दिवसांत आह्मास दस्तैवज करून देणें व रुपये सालबंदीचे देणे, नाहींतरएकदम फिर्याद करून नोटिशीचे खर्चासुद्धा रुपये देणें पडेल कळावे तारीख १० माहे एप्रिल सन १८७५ इसवी.

( सही )चोखाराम कनुलाल
दस्तुर खुद.

---

नोटिस—बंकुलाल बुलाखीदास दुकान मालेगाव तालुके अकोट यांस लक्ष्मण व जानकीराम वल्लद बापु आपा खानदेशे दुकान सोनाळें तालुके जळगाव यांजकडून नोटिशीचा जबाब देण्यांत येतो तो.

तुह्मी आह्मांस तारीख २१ माहे मार्चचे वऱ्हाडसमाचारांत नोटिस दिली ती केवळ तुह्मी आपले मर्जीप्रमाणें लिहिली आहे. ह्मणजे कराराबाहेरे कित्येक गोष्टी तींत लिहिल्या आहेत त्या अशा—

आह्मी २१०० रुपयांस कापडाचें दुकान, गोखाना, कपडा, व उधारी रा० रावजी राघव देशपांडे व दुसरे ४ भले गृहस्थ यांच्या विद्यमानें तुह्मास दिली. तींत उधारीचीं मोहगम याद कागदांत असेल तितकी द्यावयाची असें ठरलें होतें. २२०० रुपयांची उधारी देण्याची मुळींच ठरली नव्हती. उधारीचा अडसटा दिला नाहीं ह्मणता ती गोष्ट खोटी आहे. रावजी राघवाचे हातानें तो तुह्मास दिला आहे. वहीखातें व वेचनखत देण्याचा मुळींच करार नव्हता व त्याबद्दल कधीं तुह्माकडून मागणें आलें नाहीं व आह्मी त्याबद्दल वायदा केला नाहीं. तुह्मी बातल लिहितां २१०० रुपयां संबंधी उधारी कपडा व घरें तसेंच रोखिपुरजें वगैरे जे कांहीं त्या व्यवहारासंबंधी देणें होतें तें सर्व आह्मी तुह्मास त्याच वेळीं दिलें आहे आतां कांहीं एक मिळणें राहिलें नाहीं तसेंच असाम्यांची समजूत करून देण्याची जबाबदारी तुह्मी आह्मावर ठेवता तसा करार मुळींच नाहीं सबब आह्मांस कबूल नाहीं. तुमची तुह्मी घेणें प्रकारें समजुत घ्यावी. व आह्मांस विनाकारण नोटिसदिल्यामुळें हा जबाब द्यावा लागला याचा खर्च द्यावा. व आमचे वहीवर तुह्माकडे खातेवाकी सुमार ४० रुपये निघते ती पाठऊन द्यावी. नोटिस पोचल्यापासून ८ दिवसात याप्रमाणें निकाल केला नाहीं तर कायद्याप्रमाणें तुह्मावर तजवीज केली जाईल. व दुकानावर येऊन हुजूत करता त्याबद्दल फौजदारी केली जाईल. कळावे तारीख ९ माहे एप्रिल सन १८७५ इसवी.

( सही ) लक्ष्मण व जयराम वल्लद
बापु आपा शेट खानदेशे
दस्तुर मोहोनलाल यशवंत
राय गुमास्ते दस्तुर खुद.

---

नोटिस—माहादु वल्लद गोपाळ सुतार वस्ती मोजे कान्हेरी प्रगणे व तालुके बाळापूर जिल्हा अकोला यांस खालीं सही करणार हिजकडून नोटिस देण्यांत येते कीं मी तुझी लग्नाची बायको असून सुमारें लग्नास बारा तेरा वर्षें झालीं तेव्हां मी अज्ञान होते त्यानंतर ह्मणजे लग्न झाल्यावर अजमासें एक वर्षानें मूळ पाठवून मजला नेलें होतें असें माझे आई आणि भाऊ कळवितात पण मजला तेंहीदेखील आठवत नाहीं कारण ते वेळेस मी अजमासें साडेतीन वर्षांची असेन त्यातागाईत आजपावेतों अका बारा वर्षें होऊन गेलीं, परतु स्वतां तुह्मी किंवा तुमचें कोणीच मजला नेण्यास आलें नाहीं याजकरितां आतां नोटिशीनें तुह्मास असें कळविण्यात येतें कीं मी तुह्मास खानदेशवैभवांत एक महिन्याचे मुदतीची नोटिस दिली व त्यांत मजकूर कीं दहीं वर्षांचे अन्नवस्त्राचा खर्च ४०० रुपये माझे आईभावांस देऊन मजला घेऊन जावें ती नोटिसतुह्मास पावली आहेच परंतु तुमचेकडून त्याजबद्दल कांहींच उत्तर नयेतां व तुह्मीही आले नाहीं यावरून माझी पक्की खात्री झाली कीं, तुह्मास माझी गरज नाहीं हें दिसून आलें आहे यामुळें मीही आतां तुह्मापाशीं राहण्यास राजी नाहीं कारण तुमचे नावावर बसून व्यर्थ संसार जात आहेयास्तव दुसरा नवरा करण्यास इच्छित आहें तरीही नोटिस पावल्यापासून आठ दिवसांचे आंत फारकती लिहून रजिष्टर करून मजकडे पाठवावी व आजपर्यंत मी आपले बापाभावांचे घरीं राहिल्यें त्याजबद्दल दरसाल ४० रुपयेप्रमाणें अका वर्षांचे ४४० रुपये अन्नवस्त्राबद्दल खर्च पाठवावा. सदरहू लिहिल्याप्रमाणें तुह्माकडून वर्तन न झाल्यास मी या नोटिशीचे आधारें दुसरा नवरा करीन तसेंच वरील लिहिलेले खर्चाबद्दल दिवाणीकोर्टांत दावा करून ही व यापूर्वीं जी नोटिस दिली त्यांचे खर्चासुद्धां भरून घेईन हें पक्कें समजावें. कळावें.

तारीख ९ माहे एप्रिल सन १८७५ इ०.

( सही ) पुती बापाचें नाव खंडु सुतार हल्लीं वस्ती कसबेंएदलाबाद
तालुके भुसावळ जिल्हा खानदेश निशाणी खुद्द हातची
बांगडी.

नोटिस—सखाराम वल्लद संभाजी लोहार रहाणार शहापुर तालुके बाळापुर यांस रुकमीण मर्द सखाराम लोहार इजकडून नोटिस देण्यांत येते कीं तुझ्याशी माझें लग्न बाळपणीं झालें तेव्हां मला कांहीं कळत नव्हतें हल्लीं मला पदर येउन ५।६ वर्षें झालीं तेव्हां पासून तूं मला भावाचे घरीं टाकिलें आहेस अन्न वस्त्र देत नाहींस व गावीं नेउन वागवीत नाहींस न वागविण्याचें कारण ही मला पदर आल्यानंतर कळून आलें आहे तें आतां चौघांत प्रसिद्ध करण्याची जरूर नाहीं पण तुला इतकेंच कळवितें कीं तुला बायकोचा कांहीं उपयोग नाहीं याजकरितां माझा जन्म तूं व्यर्थ घालूं नयेस. मला लग्नाची सोडचिठी द्यावी ह्मणजे मी गंधर्वाचा दुसरा घरठाव करीन व तुझीही अडचण नाहींशी होइल. इकडे माहेरी माझे पोटगी बदल २०० रुपये खर्च झाला आहे तोही फारकती बरोबरच ही नोटिस पोंचल्यापासून ८ दिवसांत पाठवून द्यावा. याप्रमाणें तूं न केलें तर तुजवर दावा लावून सदरहू दोनशें रुपये भरून घेण्यांत येतील. व तुझा लग्नाचा हक्क कायदेशीर रितीनें रद्द करण्यांत येईल. मग तुझें कांहीं चालणार नाहीं. मी दुसरा घरठाव करीन व या नोटिशीचा आणि फिर्यादीचा वगैरे सर्व खर्च तुझेपासून भरून घेईन. कळावे तारीख ९ माहे एप्रिल सन १८७५ इसवी.

सही ) रुकमीणी मर्द सखाराम
इचे हातची बांगडी.

---

## वर्तमानसार

बडोद्याचे स्पेशियल कमिशनर सर लुई पेली साहेब १२वे तारखेस रजा घेऊन विलायतेस जाणार व त्यांचे जागेवर ह्मैसूरचे चीफ कमिशनर जनरल सर आर मीड यांस नेमिलें.

कुचबिहारचे राजपुत्राचा विद्याभ्यास चांगला होण्यासाठीं त्यांस विलायतेस पाठविणार आहेत.

ह्मैसुरच्या खजिन्यामधून ९००० रुपये कामदारांनीं खाल्ले त्याबदल त्यांच्या खासगी जिनगीचें लिलाव केलें त्यांत ७००० वसूल झाले व २००० रुपये सरकारास भरावे लागले

बंगाल इलाख्यांतल्या सिव्हिल सर्व्हिसवाले लोकांनीं नेटिवांस मोठाल्या जागा मिळतात या पोटदुखीबद्दल विलायत सरकारास गाऱ्हाणें केलें आहे

नागपुरचे पेनशनर राजे श्री० जानोजी भोसले दक्षिणेंत देवस्थानें पहाण्यास गेले होते ते गेले आठवड्यांत नागपुरास परत गेले. त्यांना कल्याणाहून गाडीचा स्वतंत्र पास घेतला होता व तो वाऱ्यानें उडून गेला ह्मणून पुन्हा त्यांनां ५०० रुपये त्या गाडी साठीं द्यावे लागले असें कळतें. सदर्हू रुपये परत मिळण्याविषयीं ते कंपनीस अर्ज करणार होते.

मद्रास शहरांत ड्रेनेज ह्मणजे गटर काढून सर्व मैल नेण्याच्या कामाचें इस्टमेट केलें आहे त्याला २० लक्ष रुपये खर्च लागेल असा अंदाजा आहे.

कृष्णानदीकडे कोळशाच्या चांगल्या खाणी खचीत सापडतील असा कोणा शास्त्रवेत्याचा अभिप्राय पडला होता त्यावरून वेगवेगळे ११ ठिकाणीं सरकारानें मोठालीं भोकें पाडून कोळशाचा तपास केला व त्यावरून असा सिद्धांत झाला कीं त्या भागाला कोळसे मुळींच नाहींत.

सर रिचर्ड कौच साहेब चीफ जस्टिस बडोद्याच्या कमिशनाचा अभिप्राय लिहून ५ वे तारखेस मुंबईहून विलायतेस गेले.

मि. अशबर्नर साहेब मुंबई इलाख्यांतील उत्तर भागचे रिविन्यु कमिशनर तीन महिन्यांचे रजेवर पांचवे तारखेस विलायतेस गेले.

मि० दोराबजी जमशेटजी ताता नावाचा आणखी एक पारशी गृहस्थ या आठवड्यांत सिव्हिलसर्व्हिसचे अभ्यासाकरितां विलायतेस गेला.

बडोद्यास श्री० मल्हारराव गायकवाड यांस नावाची मात्र अटक असून सर्व प्रकारच्या मोकळिका आहेत असें सर लुई पेली साहेब वारंवार ह्मणत असत त्या पोकळ भाषणाचा एक मासला अलीकडे उघडीस आला तो असा:—

विलायतच्या तारांनीं श्री० मल्हारराव याविषयीं जें उमेदीचें वर्तमान आलें आहे तें महाराजांस कळविण्याकरितां त्यांचे सालिसिटर यांणीं सर लुई पेली साहेब यांस अर्ज केला कीं, मि० बळवंतराव मंगेश वागळे बारिस्टर यांस महाराजांस एकान्तीं भेटण्याची परमाणगी मिळावी. त्यांनीं वकीलमार्फत कळविलें कीं, रीतीप्रमाणें आमच्या लोकांच्या समक्ष भेट होईल. एकान्तीं भेट होणार नाहीं. मग, निरुपाय जाणून मि० वागळे महाराजांस डा० सिवार्ड व त्यांचे दुभाषे यांसमक्ष भेटले. महाराज व वागळे यांचें मराठींत जें जें भाषण होई तें तें दुभाषा साहेबास कळवी. महराजांनीं वागळे यांचे भेटीची पुनः पुन्हा आर्तता दाखविली. ते ह्मणाले पेलीसाहेबांस आपली इच्छा कळवू आणि ते हुकूम देतील त्याप्रमाणें करू.

—

वाः ! ही किती सन्माननीय कैद ! व राजास किती योग्य ! माजिस्त्रेटाकडून व सेशनकोर्टापासून शिक्षा पावलेले कैद्यासदेखील आपले वकिलाशीं एकान्तीं बोलण्यास परवानगी असते आणि श्रीमंत मल्हाररावस अशा प्रसंगीं ह्मणजे ज्यावर मुकद्दमाच उत्पन्न करण्याजोगा नव्हता असा जगत्रयांत डंका वाजला त्यांस ती नुस्ती आपले वकिलाशीं बोलण्याचीही परवानगी नाहीं असें ह्मणणें हें किती आग्रहाचें व जुलमाचें आहे याची कल्पना सर्वांस सहज होईल. महाराजांस ही खबर वागळे यांणीं कळविली तेव्हां ते ह्मणाले कीं, पेली साहेब व सिवार्ड साहेब मुख्त्यार आहेत ते जसें सांगतील तसें करावें. अरे रे गरीब बिचारा प्राणी ! ईश्वर त्यास या संकटांतून लवकर मुक्त करो.

इंग्रज लोक आह्मास रशियन लोकां

शीं लढाईची तयारी करावयास सांगतात व आपण स्वतां त्यांच्याशीं सल्यानें वागतात तेव्हां अशा लोकांस ह्मणावें तरी काय असें काबुलेचे अमीर साहिब यांचें आपल्या सरदारांशीं भाषण चाललें होतें असें समजतें

विलायेंतत स्त्रियांनीं शाली पांघरण्याचें बंद केलें.

डा. सिवर्ड विलायेतेस जाण्याच्या तयारींत आहेत असें टै. इं. चा बातमीदार ह्मणतो.

दामोदरपंत, अप्पा, रावजी व दुसरे यांस साक्षी झाल्यानंतर सोडून दिलें. व पुन्हा पकडलें ही गोष्ट अगदीं खरी असून तसें करण्याचें कारण त्यांजवर कांहीं खटले करण्याचा विचार असावा असें ह्मणतात.

मल्हारराव यांस दोषमुक्त करून गादीवर बसवून सर दिनकरराव हे त्यांचे दिवाण होणार अशी गप्प आहे.

नाना खानविलकर व हरीबा गायकवाड यांजवरील खटल्याची चवकशी सुरतेचे जज्ज मि- बर्डवुड यांपुढें होणार असें ह्मणतात.

हैदराबादचे निजाम व त्यांचे शिक्षक या उभयतांमध्यें बेबनाव आला आहे.

मुंबईतील एका कापसाचा व्यापार करणाऱ्या व्यापाऱ्यास धंद्यांत हुंड्यांच्या संबधानें बरीच मोठी अशी एक खोट आल्यामुळें तो जळगावास जाऊन तेथून नाहींसा झाला त्याचा पत्ता अद्यापि लागत नाहीं. तार पाठविल्यावरून या मनुष्यास इगतपूर स्टेशनावर पोलिसानें पकडला होता परंतु त्याजवळ कांहीं पैसा वगैरे माहीं असें आढळल्यामुळें त्यास सोडून दिला. या मनुष्याचें जळगावच्या लोकांचें २० हजार आणि उमरावती एथील लोकांचें ३० हजार याप्रमाणें देणें निघत आहे.

निजाम हैदराबादच्या एका बड्या कुळांतल्या मुसलमान गृहस्थानें थोड्या दिवसांवर वाघाची शिकार मारली त्यावरून एक इंग्रज ह्मणतो कीं नेटिवानें वाघाची शिकार मारल्याचें हें पहिलेंच उदाहरण आहे ह्मणजे आह्मी इंग्रज लोक मात्र वाघांची शिकार मारण्यासारखे शूर असून नेटिव लोकांत तें धारिष्ट नाहीं, आह्मांस मोठा चमत्कार वाटतो! कारण खेड्या पाड्यांतील शेकडो नेटिव लोक एकेकटे जाऊन वाघास मारीत असतात हें अगदीं प्रसिद्ध असून तिकडे हे फुशारखोर इंग्रज पाहतही नाहींत. अ. द.

नाशकास महामारीचे वाख्याचा आजार तारीख २१ माहे गुदस्तपासून सुरू झाला असून अजमासें १५ मनुष्यें आजारी पडलीं होतीं, पैकीं आठ मरण पावलीं.

बडोदा रेलवेच्या तारीख १५ मिनहूपासून कांहीं गाड्या रात्री काढण्याचा सदरहू रेलवेंतील कामदार लोकांचा विचार आहे.

मागच्या सोमवारीं इगतपुरी व नाशीक या दोन गावाचे दरम्यानचे रस्त्यावर पाऊस अतिशय पडला.

मागच्या मंगळवारीं पुण्यास रात्रीचा अतिशय पाऊस पडला. सर्व रात्रभर एकसारखा विजेचा घडघडाट होत होता.

मुंबई एथील पोलिस कमिशनर मि. सूटर हे थोडे दिवसांतच रजा घेऊन विलायतेस जाणार आहेत. ते गेल्यानंतर त्यांचे जागीं त्यांचे असिस्टंट मि० एजिंगूटन यांस अक्टिंग पोलिस कमिशनर नेमणार आहेत.

इंदापुर तालुक्यास सालमजकुरीं सुमारें पांच हजारांची सूट शेतसाऱ्याबद्दल आली असें समजतें.

आह्मास असें समजलें कीं, रावबा० मल्हार सखाराम चौककर पेनशनर दप्तरदार यांस बडोदा येथें आकौन्टेन्ट जनरलच्या जाग्यावर ह्मणजे हिशेबी खात्याचे मुख्य नेमिलें.

कोचीनचे राजास कोणी विष घालून मारण्याचा प्रयत्न केला परंतु तो सिद्धीस गेला नाहीं. तारीख २८ माहे गुदस्त रोजीं राजेसाहेब जेवावयास बसले असतां त्यांस जेवणाचा वीट येऊन ते ओकावयास लागले तेव्हां त्यांस संशय आला व आपल्या जवळील सर्व अन्न तपासविलें त्यावेळीं भाज्यांत विष घातलें आहे असें नजरेस आलें. ने. ओ.

मुंबईचे मि० कर्शेटजी रतनजी हे सिविल सर्विसच्या परीक्षेकारितां विलायतेस गेले.

गेल्या महिन्यांत सब. जज्ज व हाय कोर्ट वकीलीची परीक्षा झाली, तींत उमेदवार उतरले त्यांचीं नांवें.—

रा. रा. रामचंद्र दिनकर परांजपे.
,, विनायक जनार्दन गानू.
,, धोंडो जनार्दन करमरकर.
,, घेलाभाई जगजीवनदास गांधीवाला.
,, तुळजाराम हरिवल्लभ मुतीया
,, बमनजी फिरोजशा.

विलायतचें ता. ३१ मार्च अखेर बर्षाचें एकंदर ७४,९०,००,००० रु० उत्पन्न झालें असें लं. च्या तारेवरून कळतें.

नेटिवसबार्डिनेट माजिस्त्रेटची परीक्षा—नियमाप्रमाणें मुंबईतील टौनहालमध्यें ता. ३ व ४ मे रोजीं दहा वाजतां होईल. इं प्र.

## वऱ्हाडचा इतिहास

(ता. ७ मार्चवरून पुढें चालू.)

नंतर वऱ्हाडांत सर्व गडबड होऊन गेली. नानातऱ्हेच्या मिषानें सरकाराविरुद्ध दंडेल लोक उठत असत व त्यांनां दुसऱ्या लोकांच्या टोळ्याच्याटोळ्या सहाय होत व त्या मुलूखभर स्वाऱ्या करीत पण त्या सर्वांचा मुख्य हेतु लुटणें हाच असे. सन १८१८ इसवीमध्यें नागपुरचे राजे आपा साहेब भोसले इंग्रज सरकारच्या कैदेंतून पळालेले वऱ्हाडांत आले होते त्यांची बतावणी करून कोणी हिंदु पुढारी आपण आपा साहेब आहो असें ह्मणे आणि मुसलमानांच्या जुलमांतून वऱ्हाडप्रांत सोडविण्याविषयीं उपदेश करी. सन १८४१ त कोणी मुगुटराव नावाचा एक गृहस्थ कांहीं लोक जमवून जळगावाजवळ एका खेड्यांत आला आणि शिंद्याच्या घराण्यांतील आपण मुख्य पुरुष आहो असें लोकांस सांगूं लागला. व मुसल्मानांच्या हातून वऱ्हाड सोडवावयाचें आहे त्या कामीं जे लोक आह्मांस येऊन मिळतील व चांगलें सहाय देतील त्यांस मोठमोठाल्या देणग्या दिल्या जातील असेंही त्यानें प्रसिद्ध केलें. त्याच्या या उपायानें हत्यारबंद असे बदमाश व दंगेखोर लोक त्याला बहुत मिळाले. कित्येक द्रव्यवान लोकांसही त्यानें आपलेसे करून घेतले. आणि मग निजामाच्या कामदारावर चाल करून जाऊन त्याला हाकून लाविलें व त्या बाजूचा मुलुख त्यानें कांहीं कालमर्याद बळकाऊन घेतला. पुढें तालुकदाराचे लोक व इंग्रजांचें इरेग्युलर फौजेचे लोक यांनीं त्याचा पराभव केला व त्याला हाकून लाविलें. मुगुटराव यानें भोसल्याचें निशाण जामोदच्या गढीवर लाविलें होतें व देशमुख देशपांडे वगैरेचा त्याला बराच आश्रय मिळाला होता.

नंतर सन १८४८ त नागपुराहून एकजण आला व आपणास राजे आपा साहेब भोसले असें ह्मणवूं लागला. वणी जिल्ह्यामध्यें आपले येण्याचा त्यानें प्रसिद्धपणें जाहिरनामा लाविला आणि हमेशाप्रमाणें बहुत हिंदु जमीदार लोक त्याला मिळाले. आणि त्यांच्या मदतीनें सर्व वऱ्हाडभर हत्यारबंद चार हजार फौज जमली, रोहिल्यांची एक पलटण ठेविली. व निजामाचे लोकांबरोबर लढाई आरंभिली. मग १८४९ चे मे महिन्यांत कळम गावा जवळच्या डोंगरांत इंग्रजांच्या इरेग्युलर फौजेनें त्याचा पाठलाग करीत असतां त्याला गाठलें व त्याची त्यांची चकमक झडली. तींत इंग्रजांनीं त्याला पळवून लाविलें पण इंग्रजांचा ब्रिगेडिवर आनस्लो साहेब या गर्दींत घोड्यावरून पडून मरण पावला. नंतर जून महिन्यांत ब्रिगेडियर हांपटन साहेब घोडेस्वाराच्या फौजेसहीत मोठाल्या दौडा करीत तिकडे गेला व त्यानें मोठ्या निकराची लढाई करून आपासाहेबांस पकडले आणि त्यांच्या लोकांची दाणादाण केली. या प्रसगांत हांपटन साहेबांसही मोठी भयंकर जखम लागली.

याठिकाणीं हीही गोष्ट सांगितली पाहिजे कीं वऱ्हडांत अशाच प्रकारची शेवटची एक लढाई सन १८५९ त रिसोडा जवळ चीचंब या गावीं रोहिले लोकांबरोबर झाली. तेही असेच मुलखांत लुटालूट करीत फिरत होते. त्यावर हैद्राबाद कंटिंजंटची फौज जाऊन ही लढाई झाली व हिजमध्येंही क्यापटन भ्यमनन साहेब मरण पावले. यापुढें वऱ्हाडांत ईश्वरकृपेनें लढाईचा प्रसंग नाहीं.

या सर्व गडबडीच्या प्रसंगांत हिंदु जातीचे देशमुख व परगण्याचे इतर जमीदार यांची वर्तणूक निजाम सरकारच्या केवळ विरुद्ध होती. ते बदमाश व दंगेखोर लोकांस मदत करीत होते व त्यांच्या द्वारें देशभर लुटालूट करीत होते आणि निजाम सरकारच्या फौजांस आडवे येत होते असें इंग्रजांच्या लष्करसंबधीं पत्रव्यवहारां स्पष्ट लिहिलें आहे.

नंतर लढायांची गडबड जाऊन दुसरे प्रकारचे दिवस आले. व या कारकीर्दींत मक्तेदार वगैरेचें हैदराबादेकडे फार प्रावल्य झालें. मेसर्स पालमर आणि कंपनी यांचे कर्जाचा निजाम सरकारावर मोठा बोजा झाला. वऱ्हाड प्रांताच्या संरक्षणाकरितां इंग्रजांच्या सांगणीवरून जी घोडेस्वारांची मोठी फौज निजामानें ठेविली होती तिचा खर्च चालविण्याकरितां पालमर कंपनीनें जें दरसाल दरशेकडा २४ रुपये व्याजाचे दरानें निजामास कर्ज दिलें होतें व वऱ्हाडांत ठाणीं बसलीं होतीं त्यांच्या कर्जाचा हिशेब पाहून उलगडा करण्याकरितां व पालमर कंपनीला वऱ्हाडांतून काढून देण्याकरितां इंग्रजाच्या सरसी. मेटकाफ नामे साहेबांस फार श्रम पडले. पालमर कंपनीचा निकाल केल्यानंतर पुरणमल नावाच्या हैदराबादच्या एका जबरदस्त सावकारानें वऱ्हाडचा मक्ता घेऊन त्यांत आपलीं ठाणीं बसविलीं होतीं. पुढें सन १८३९ सालीं इंग्रजांच्या रेसिडेंटाच्या वारंवार सांगण्यावरून निजामाच्या दिवाणानें पुरणमलाकडील मक्त्याचे मामले काढले. ते काढण्यास फार प्रयास पडले आणि मेसर्स पेस्तनजी आणि कंपनी यांकडे ते मामले झाले. पुरणमलानें निजामावर आपले २० लक्ष रुपये येणें काढले आणि दिवाणानीं दुसरे प्रकारचे हिशेबानें पुरणमलाचें सर्व देणें खोटें पाडून त्याजवरच सरकारचे कित्येक लाख रुपये घेणें काढले.

पुढें मेसर्स पेस्तनजी आणि कंपनी यांनांही त्या मक्त्यांत कांहीं लभ्यांश झाला नाहीं. तथापि ते मोठे उद्योगी आणि साहसी पार्शी व्यापारी होते. त्यांनीं सन १८२५।२६ सालीं वऱ्हाडांतून पुष्कळ कापुस मुंबईस पाठविला. त्यांनीं कापुस पिकविणाऱ्या शेतकऱ्यांना मोठमोठाल्या रकमा अडव्हान्स दिल्या. खामगावास व दुसरे ठिकाणीं कापसाचे गठ्ठे दाबण्याचे प्रेस मांडले व निजाम सरकारच्या मुलखांतला बहुतेक माल बाहेर देशीं घेऊन जाण्याचा व्यापार चालविला. तसेंच निजाम सरकाराला त्यांनीं जें कर्ज दिलें होतें त्याच्या फेडी करितां सन १८४१ सालीं दिवाण चंदुलाल यानें वऱ्हाडच्या काळीचा वसूल त्यांनीं परभारें घ्यावा अशी तजवीज करून दिली होती. पुढें सन १८४३ सालीं चंदुलाल दिवाण यानें राजिनामा दिला व दरबार केवळ कर्जबाजारी व नादार असें करून टाकिलें. मग पेस्तनजीस दुसरे दिवाणाचे तोंडाकडे पाहवें लागलें त्यानें सरकारावर ४० लक्ष रुपये येणें काढले होते असें असतांही वऱ्हाड प्रांतातून तुह्मी आपलीं ठाणीं उठवावीं असा त्यास १८४५ त हुकूम झाला. आणि त्याप्रमाणें त्यानें ठाणीं उठविलीं नाहींत ह्मणून त्याचे वसूल करणारे कामदार परभणी, बाळापुर व अकोला येथें होते त्यांवर हल्ला करण्याचा हुकूम झाला व त्याप्रमाणें हल्ले झाले त्यांत परभणी येथें तर पेस्तनजीच्या बाजूचे ११ लोक ठार मेले आणि सर्व ठिकाणाहून जबरीनें त्याचीं ठाणीं उठवून दिलीं. पैशाबद्दल पुढें त्याला सावकारांवर हुंड्यावगैरे दिल्या होत्या पण ते शेवटपर्यंत कागदचे कागद राहिले त्यापासून एक पैसाही त्याला वसूल झाला नाहीं.

हें पत्र अकोलें एथें खंडेराव बाळाजी फडके यांचे वऱ्हाडसमाचार छा. छा. प्र.

REGISTERED N° 5, 1875

# वऱ्हाडसमाचार.

पुस्तक ९ अकोला, रविवार ता० माहे एप्रिल सन १८७५ इ० अंक १६

## जाहिरात.

### वऱ्हाडसमाचाराची किंमत.

| | रु. |
|---|---|
| वर्षाचे अगाऊ | ५ |
| सालअखेर | ७ |
| फुटकळ अंकास | ०४ |
| डाकहशील | |
| वर्षाचे अगाऊ | १०८ |
| " अखेर | २ |

नवीन वर्गणीदार होऊ इच्छिणारे लोकांकडून आगाऊ वर्गणी आल्या खेरीज पत्र सुरू केलें जाणार नाहीं

### नोटिसीबद्दल.

| | |
|---|---|
| मराठी, दर ओळीस | ०१०६ |
| तीच नोटिस दुसरे खेपेस | ०१ |
| इंग्लिश लिपींत दर ओळीस | ०४ |
| " दुसरे खेपेस | ०२ |

## पत्रव्यवहार

या सदराखालील मजकूर पत्रकर्त्यांच्या मतास मिळूनच असतील असें समजूं नये

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांस

वि० वि० आपल्या पत्रांत खालील चार ओळीस आश्रय मिळेल अशी आशा करितो.

हल्लीं इंग्रजी राज्यांत पैसा उत्पन्न होण्याचे दोन मार्ग आहेत ते असे. एक जमिनीचा वसूल आणि दुसरा कर वगैरे. या वऱ्हाड प्रांतांत जागलपट्टी, स्कूलपट्टी, आणि सडकपट्टी हे तीन कर जनरल आहेत याशिवाय म्युनिसिप्यालिटीचे कर आहेत. कर बसविण्याचें कारण असें असतें कीं प्रांताचा खर्च असलेल्या उत्पन्नावर भागत नसेल तर कर बसवावा असा चालू मार्ग आहे. या वऱ्हाड प्रांतांत इंग्रजांचा अमल होऊन कंपेश २२ वर्षें झालीं आहेत व दर वर्षास उत्पन्नही बरेंच वाढत चाललें आहे, पहा ज्या वेळेस वऱ्हाड इंग्रजांच्या अमलांत आलें त्या वेळेस ३०।३५ लक्षापर्यंत उत्पन्न होतें तें हल्लीं ९२ लक्षापर्यंत वाढलें असून सरकारचा खर्च भागत नाहीं. जे कारखाने पूर्वी चे होते त्याजपेक्षां चालू सालांत जास्त न वाढता पोलिसपट्टी सरकारी नोकर लोकांवर बसऊन राष्ट्राचा खर्च भागविणे आहे. सरकारी नोकर ह्मणजे फक्त नेटिवच अथवा त्यांचे वरिष्ठ अधिकारी युरोपियन देखील. या सर्वांवर जर कर बसावयाचा असेल तर सर्व लोकांस गाऱ्हाणीं करण्यास कांहीं सबब राहिली नाहीं. नाहीं तर मागें एक वेळ अशीच गप्प उठली होती कीं युरोपियनखेरीज करून नेटिवांवर टी आहे असें जाहिर झालें होतें ३ या ठिकाणीं 'दैव देतें कर्म नेतें' या ह्मणीप्रमाणें सर्व प्रकार आहे, त्यांतून शाळा खात्यांत तर फारच. या खात्यांतील लोकांस जिकडून तिकडून आड ना विहीर. एक तर मास्तर लोक दूर देशांतून मोठे पगार देऊन या देशांत आणले. तसें कांहीं दिवस सुरळीत चालतें इतक्यांत ग्रेडेशन नाव ठेऊन बहुतकरून सर्व मास्तर लोकांचे पगार कमी केले. त्याला कांहीं दिवस लोटले गेले आणि सन १८७५ च्या फेब्रुवारी महिन्यातून कितो एकांस ५०-३० रुपयांचे पगार मिळाले. पहा गरीब मास्तर लोकांस केवळ पाण्यांत पहाणें आहे. या खात्याचे मुळचें नाव भिक्षुकखातें मग यांतील नोकर लोकांनीं गावांत भिक्षा मागून कुटुंबाचें उदर पोषण करावें आणि सरकारची चाकरी करावी असे प्रसंग आले आहेत. इतकें असून जास्ती कमी बोलावें तर नोकरीस मुका लागतो कारण हक्क हा शब्द वऱ्हाडास लागूच नाहीं. मग करावें तरी काय? ज्याप्रमाणें वृद्ध मनुष्य आपले दिवस घालवितो त्याप्रमाणें मास्तर लोक आपले दिवस घालवित आहेत. लोअर क्लास स्कूलांतील कित्येक मास्तर सुमारें १०।११ वर्षें पर्यंत ३० रुपयांवरच आहेत त्यांस इतर खात्याप्रमाणें बढती मिळू नयेच कां? अतो मोठ्याच पोट भरलें ह्मणजे झालें.

मार्च महिन्याचे वऱ्हाड एजुकेशनल रेकार्डमध्यें असें लिहिलें आहे कीं गरीब मुलांची फी गावांतील श्रीमान लोकांनीं द्यावी आणि मास्तर लोकांनीं आपल पदरून फी भरून मुलांची संख्या ठेऊ नये हें ह्मणणें रास्त आहे परंतु याजकडे कोण लक्ष देतो. याजपेक्षां इतर प्रांताप्रमाणें शेंकडा २० मुलें नादार शाळेंत घेण्यास हुकूम मास्तर लोकांस दिल्यास फार हितावह होईल. मागें वऱ्हाडामध्यें स्कूलकमेट्या नेमल्या गेल्या आहेत त्याजपासून विद्यावृद्धीची सुधारणा किती झाली हें कळत नाहीं. व त्यांजला असें करण्याबद्दल हुकूम दिल्यास फीची योग्य व्यवस्था होईल.

या प्रांताची जितकी सुधारणा व्हावी तितकी झाली नाहीं शाळेमध्यें महारांचीं मुल आणण्याकरितां जसें सरकार ह्मणतें तसें कोलाम, गोंड आणि इतर हलक्या हिंदु जातीच्या मुलांच्या आई बापास उत्तेजन देऊन मुलांस विद्यामृत पाजण्याची सवय लावण्याचा करित नाहीं. कांहीं वऱ्हाडी लोकांचे पोशाख बदलले आहेत; व कांहीं लोक बरेंच शुद्ध बोलतात आणि लिहितात. सडकपट्टी सरकारानें बसविली आहे, परंतु त्या सारखा योग्य उपयोग होत नाहीं- आग विझविण्याचे बंब मुळींच नाहींत ह्मटलें तरी चालेल. शेती मध्यें बिलकुलच सुधारणा नाहीं. कारण पूर्वींपासून जो भाजीपाला उत्पन्न होतो त्याजपेक्षां हल्लीं जास्त होत नाहीं. उलट अफूचें उत्पन्न कमी झालें आहे. कापसाच्या गिरण्या आणि सूत काढण्याच्या गिरण्या या प्रांतांत पुष्कळ चालू केल्यास फायदा होणार आहे. कळावें ही, विनंती. तारीख ९ एप्रिल सन १८७५ इसवी.

एक<br>ज्ञ

---

रा० रा० वऱ्हाडसमाचारकर्ते यांस —

वि. वि. आपल्या सुंदर पत्रीं ह्या खाल लिहिलेल्या चार ओळी छापून प्रसिद्ध कराल अशी आशा आहे.

आह्मी फिरत फिरत मुक्काम मेहेकर जिल्हा बुलढाणें येथें गेलो होतो. हा गांव तालक्याचा असून बराच मोठाही आहे. या गांवाला पेणगंगा नदी आहे. ही नदी बरीच मोठी आहे परंतु उन्हाळ्यांत इला कांहीं पाणी राहत नाहीं. येथें व्यापार वगैरेही साधारण बराच चालू आहे. येथें म्युनिसिपालकमिटी असल्यामुळें गांवची सफाई वगैरे ही उत्तम प्रकारची रहात असत.

येथें सरकारी दोन च्यार प्रकारची खातीं असल्यामुळें सरकारी नोकर लोकांचाही येथें बराच जमाव आहे. परंतु लिहिण्यास वाईट वाटतें कीं येथें इतक्या सर्व सोई असून एक लायब्ररी नसणें हें एक या गांवास दूषण समजलें पाहिजे. तरी गांवांतील सर्व सभ्य लोक व सरकारी नोकर लोक या गोष्टीकडे लक्ष देऊन लायब्ररी स्थापन करण्याकडे झटतील अशी आशा आहे.

पत्रविस्तार भयास्तव आतां पुरें करितों. पुढें आपली भेट लवकरच होईल अशी आशा आहे. कळावे तारिख १२ माहे एप्रिल सन १८७५ इसवी. मुक्काम मेहेकर.

एक<br>फिरस्ता.

---

## हुताशनीसंबंधीं अबला कनवाळूस उत्तर.

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांस:—

वि० वि० महाराज कलियुगाचा प्रथम चरणच सुरू असतां उत्पाती पुरुष अनेक प्रकारचे अवतार धारण करू लागले आहेत. आजपावेतों "विधवाकनवाळु," पतिव्रताकैवारी. अनाथ स्त्रियांच्या दुःखाचा साथी, असे बरेच भूतदयान्वित पुरुष पहाण्यांत आल परंतु आले दिदर्शनासी छोटे बंधु प्रमोदसिंधु यांच्या पत्रांत पांसुला देवीच्या भक्ताचें,(मानपात्र) नायकिणीच्या कैवाऱ्याचें, सार्वजानिक स्त्रियांच्या वकिलाचें पत्र छापलें आहे त्यांतील पोरकळ दुर्वाच्य व प्रमादपूरित अशा दोन विचाराविषयी थोडासा प्रस्ताव करू.

तुह्मांस माहितच आहे कीं कोणतीही गोष्ट आपणास प्राप्त होत नसली ह्मणजे तिजविषयीं पाहिजे तशी निंदा करावी. इसापनीतींतील कोल्हा आणि द्राक्षें या गोष्टींतील कोल्ह्याची सुंदर द्राक्षांची निंदा, इंद्रादिक नळ वेषधारी च्यार देवांची "नवरि तरि अह्मासी मूढ ते काय कीजे' अशी निंदापर वाक्यें परिक्षेत पसंत होण्यास अयोग्य त्यांची परिक्षकाविषयीं निंदा हीं सर्व लक्षांत आणिलीं असतां आमच्या वर लिहिलेल्या मानपात्र नायकिणींच्या कैवाऱ्यानें वऱ्हाडसमाचारास दिलेले वायकळ दोष कितपत खरें आहेत याची वाचकांनींच कल्पना करावी- व व. स कर्त्यांचे अंगीं पाणी नाहीं असें त्याचें ह्मणणें कांहीं अंशीं यथार्थ आहे असें मानवे कारण त्या पत्रांतिल अमंगळ, गलिच्छ व दुर्गंधयुक्त पाणी स्वीकारण्याचें पाणी अंगीं नसणें हा दुर्गुण नव्हे. अस्तु.

अकोल्याच्या मंडळीनें हुताशनीनिमित्त कांहीं वर्गणी जमवून समारभ साजरा केला. व स्वधर्मानुसार कांहीं मौज करावी ह्मणून दोन दिवस त्यांनीं खटपट केली ती अबलाकनवाळूस न आवडून त्यानें मंडळीवर आपली अपवित्र लेखणी उचलली आहे. समारंभाकारितां मुद्दाम ( आमच्या अबलाकनवाळूस इंग्रजी शद्बांची फार आवड किंवा मराठी भाषेची माहिती कोती असावी कारण त्यानें 'स्पेशल' या शद्बाची योजना केली आहे ) नायकिणी आणविल्या होत्या यांत दोषार्ह काय तें कळत नाहीं. मला वाटतें कीं या अडाणी गृहस्थास अशा प्रसंगीं कांहीं शास्त्रीय व्याख्यानें देणारे आणले असते तर आनंद होता किंवा बंद पडलेलें ज्ञानसंग्रह पुस्तक सर्वांनीं मदत करून याच्यासारख्याच घाणेरड्या भाषेनें भरलें असतें तर त्यास कैवल्य मिळालें असतें. मोठ्या कामदारांनीं लहान कारकुनाकडून जबरदस्तीनें पैसा उकळला नसतांही हा तसें ह्मणतो व आपल्या यंत्रशास्त्रनैपुण्यास प्रसिद्ध करूं पाहतो व मराठी शद्ब आठवेना ह्मणा किंवा इंग्लिश भाषेचें प्राविण्य प्रगट करण्याकारितां ह्मणा शक्ती किंवा आकर्षण याचे जागीं फोर्स हा शद्ब उपयोगांत आणतो. पण झाल्या प्रकारांत कोणतेंच आकर्षण घडून आलें नाहीं. मात्र एका अष्टपैलू, सर्व हौस पुरलेल्या, डावपेंच खेळलेल्या, अक्कडबाज, शुभ्रवेषधारी, सदादंतविकासी, अशा गृहस्थानें लोकांचीं भार्जनें करून व नमस्कार कारितां कारितां पदललाट किणें करून स्वताच्या अंतःकरणांतील आगीकारितां हें सर्व कृत्य उभारलें याची अबला कनवाळूस आठवण न राहून त्यानें स्वप्नांत हें काम केलें असावें.

नायकिणीला रंगमंडपांत आणिलें याबद्दल जर हा लिहिणारा दोष देतो तर त्यांची देवीप्रमाणें पुष्पांनीं पूजा करावी असें याचें मत होतें काय? नलोपाख्यानांत ज्याप्रमाणें अतिशयोक्तीची संग

ळ आहे त्याप्रमाणें या छोट्या पंडितानें रंगमंडपास व रंगसमारंभास यमसदनाची उपमा दिली आहे. पण त्यापेक्षां रंगेल्या गृहस्थांस ह्मणजे ज्यांनीं या समारंभाची सूत्रें आपले हातीं धरिलीं होतीं त्यांस त्यानें यमाची उपमा दिली असती तर बरी दिसती असें मला वाटतें. कांहीं लोकांनीं त्यावेळेस शीघ्र कवनें व कांहींनीं मुद्दाम केलेलीं कवनें ह्मटलीं यांत दोष तो कोणता ? अवलाकनवाळूस असें वाटत असेल कीं त्यावेळेस यंत्र शास्त्रावर, अर्थ शास्त्रावर, तर्क शास्त्रावर घाणेरडी भाषा कशी लिहावी, निर्लज्ज ढोळबहिरव अट्टल लुच्चे चांडाळ या शद्बांचे प्रयोग कसे करावे, सुकुमार मुखकमलें, योवनीचा अर्थकाम इत्यादि मोठाले शद्ब वाक्यांत कसे आणावे हें लोकांस दाखविण्याचा काय तो हाच प्रसंग आहे अस्तु फार लांबविण्यांत अर्थ नाहीं. झालें तें योग्य झालें. सर्व प्रसंगानुरूप होतें. आणि तसें झालें नसतें तर मात्र मंडळी दोषार्ह झाली असती. अशा वेळीं अशाच प्रकारचा समारंभ यथायोग्य असतो. एकंदरींत ज्या विद्वान सद्गृहस्थानीं अशा प्रसंगीं आपल्या माना खालीं घातल्या त्यांना अशा प्रसंगांत काय होत असतें याची आजपावेतों माहिती नव्हती किंवा अतिविद्वत्तेच्यायोगानें त्यांचें माथें जड झालें असावें असें वाटतें- कारण ज्या लोकांस स्त्रियांनीं एकांतींही स्तनावरण काढलें असतां बीभत्सता वाटते इतकी ज्यांची सौज्यन्यातिशयता तशा मनुष्यांस असला प्रसंग न आवडणें यांत कांहीं नवल नाहीं अस्तु. अवलाकनवाळूनीं पुढेंही मेहेरबानी केल्यास सेवेला शीघ्र सादर होईन हें वचन देऊन आतां आपली आज्ञा घेतों कळावें हे विनंती.

आपला
आर्यजनहितैषी
जमदग्नी.

---

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यासः—

वि० वि० आपल्या तारीख २८ मार्च महिन्याच्या वऱ्हाडसमाचारमध्यें भाऊ राजाराम जोशी बोदवडकर यांणीं तारीख ६ रोजीं लागलेल्या ग्रहणाबद्दल जो आपला अभिप्राय दिला होता तो येणेंप्रमाणें:—

त्याणीं ग्रहलाघव या ग्रंथावरून ग्रहण करण्यामध्यें आणि आर्य पक्षावरून ग्रहण करण्यामध्यें ४ घटकेंचें अंतर आहे असें दर्शविलें होतें. परंतु त्यांच्या मताप्रमाणें कालचे ग्रहणाचा स्पर्शकाल १५ घटकानीं झाला होता परंतु त्याप्रमाणें मोक्षकाळ न होतां सुमोर २० घटकेस झाला असावा असें आमचे येथें घडून आलें. खरा ग्रहणाचा इष्टकाल समजण्याकारितां कोणत्या ग्रंथाचा आधार घेतला पाहिजे व इतके दिवस ग्रहलाघवावरून केलेलीं ग्रहणें कशीं बरोबर लागलीं गेलीं व हल्लीं या दोन ग्रहणांत चूक कां पडली याजविषयीं जोशी महाराज आपल्या उदार पत्रद्वारें उत्तरीं कळवितील अशी आशा बाळगतो.

एक
कळंबकर

---

रा. रा. वऱ्हाडसमाचार पत्रकर्ते यांस.

वि. नि. मागें महाराष्ट्रमित्रांत लिहिल्याप्रमाणें लायब्ररींतील व्यवस्था चांगली होत नाहीं. बड्या लोकांनीं लायब्ररींतील पैसा खर्चून हवीं तीं वर्तमानपत्रें आपल्या सवलतीचीं आणण्याचा हुकूम फरमाविणें खरोखर सर्व वर्गणीदारांच्या मनाचे बाहेर आहे. "बळी तो कान पिळी" — उन्हाळा प्रखर भासावयास लागला. पाण्याचा खडखडाट होत चालला आहे. * * *

कापसाचा व्यापार कमी कमी होत चालला. मार्च्य अखेर एकंदर ६४०४२ गठडी रेलवेंतून रवाना झालीं — मे० बेल साहेब कमिशनर यांची स्वारी १८ वे तारखेस येथें येणार अशी वदंता आहे— मे० नागोराव जयकृष्ण यांची प्रकृती बरोबर नसल्यानें त्यांनीं एक महिन्याची आणखी रजा वाढविली. त्यांचे बंधू त्यांस इंग्लीस भेटण्यास गेले आहेत असें ह्मणतात— डे. ए. इन्स्पेक्टर एथेंच आहेत— गावांत एका वकिलाचे घरीं चोरी होऊन बरेच दिवस झाले त्याच्या भ्रमित शंकेनें मोठ मोठ्या लोकांचे घराचा झाडा घेण्याची पाळी येणार होती ती मात्र आली नाहीं परंतु पोलिस लोक जुलमानें स्टेशनावर भल्या मनुष्यांचे झाडे घेऊन विनाकारण अब्रूस धक्का आणितात. याजकडे पोलिस नजर देईल काय? पत्र छापून प्रसिद्ध करालना? करा झालें! हे विनंती.

तारीख १५ माहे एप्रिल सन १८७५ इसवी.

आपला
उमरावतीकर.

---

## वऱ्हाडसमाचार

मिती चैत्र शुध्ध १३ शके १७९६

## श्रीमंत मल्हारराव गायकवाड.

गेलेआठवड्यांत बहुतांशीं वाटलें होतें कीं एक दोन दिवसांत श्री० मल्हारराव यांची मुक्तता होऊन ते राज्यारूढ होतील व विलायतेकडील वर्तमानांचा त्यावेळीं व अजूनही झोक तसाच आहे पण हिंदुस्थान सरकार त्यांचे विच्यारास आड येत आहे असें आतां वर्तमान आहे. व प्रकरण लांबणीवर पडलें आहे तेव्हां हिंदुस्थान सरकार व विलायत सरकार यांच्यामध्यें जाब जबाबी काम चाललें असावें अशी कल्पना आहे. गेल्या आठवड्यांत श्रीमंत मल्हारराव यांच्या पदारूढतेविषयीं जितकी निःसंशयता वाटत होती तितकी आतां या वर्तमानामुळें वाटत नाहीं. बिचाऱ्या मल्हाररावाचे प्रालब्धाची आतां परिक्षा आहे. ही व्यक्तीविषयींची गोष्ट कशीही असो व इंग्रज सरकार आपलें राज्याचे कर्तबगारीत कसेंही वर्तन करोत पण मल्हाररावाची जी चौकशी झाली तीमध्यें त्यांवर आरोप शाबीद झाला नाहीं असें सर्वतोमुखीं आहे ह्मणून तो बिचारा सुटून पुन्हा राज्य विभूषित व्हावा हा न्यायाचा मार्ग दिसतो.

---

## मुंबईचीं तखलुबी घरें

कैलासवासी नारायण वासुदेव दाभोळकर घराखालीं दडपून मरण पावल्याला थोडेच दिवस झाले तों गेल्या आठवड्यांत आणखी एक भयंकर प्रसग आला होता त्यांत खोजे लोकांचे गुरू नामदार अगाखान त्यांचे चिरंजीव व दुसरे खोजे जातींपैकीं प्रतिष्टीत अशा सव्वाशें लोकांची गठडी होणार होती पण ईश्वरानें टाळली, याबद्दल संतोष मानावा.

परवांच्या शुक्रवारच्या मागील शुक्रवारीं लालजी लधा याचे मालकीचे घरांत अलना मावजी व ताजाहिरजी नावाचे दोन खोजे राहात होते. त्यांनीं आपले बिऱ्हाडीं दुसरे मजल्यावर जातजेवण केलें त्या प्रसंगास तिसरे प्रहरीं सुमार दोन तीन शें लोक जमले होते. सर्व आटपल्यावर तीन वाजतां नामदार अगाखान हे आपले चिरंजिवासह परत जाण्यास निघाले व ते खोलीबाहेर पडले आणि चिरंजीव आंत आहेत व सर्व लोक सन्मानार्थ मागें उभे आहेत तों त्या खोलीचा मजला कोसळला. अगाखान यांस कांहीं लागलें नाहीं; पण त्यांचे चिरंजिवाचे डोक्याला जखम झाली. व दुसरे बहुत लोकांनां लहान मोठ्या जखमा झाल्या तसेंच तेरा वर्षांचे वयापासून दोन वर्षांपर्यंत पांच मुली व एक मुलगा अशीं सहा मुलें इमारतीखालीं दबलीं जाऊन ठार मेलीं. व सर्व कार्याचा विरस झाला. दुःखांत सुख इतकेंच ह्मणावयाचें कीं, त्या प्रसंगांत असलेले सर्व लोक मेले नाहींत; पण बिचाऱ्या लहान लेकरांवर संक्रांत आली.

मुंबईस बाहेरून भव्य व मजबूद दिसणारीं पण आंतून भिरड मुंग्यांसारखीं झालेलीं घरें कितीक असतील, व तीं समयानुसार असाच घात करतील याचें मोठें भय आहे. दाभोळकर मरण पावले त्या प्रसंगीं मोठा कल्लोळ झाला होता व सर्व शहरभर घरें तपासावयाचीं असा पुकारा झाला होता पण पुढें सर्व शान्त झालें. त्यानंतर हा तिसरा अनर्थ आहे व आतां थोडीशी उचल होईल पण ती शेवटपर्यंत टिकते किंवा नाहीं हें पाहिलें पाहिजे.

आम्ही सर्व घरंदाज लोकांनां विनंती करितो कीं, त्यांनीं आपले घराचे सुरक्षितपणावर फार परवी ठेवित जावी. त्याउपर होणें जाणें ईश्वराधीन परंतु सावधगिरी ठेवणें हें काम आपलें आहे.

---

## नागपुर गाडीकडील तिसेरे व चवथे क्लासाचा गोंधळ

मागें जी. आय. पी रेलवेचे कुलीट्रेनचे चवथे क्लासचे उतारू लोकांचे डबे हलके प्रतीचे व बिनबैठकांचे असे असत. व कुलीट्रेनशिवाय प्यासेंजर ट्रेन आणखी एक स्वतंत्र होती ती वाहिवाट अलीकडे बंद झाल्यानें लोकांची पुष्कळ गैरसोय झाली आहे व येणेंकरून रेलवे कंपनीचेंही नुकसान होत आहे याविषयीं पुढें लिहिल्या गोष्टीबद्दल रेलवे कंपनी विचार करून बंदोबस्त करील तर फार चांगलें होईल.

नागपुर बाजूला हल्लीं एकच ट्रेन झालेली आहे तींत चवथ्या क्लासचे उतारू घेण्याची सोय केलेली आहे; पण तिसरे क्लासाहून भिन्न त्यांचे डबे जोडलेले नसतात यामुळें सर्वत्र तिसरे व चवथे क्लासाचे उतारू एकत्र बसतात. व तिसरे क्लासचा पैसा भरून गाडींत बसलेल्या गृहस्थाजवळ चवथ्या क्लासवाला राजरोस जाऊन बसला ह्मणजे पहिल्याला प्रथम थोडें वाईट वाटतें. व मागाहून हाही विच्यार त्याच्या मनांत येतो कीं मी तिसरे क्लासचे टिकिटाचे अधिक पैसे व्यर्थ दिले. व या गोंधळानें तोच उतारकरू दुसरे खेपेस तिसरे क्लासचें टिकिट न घेतां चवथे क्लासचें घेतो अशीं बहुत उदाहरणें आम्ही प्रत्यक्ष पाहिलीं आहेत. व येणेंकरून कंपनीचें खचीत नुकसान होतें व प्रत ह्मणून जी योग्यता आहे तीही रहात नाहीं याजकरितां रेलवे कंपनीनें चवथे क्लासाला अवश्यक जितके डबे तितके दररोज जोडीत गेलें, त्यावर चवथा क्लास असें स्पष्ट लिहिलें आणि प्रत्येक गाडींत तपास करून दोन क्लासाची मिसळ होऊं दिली नाहीं ह्मणजे सुरळीत व्यवस्था राहील.

कदाचित चवथे क्लासचे लोकांवर रेलवेची मेहेरबानी असून अथवा त्या प्रतीच्या गाड्या नसून त्यांना तिसरे क्लासचे गाडींत बसवीत असतील तर अशा गोंधळामुळें तिसरे क्लासचे लोक फारच थोडे असतात सबब त्यांवरही मेहेरबानी करून त्यांना दुसरे प्रतीचे गाडींत बसविलें तर बरें होईल.

---

### गायकवाडी प्रजेचा दंगा.

गायकवाडाचे राज्यांत कडीपट्टण ह्मणून सुभा आहे तेथील रयत सरकारास वसूल देत नाहीं. ती ह्मणते कीं, गायकवाड राजा गादीवर नाहीं ह्मणून तो गादीवर बसेपर्यंत आह्मी वसूल देणार नाहीं. तक्रार बरेच दिवस ऐकण्यांत होती पण ती आतां विकोपास गेली. ह्मणजे त्या सुभ्यांतले सुमार ५०० लोक हत्यारबंद जमून त्यांनीं एका वहिवाठदारोचे हात तोडून त्याला जखमी केलें. ही खबर बडोद्यास पोंचतांच कांहीं फौज व २ तोफा तिकडे रवाना केल्या आहेत व क्या. लीन साहेब यांस तिकडे पाठविलें आहे.

---

( Communicated )

खानदेश, नाशीक व नेमाड वगैरे आपल्या आसपासचे प्रांतीं महामारीचे आगमन झाल्याची दुःखप्रद वार्ता आपण व आपल्या वाचकानीं ऐकिली असेलच. ईश्वर

कंपेनें तसे न होवो परंतु बाईसाहेबाची स्वारी इतकी समीप आल्यानें कदाचित आपल्या इकडेही उतरेल असा संभव आहे या करितां कदाचित तसें झाल्यास त्या महामायेचें वास्तव्य येथें फार दिवस होऊं नये या हेतूनें खालील सूचनास्पद चार ओळी आपणाकडे पाठविल्या आहेत त्या आपल्या सुंदर पत्रीं छापून प्रसिद्ध कराव्या.

१ आपल्या शहरांतील सर्वत्रांनीं आपापलीं घरें स्वच्छ ठेवावीं. घरास आंतून व बाहेरून चुना द्यावा व घरांत किंवा त्याचे आसपास केरकचरा किंवा कुजलेलें पाणी जमूं देऊं नये. घरांत गुरें बांधण्याच्या जागा असतील त्या ठिकाणीं शेण किंवा मलमूत्र वगैरे साचूं देऊं नये. आपलें पिण्याचें पाणी निर्मळ ठेवावें तें मडक्यांत किंवा कल्हई केलेल्य भांड्यांत ठेवावें. खाण्याचे पदार्थ निर्मळ व स्वच्छ करून खावे. बुरशी आलेला किंवा नासलेला पदार्थ खाऊं नये. मित आहार ठेवावा. गरम पदार्थ फार खाऊं नयेत. अंगावरील कपडे वगैरे नेहमी स्वच्छच ठेवावे सध्या अंब्यांचे दिवस आहेत तेव्हां हिरवे किंवा सडलेले आंबे कोणी खाऊं नये.

२ इतकेंही असून कदाचित कोणास या महामारीनें ग्रासलें तर त्याजला इतर मनुष्याचे संघटणापासून वेगळे ठेवावें. व त्याचें मळमूत्रही जेव्हांचें तेव्हांच कोरड्या जमीनींत खड्डा करून पुरून टाकावे आणि सरकारि दवाखान्यांतून जीं जीं औषधें या रोगावर मिळतात तीं ताबडतोब देण्याविषयींची खटपट करावी.

तारीख १७ एप्रिल सन १८७५ इसवी.

## वऱ्हाड

उष्णता दिवसानुदिवस विशेष होत चालली आहे व या आठवड्यांत दोन तीन दिवस अभ्र असल्यामुळें रात्रीं फारच ऊष्मा होतो व अशानें हवेंत चलबिचल होण्याचा संभव आहे नाशीक, लखनौ, काशी इकडे महामारीचा उपद्रव सुरू झाला आहे परमेश्वर कृपा करून त्या त्या ठिकाणीं शांती करो व त्याचा संसर्ग अन्यत्र कोठें न होऊं देवो.

ज्युडिशियल कमिशनर साहेबाकडे शुक्रवार शनवार सेशनचें काम चाललें. दीड दिवस पातुरच्या खुनाचा मुकद्दमा चालला होता निकाल अजून समजला नाहीं.

जु० कमिशनर साहेब सेशनाकरितां उदईक उमरावतीस जाणार. तेथून इलिचपुरासही सेशन करून पुढें चिखलदऱ्यास जातील.

उन्हाळ्यामुळें वऱ्हाडांतील सर्व दिवाणी कोर्टांस एप्रिलचे २९ वे तारखेपासून जूनचे १० वे तारखेपर्यंत सुटी देण्याचा ठराव झाला आहे.

मि० दस्तुर बहिमनजी साहेब यांचे वडील बंधू दस्तुर होर्मसजी साहेब हैदराबादेकडे असत ते तिकडे आजारी झाल्यामुळें मि० रतनजी साहेब यानीं त्यांनां पुण्यास घरीं आणून पोचविलें. तिकडे कित्येक दिवस औषधोपाय चालू असतां कांहीं गुण न होऊन सोमवारीं रात्रीं त्यांस देवाज्ञा झाली हें ऐकून आह्मांस फार वाईट वाटतें त्यांस राजस्फोट झाला होता. बहिमनजी साहेबांचें घराणें दक्षिणेंत सर्व पारशी लोकांचें गुरुघर आहे. ह्मणजे ब्राह्मणांत जसे शंकराचार्य तसे बहिमनजी साहेबांचे सर्वांत वडील बंधु दस्तुर नसरवानजी साहेब आहेत. ह्मणून सदरील गोष्टीबद्दल पुष्कळ लोकांस दुःख झाल्यावाचून रहाणार नाहीं.

येथील स्टेशन मास्तर मि० राइट साहेब यांची बदली झाली व रा. रामचंद्र धोंडदेव जे पहिले येथें स्टेशन मास्तर होते त्यांस पुन्हा येथें नेमिलें.

चांदुरचे तहशिलदार रा. रा. वामन नारायण बापट यांनीं रजा घेतली आहे व देशीं जाण्याकरितां ते आज सायंकाळीं येथें येणार आहेत. त्यांचे काम पहाण्यास रा. गिरराव रामचंद्र यांस नेमिलें.

रा मोहनीराज गोविंद जळगावचे नायब तहशिलदार याविषयीं रजिस्टर खात्याच्या संबंधानें कांहीं वाटाघाट चालू आहे त्याचा अखेर निकाल अजून समजला नाहीं तरी तूर्त त्यांची बदली खामगावास केली व तीप्रमाणें ते तेथें जाऊन रुजू झाले. त्यांच्या बदलीच्या संबंधानें आणखी बदल्या झाल्या त्या:—

खामगावचे नायबतहशिलदार रा. भिकाजी चिंतामणाजी यांस अकोटास, अकोटचे रा राघो यादव यांस अकोल्यास व अकोल्याचे रा. गंगाराम बापूजी यांस जळगावास नेमिलें.

या महिन्याच्या पहिल्या आठवड्यांत मुंबईकडे कापुस रवाना झाला व एकंदर या सालांत ठिकठिकाणाहून रवाना झाला त्याचें टिपण:—

| | आठवडा गंठ्ठे | एकंदर गंठ्ठे |
|---|---|---|
| हिंगणघाट | २७६ | ११६९६ |
| वर्धा | ७५ | १६८२७ |
| उमरावती | १७८७ | ६४५९० |
| मूर्तिजापूर | २०८ | ४१०४ |
| शिगाव | ३०७४ | ६६९८० |
| खामगाव | ४०७३ | ८८७९८ |
| नर्मदा व्हाली | २२८ | १८२१ |
| | ९६९१ | २९४८१६ |
| वायव्य प्रांताकडे वगैरे | २८२ | २७३६ |
| | ९९७३ | २९७५५२ |

प्रतिवर्षीं कापूस कसकसा अधिक जात आहे त्याचें एप्रिलच्या पहिले आठवड्याचें चार वर्षांचे टिपण—

सन १८७१।७२........ १५८७५८
,, १८७२।७३........ १८०८८४
,, १८७३।७४........ २३७३३०
,, १८७४।७५........ २९७५५२

यावरून दिसून येईल कीं या वर्षीं मागच्या सर्व वर्षांपेक्षां कापूस अधिक पिकला व बाहेर प्रांतीं अधिक रवाना झाला.

अकोला डिपुटी कमिशनर कोर्टांत आज कित्येक वर्षें मि. बावणलाल, गंगाधर जोरावरमल, बमनजी उकडजी वगैरेचा बांध वरोळ्या संबंधी दिवाणी दावा चालला आहे तो फार भानगडीचा असून वेळोवेळ अंमलदारांनीं मागें टाकिल्यामुळें शिलकेंत पडला आहे त्याचा फैसल करण्याचें हल्लींचे डिपुटी कमिशनर क्या० बुलक साहेब यांनीं मनावर घेऊन बहुत दिवस चौकशी जारी चालविली आहे. व उन्हाळ्याच्या सुटीच्या फुरसतींत तो मुकद्दमा चालविण्याकरितां त्यांनीं रेसिडेंट साहेबाची परमाणगीही आणविली आहे असें ऐकतो. या त्यांच्या मेहनतीबद्दल व आस्थेबद्दल आह्मी त्यांची तारीफ करितो. बुलक साहेब आपलें सर्व काम मोठ्या मेहनतीनें व दक्षतेनें चांगलें करीत असतात त्याचप्रमाणें याही मुकद्दम्यातील खरें मर्म लक्षांत आणून ते चांगला निकाल करतील असा भरवसा आहे.

उमरावतीस गोड्या पाण्याचें फार दुर्भिक्ष्य आहे व तें काढून टाकणें सरकारास व म्युनिसिप्यालिटीस अवश्य आहे असें असतां त्यांकडून कांहीं तजवीज होत नाहीं याजबद्दल वासून आमचे तेथील बंधू प्रमोदसिंधुकर्ते यांनीं एक आर्टिकल लिहिलें आहे त्यांतील विचार बरे आहेत व अधिकाऱ्यांनीं त्याकडे लक्ष्य द्यावें अशी त्यांची इच्छाही आहे. पण वासून असें आह्मी ह्मटलें तें यावरून कीं आमच्या बंधूनें आरंभींच ह्मटलें आहे कीं, विपुल पाण्याचें सुख उमरावतिस्थ लोकांच्या नशिबीं नाहीं व तत्संबंधीं दुवा घेणें सरकारच्या नशिबीं नाहीं असें आह्मी खात्रीपूर्वक सांगतों. अरेरे! इतकाही जर नशिबाचा सिद्धांत समजला तर मग पुढचा खटाटोप कशाला पाहिजे होता? असो. लोकांचे हाल पहावत नाहींत व कर्तव्यकर्म बजाविलें पाहिजे यासाठीं त्यांनीं सरकारास सूचना केल्या हें योग्य केलें.

## जाहिरखबर.

सर्व लोकांस कळविण्याकरितां देण्यांत येते कीं सुरेभान वल्लद रामाजी घोडे रहाणार नागापुर तालुके अकोट याणीं मौजे मजकुरचे सर्वे नंबर २९।३१।७।१४।५५ चीं शेतें व घर धाबें १ व बैलाच्या जोड्या तीन, ह्मैस १, गाय १, खाचर १, वगैरे माल आह्मास २००० रुपयांचा खरिदी देऊन याबद्दल खरिदीखतें तारीख ४ मार्च सन १८७४ चीं दोन लिहून दिलीं आहेत मात्र माल ताब्यांत दिला नाहीं तो घेणें आहे यास्तव सदर्हू माल कोणी गहाण अगर खरीदी वगैरे कोणते ही प्रकारें घेऊं नये. जाणोन कळविण्यांत आलें आहे. कळावें तारीख ४ एप्रिल सन १८७५ इसवी.

(सही) रामदत किसनदयाळ
वहिवटदार तनसुकदास

### मागाहून आलेली नोटिस.

नोटिस—गंगाई मर्द नागोजी वंजारी रहाणार मौजे आलेगाव तालुके बाळापूर जिल्हे अकोलें यांला. खालीं सही करणार याजकडून नोटिस देण्यांत येते कीं तुह्माकडेस रुईचे ओझ्याबद्दल रुपये ५० अगर रुईचें ओझें १ द्यावें व शिवाय १४४। रुपये व नारोबा सपरे याजबद्दल २७। रुपये एकूण २२१॥ व शिवाय व्याज जें होईल ते सुरू तारखेपासून द्यावे व नोटिस पावल्या दिवसापासून ८ दिवसांचे आंत आणून द्यावे न दिल्यास तुह्मावर दिवाणींत फिर्याद करून नोटिशीचे खर्चासुद्धां वसूल करून घेऊ. तारीख १२ माहे एप्रिल सन १८७५ इसवी.

( सही ) काशीबा वल्लद सदाशिव
निशाणी खुद्द

## वर्तमानसार

बडोद्यास स्पेशियल कमिशनरचे जाग्यावर सर रिचर्ड मिड साहेब यांची नेमणूक झाली त्याप्रमाणें १० वे तारखेस ते तेथें जाऊन रुजू झाले. त्यांनीं महाराजांची भेट घेतली व स्नेहभावानें वागण्याविषयीं आश्वासन दिलें.

११वे तारखेस सर लुई पेली व डा० सिवार्ड बडोद्याहून विलायतेस जाण्याकरितां निघाले.

दामोदर पंत गायकवाडाविरुद्ध नामांकीत साक्षीदार यांनीं आपली जप्त झालेली मालमिळकत लेखी अर्जानें सरकारास परत मागविली आहे. खरेंच त्यांनीं ती निढाळाच्या घामानें कमावलेली सब ब परत मिळाली पाहिजे दामोदर पंताला गंजिफा व बुदबळें खेळण्याची परमाणगी मिळाली आहे ठीक! आतां डाव कोणावर आणतात पाहावें.

मि० मेलविल साहेब जलंधरचे कमिशनर बडोदा कमिशन करितां आले होते ते आपले जागीं परत गेले.

काबुलास सरदार महमद याकूबखान फार आजारी आहेत असें समजतें.

सर टी माधवराव बडोद्यास दिवाण होणार अशीही एक गप्प आहे.

मि० शांताराम नारायण यांचा बांबे ग्याझेट कर्त्यावरील लायबलचा मुकद्दमा उद्यावर तहकूब आहे. मध्यंतरीं एक दिवस काम चाललें होतें त्यांत माफी मागण्याचा झोक ग्याझेटकर्त्यांनीं दाखविला पण त्यांतील शर्ती फिर्यादीस पटल्या नाहींत.

डाक्टर भाऊ दाजी यांच्या स्मारक करण्याकरितां ८८६५ रुपये जमले.

पंजाबांत रावी नदीवर रेलवेचा मोठा लोखंडी पूल केला तो तयार झाला आहे. थोड्या दिवसांवर त्याची परीक्षा केली तेव्हां तो टिकाऊ व फार मजबूद आहे असें दिसून आलें तो लवकरच चालू होईल असें वाटतें.

गेल्या हिंवाळ्यांत अमेरिकेंत जशी थंडी पडली होती तशी मागील ८० वर्षांत कधीं पडली नव्हती असें ह्मणतात. ज्ञा. द

गायकवाडसरकारचें दप्तर तपासण्याचे कामीं रावसाहेब रामचंद्र गोपाळ देशमुख व रा. बा. गजानन विठ्ठल गढून गेले आहेत.

पंदरपूर येथें अनाथ मुलांचे संरक्षणाची सोय तेथील मामलेदार साहेब व डाक्टर साहेब वगैरे योग्य गृहस्थांनीं केली आहे. हें ऐकून आह्मांस बहूत संतोष वाटतो. ज्या स्त्रिया गर्भपात करून मुलें टाकितात त्यांनीं तीं जन्मास आलेलीं बालकें न मारितां तेथील इस्पितळांत न्यावींत व तेथें एक खोली केली आहे, ती खोली बंद असते; परंतु एक खिडकी मात्र उघडी असून मुलें ठेवण्यास जागा केली आहे तेथें तें मूल ठेवून घांटी वाजवून निघून जावें. नंतर त्या मुलाची सर्व प्रकारें व्यवस्था करण्याची तजवीज उत्तम केली आहे. या कामाकरितां एक दोन दायही ठेविल्या आहेत असें ऐकतो. न्याय. सिं.

बडोद्यास रेसिडेन्सीच्या हद्दींत पुष्कळ सोमल छपवून ठेविलेला सांपडला अशी गप्प आहे ह्मणून टै. कर्ते ह्मणतात.

बोखाऱ्याचे राजे घोड्यावर जात असतां त्यांजवर दोघां असामीनीं गोळ्या घातल्या. त्यांजपैकीं एक घोड्याच्या पायास लागली. याचें कारण अगर हेतु कांहीं समजला नाहीं.

चमत्कारिक गप्प— सिंध प्रांतांत एका कामगारानें आपल्या चाकराच्या डोकींत रूळ मारला त्याच्यायोगानें तो तत्काळ मेला असें ह्मणतात. ही गोष्ट सिंदियन पत्रकर्ते लिहितात. या वदंतेस काय व कितपत आधार असेल कोण जाणे.

चमत्कारिक जोडा— पारिसमध्यें लाबील आरलीसीन नांवाच्या सहा फूठ पांच इंच उंचीच्या राक्षसीण मुलीचें प्रिन्सत्रीब नांवाच्या सरासरी तीन फूट उंचीच्या ठेंगु मुलाशीं थोड्या दिवसांपूर्वी लग्न झालें असें हिं. पे. वरून कळतें. वधुवरांचा काय माफक जोडा!!! इं. प्र.

कलकत्ता हायकोर्टाचे माजी चीफ जस्टिस व बडोदे कमिशनचे अध्यक्ष सर रिचर्ड कौच हे आपल्या मडमेसह तारीख ९ मिनहूच्या आगबोटींतून विलायतेस गेले.

कैलासवासी श्रीमंत खंडेराव महाराज यांची राणी जम्नाबाई साहेब यांणीं कांहीं प्रकरणाबद्दल कलकत्ता सरकारास अर्ज केला होता. त्यावर सदहू अर्जाचा निकाल बडोद्यास मिळेल असा हुकूम मिळाला आहे.

वायव्य प्रांताचे लेफटिनेंट गवर्नर यांणीं असा जाहिरनामा लाविला आहे कीं, पुढें कांहीं विशेष प्रसंग खेरीजकरून झांशी प्रांतांतील, असिस्टंट डिस्त्रिक्ट सुपरिंटेंडेंट आफ पोलिस, एक्स्ट्रा असिस्टंट कमिशनर या दोन जागा वायव्य प्रांतांतील नेटिव लोकांखेरीज दुसरे कोणास दिल्या जाणार नाहींत.

श्रीमंत मल्हारराव महाराज गायकवाड यांस गादीवर बसविण्याबद्दल पुणें, सातारा, धुळें, ठाणें, वाई व सुरत वगैरे ठिकाणचे रहिवासी लोकांकडून अर्ज गेले असें समजतें. ने. ओं.

श्रीमंत तुकोजीराव होळकर यांची स्वारी कलकत्त्यास गेली होती त्यावेळीं खालीं लिहिल्याप्रमाणें देणग्या दिल्या.

| | | रुपये. |
|---|---|---|
| १ | ब्रिटिश इंडिया असोसिएशन | १००० |
| १ | इंडियन रिफार्म असोसियशन | १००० |
| १ | प्रेसिडेन्सी कालेज | ५०० |
| १ | मेडिकल कालेज | ५०० |
| १ | कलकत्ता स्कूल | ५०० |
| १ | नेटिव बायकांचें नार्मलस्कूल | ५०० |
| १ | संस्कृत कालेज | २५० |
| १ | हिंदुमहिला विद्यालय | २५० |
| १ | द्वारकानाथमित्र मेमोरियलफंड | २५० |
| १ | डिस्त्रिक्टच्यारिटेबल सोसैटी | २५० |
| १ | फादर लाफंड्स स्पेक्टोटेली स्कोप फंड | २०० |
| १ | सोसैटी आफ सेंटव्हिनसेंट डोपाल | १५० |
| १ | जनावरास इजा देण्याचाप्रतिबंध करणारी मंडळी | १०० |
| १ | बेथुन मुलींची शाळा | १०० |
| १ | उटरपारा हितकारी सभा | १०० |

या खेरीज आणखी कांहीं लहान लहान रकमा दिल्या. कि. धा.

## वऱ्हाडचा इतिहास

( मागिल अंकावरून पुढें चालू. )

मेसर्स पेस्तनजी आणि कंपनी यांनीं वऱ्हाडामध्यें बहुत शेतकरी लोकांनां उदारपणानें पुष्कळ पैसे कापूसवगैरें माल तयार करण्याकरितां अगाऊ दिले. ही गोष्ट याकालीं मोठी उत्तम झाली. कारण वऱ्हाडप्रांत उद्वस्त झालेला असून कांहीं कांहीं गावें बेचिराग झालीं होतीं त्यांतून पेस्तनजीच्या प्रयत्नानें पुन्हा वस्ती व आबादी झाली. त्यामुळें वऱ्हाडांत चोंहोंकडे पेस्तनजी व कंपनीचें नाव शेतकरी लोकांत मोठ्या कीर्तीनें अजून गाजत आहे. या अशा प्रकारच्या सर्व कृत्यांचा परिणाम असा झाला कीं राज्यकर्त्याचा आब गेला व त्याला विशेष कारण राजा चंदूलाल दिवाण याचा अव्यवस्थितपणा झाला. जमाबंदी वसूल बरोबर येईना. सन १८४३ सालीं व त्यापुढचीं कित्येक सालें सन १८०० च्या तहनाम्याप्रमाणें इरेग्युलर फौजेच्या तनख्यास पैसा शिलक नाहीं ह्मणून इंग्रजसरकारापासून घ्यावा लागला. सन १८५० सालींही पुष्कळ देणें थकलें याशिवाय इंग्रजसरकाची निजामावर आणखी कांहीं घेणीं होतीं. पुढें सन १८५३ सालीं इंग्रजाचे एकंदर कर्जाचा हिशेब पहातां ४० लक्ष रुपये देणें निघालें. व निजाम सरकारचें असें दिवाळें निघाल्यामुळें त्याच्या राज्यकारभाराची घडी विसकटली व पलटणीची तैनात न मिळाल्यानें कांहीं राजकीय संबधांत गडबड होईल असा धाक दिसून आला. त्याकरितां सन १८५३ सालीं निजाम सरकार व इंग्लिश सरकार यांच्या दरम्यान नवीन तहनामा झाला व त्या तहनाम्यानें हल्लीची हैदराबाद कंटिंजेंट नावाची फौज इंग्रज सरकाराकडून ठेविली गेली. पूर्वीं लढाईच्या वगैरे प्रसंगीं इंग्रजांनीं फौज मागितली असतां निजामानीं दिली पाहिजे अशा शर्तींची तहनाम्यावरून जी फौज होती तिच्या बदला आतां ही कंटिंजेंट फौज झाली. व हिच्या खर्चाकरितां आणि इंग्रजांच्या दुसऱ्या कर्जाकरितां त्यांनीं निजामापासून सालीना ५० लक्ष रुपये वसुलाचा मुलुख घेतला. तोच हा हालींचा वऱ्हाडप्रांत यांत बालाघाट आणि पाईणघाट आहे. याची हद्द पूर्वींच्या निजामसरकारच्या वऱ्हाड प्रांताइतकी नाहीं तरी सुभ्याच्या खालोखाल आहे.

सन १८५३ सालच्याच तहनाम्यावरून या अमानी मुलखाशिवाय धाराशीव आणि रायचूर दुआब हे प्रांत इंग्रजाकडे दिले होते. व असा ठराव झाला होता कीं इंग्रजानीं मुलुख संबंधी जमाखर्चाचे हिशेब निजामास प्रतिवर्षास देत जावे व खर्च भागून शिलक उरेल तीही निजामास देत जावी. या दिवसापासून निजाम सरकार इंग्रजास लढाई प्रसंगीं फौजांची मोठी कुमक करण्याचे जबाबदारींतून मुक्त झालें आणि कंटिंजेंट फौज निजामाच्या सैन्याचा एक भाग अशी होती तिचें तें नाव जाऊन ती इंग्रजांची फौज ठरली व तिनें निजामास प्रसंगीं सहाय करण्यास सिद्ध असावें असा तिचा उपयोग ठरला.

## जाहिरात.

आह्मी खालीं सही करणार सर्व लोकांस जाहिर करितों कीं आमचा टप्पा अकोल्यापासून इंगोलीपावेतों घोड्याचे गाडींतून जाण्याचा सुरू झाला आहे; व अकोल्यापासून इंगोलीस जाणारे जे पासेंजर त्यांस वाशिमापावेतों सदहू गाडींतून नेणें व वाशिमाहून अकोल्यापावेतों आणण्याचें हल्लीं सुरू केलें आहे. इंगोलीचा टप्पा हल्लीं चालू नाहीं याजकरितां लोकांस वाशिमापावेतों पासेंजर दाखल होणें असल्यास त्याचे दर—सरदार लोकांस एका इसमाचे रुपये ७ द्यावे लागतील व त्यासमागमें बोजा १० शेर जाईल व एतद्देशीय लोकांस एका इसमास रुपये ४ पडून बोजा ५ शेर पावेतों जाईल याप्रमाणें दर आहेत तारीख ३ माहे एप्रिल सन १८७५ इसवी.

( सही ) बमनजी उकडजी आणि कंपनी दुकान अकोलें

GREAT INDIAN PENINSULA RAILWAY
CONVEYANCE OF COTTON TO COLABA SIDINGS
NOTICE.

## नोटिस.

## ग्रेट इंडियन पेनिनसुला रेलवे.

### कुलाबा येथील साइडिंग्सकडे कापुस नेणें.

या लेखाच्या द्वारानें जाहिरखबर दिली जाते ऐशीजे, एप्रिल महिन्याची तारीख १ ली गुरुवार या दिवशीं आणि या दिवसांनंतर दुसरी जाहिरखबर देईपर्यंत या कंपनीनें मुंबईत आणलेला कापूस, जर मालक सांगतील तर, थेट कंपनीच्या कुलाबा येथील साइडिंग्सकडे नेण्यांत येईल.

या रेलवेकडून जास्ती अंतरावर कापूस नेला जाईल त्याबद्दल ही कंपनी मुंबईस कापूस आणण्याविषयीं साधारण नेहमीं जे हशील घेते त्याखेरीज दर मणास एक पै प्रमाणें जास्त हशील घेण्यांत येईल.

कुलाब्यास कापूस रवाना केला असल्यास मुंबईंतील दुसऱ्या स्टेशनावर करतात त्याप्रमाणेंच "साइडिंग्स" येथें कापूस स्वाधीन करून घेण्याची तजवीज खासगी रीतीनें कापूस रवाना करणारांनीं स्वतःच केली पाहिजे.

एक दिवस अथवा एक दिवसाचा भाग याबद्दल दररोज दर मणास चार आणे, कापूस पोंचल्यापासून २४ अवरांच्या आंत तो घेऊन जाण्याची तजवीज न केल्यास, सर्व कापसावर वखारीचें भाडें ह्मणून आकार घेतला जाईल.

कापूस कुलाबा येथील "साइडिंग्स" कडे रवाना करावयाचा आहे असें तो रवाना करणाऱ्यांनीं रवानगीचिटींत लिहिलें पाहिजे. याप्रमाणें कुलाब्यास कापूस रवाना करण्याविषयीं हुकूम नसल्यास आजपर्यंत येत होता त्याप्रमाणें तो बोरीबंदर येथें आणिला जाईल.

**हेनरी कांडर,**
जनरल ट्र्याफिक म्यानेजर.
मुंबई ता० २२ माहे मार्च
सन १८७५ इसवी.

## नोटिस.

नोटिस — जुगनबेग वल्लद लालबेग रहाणार भांबोरी तालुके अकोट यांस शेखचांद वल्लद शेखइस्मायल रहाणार इसापूर याजकडून कळविण्यांत येते कीं तुह्मी आह्मास तारिख २१ माहे मार्चचे वऱ्हाडसमाचार पत्रांतून नोटिस दिली तिचा जबाब येणें प्रमाणें.

आमचे कन्येशीं तुह्मी मागणी केली ही गोष्ट खरी आहे व त्याप्रमाणें आह्मी आपली मुलगी तुह्मास देणें योग्य होतें परंतु तुह्माकडून त्याप्रमाणें वर्तन झालें नाहीं. याचा दोष तुह्मावरच आहे. सुमारें ७ वर्षांमागें तुह्मी मागणी केली व पुढें लागलीच लग्न करावयाचें परंतु तसें न करितां तुह्मी आमची मुलगी बाजूस ठेवून पिंपळगावकर मुलिशीं लग्न केलें तेव्हां अर्थांतच तुह्मी करार मोडला व आपला पैसा बुडवून घेतला. मात्र तुमचे असें करण्यानें आमचे मागणीचे प्रसंगी खर्च झालेले रुपये १४८॥. एकशे साडे अठेचाळीस हे देण्यास तुह्मी जबाबदार झाला सबब ही नोटिस पोचल्यापासून ८ दिवसांत आमचे रुपये व्याजासुद्धां आणून द्यावे. व तुमचे मागणीचा व त्यासंबंधी खर्चाचा आह्माकडे अर्थी अर्थी कांहीं संबंध राहिला नाहीं व आह्मी आपली मुलगी दुसरीकडे लग्न करून देण्याचें आतां ठरविलें आहे कळावे तारिख १२ माहे एप्रिल सन १८७५ इसवी.

( सही ) शेखचांद वल्लद शेख इस्मायल निशाणी खुद.

हें पत्र अकोलें एथें खंडेराव बाजाजी फडके यांचे वऱ्हाडसमाचार छा. छा. प.

REGISTERED NO 5, 1875

# वऱ्हाडसमाचार.

पुस्तक ९ अकोला, रविवार ता० २५ माहे एप्रिल सन १८७५ इ० अंक १७

## जाहिरात.

### वऱ्हाडसमाचाराचीकिंमत.

| | रु. |
|---|---|
| वर्षाचे अगाऊ | ५ |
| सालअखेर | ७ |
| फुटकळ अंकास | ०४ |
| डांकइशील | |
| वर्षाचे अगाऊ | १०८ |
| " अखेर | २ |

नवीन वर्गणीदार होऊ इच्छिणारे लोकांकडून आगाऊ वर्गणी आल्या खेरीज पत्र सुरू केलें जाणार नाहीं

### नोटिसीबद्दल.

| | |
|---|---|
| मराठी, दर ओळीस | ०१०६ |
| तीच नोटिस दुसरे खेपेस | ०१ |
| इंग्लिश लिपींत दर ओळीस | ०४ |
| " दुसरे खेपेस | ०२ |

### नोटिसा.

नोटिस – सोनाई बापाचें नाव भोगाजी उंबरकर मुक्काम वडनेर गंगाजीचें तालुके दर्यापुर जिल्हा इलिचपुर इजला आनंदा वल्लद म्हसाजी मोतळकार रहाणार लाखणवाडा तालुके बाळापुर याजकडून नोटिस देण्यांत येते कीं. आह्माशीं तूं गंधर्व करण्याचें कबूल केलेंस त्यावरून तुला रुपये ३५० आम्ही रोख दिले. त्याला सुमार एक वर्ष झालें. नागदिव्याचे वेळीं आम्ही तुझे गावीं येऊन गंधर्व करण्याचा ठराव केला त्याप्रमाणें आम्ही आलो असतां तूं गंधर्वांत नाकबूल गेलीस असें करणें तुला योग्य नव्हतें. सबब अजून समजून तूं ताळ्यावर यावें व ठरलेला तुझा आमचा गंधर्व होऊन जावा व तूं सुखानें नांदावें अशी आमची फार इच्छा आहे याजकरितां ही नोटिस पोचल्यापासून ८ दिवसांत दुसरे कोणाचें कांहीं बदफैल न ऐकतां मुकाम्यानें आमचे गावीं यावें व गंधर्व करावा. तुझ्या मुलाचीं लग्नें करावयास आम्ही कबूल आहो. इतक्या उपर तुला आह्माशीं गंधर्व करणें नसेल तर आह्माला असें नादीं लावण्याचें कारण काय ! तें नोटिस पोचल्यापासून ८ दिवसांचे आंत कळवावें व आमचे रुपये ३५० व्याजसुद्धां आमचे येथें पाठवून द्यावे. याप्रमाणें. एक तर गंधर्व करावा किंवा आमचे रुपये परत करावे यांतून तूं एक गोष्ट सदरीं लिहिले मुदतींत तूं करणार नाहींस तर तुजवर रुपयाबद्दल दिवाणींत व ठकबाजीबद्दल फौजदारींत फिर्याद करू. मग तुझी फार गैरअब्रू होईल हें लक्षांत आणून जें करणें तें करावें व नोटिशीचा जाब जलद द्यावा. कळावे तारीख २२ एप्रिल १८७५ इ०

(सही) आनंदा वल्लद म्हसाजी मोतळकार निशाणी खुद्द हातची असे

नोटिस—माहादु ठाकरे रहाणार कोसगाव प्रगणे पातूर तालुके बाळापुर जिल्हे अकोले यास खालीं सही करणार याजकडून देण्यांत येतें कीं आमचे रुपये तुह्माकडेस १५० दीडशें शिक्का कंपनी दोन वर्षांपासून आहेत व त्याबद्दल स्टांप कागदावर तुह्मी रोखाही लिहून दिला आहे. हे रुपये आह्मी तुह्मास दोन चार वेळा मागितले तर तुह्मी चाळवाचाळव करून देऊं देऊं ह्मणता परंतु देत नाहीं ह्मणून ही मुद्दाम नोटिस दिली आहे तर ही पावल्यापासून पंध्रा दिवसांचे आंत सदरीं लिहिलेले रुपये दीडशें व्याजासुद्धां आणून द्यावे नाहीं तर दिवाणी कोडतांत फिर्याद करून नोटिशीच्या खर्चासुद्धां रुपये घेतले जातील कळावें. तारीख २२ माहे एप्रिल सन १८७५ इसवी.

( सही ) सिताराम राजाराम शिंपी दुकान पातूर वहीवाटदार गजानन घनाजी

नोटिस—काशिबा वल्लद सदाशिव सावले वंजारी वस्ती मौजे आलेगाव तालुके बाळापूर यांस आह्मी खालीं सही करणार कळवितों कीं तुह्मी आह्मास ६६८१४ साहसष्ट रुपये चवदा आणे देणें आहे ह्मणून रजिष्टर पत्र पाठवून कळविलें त्यास तुमचे आह्मी रुपये कधींही घेतले नसून त्याजबद्दल आमचा दस्तैवजही तुह्मापाशीं कांहीं नाहीं सबब आह्मी तुमचे देणें कांहीं बिलकूल लागत नाहीं हें ह्या नोटिशीनें कळवितों व या नोटिशीचा खर्च जो लागला तो तुह्मापासून भरून घेतला जाईल कळावे तारीख २२ माहे एप्रिल सन १८७५ इसवी.

[ सही ] देवराव वल्लद सोयरासा रंगारी निशाणी खुद्द हातची असें.

नोटिस —– पीरअमद वल्लद शेखरहिमान मुसलमान रहाणार पातुर शेखबाबू प्रगणे बाळापुर जिल्हे अकोले यास खालीं सही करणार याजकडून देण्यांत येते कीं, आमचे रुपये ३१। शिक्के कंपनी तुह्माकडे असून त्याजबद्दल स्टांप कागदावर पुर्जा झालेला आहे. हे रुपये आम्ही तुह्मास पांच चार वेळा मागितले तेव्हां चाळवाचाळव करून देऊं देऊं ह्मणाला परंतु आजवर दिले नाहींत तर ही नोटिस पावल्यापासून पंध्रा दिवसांचे आंत सदर्हू रुपये आणून द्यावे व आपला पुर्जा घेऊन जावा. याप्रमाणें मुदतींत न केल्यास दिवाणी कोडतांत फिर्याद केली जाईल व या नोटिशीच्या खर्चासुध्धां सर्व रकम वसूल करण्यांत येईल हें खुप समजावें. कळावे. तारीख २२ माहे एप्रिल सन १८७५ इसवी.

(सही) सिताराम राजाराम साहू दुकान पातुर वहिवटदार गजानन घनाजी.

नोटिस—सर्व लोकांस समजण्याकरितां कळविण्यांत येतें कीं सखाराम वल्लद जानजी सुतार रहाणार मौजे अगर तालुके अकोले याजवर आजरोजीं आह्मा रुपये ३९०।= चा स्मालकाज कोर्टांत दावा केला आहे आणि आमचे सदर्हू दाव्याचे अमलबारींत माल सांपडूं नये ह्या इराद्यानें सखाराम हा आपलें घर वगैरे जिंदगी विकणार आहे यास्तव कळविण्यांत येतें कीं सदर्हू इसमाचा माल, घर वगैरे कोणी वरील कारणानें विकत घेऊं नये घेतल्यास तें घेणें कपटाचें समजलें जाईल.

सखाराम सुतार ह्यास कळविण्यांत येतें कीं तुह्मी आपलें घर वगैरे कोणास विकूं नये कळावें. तारीख २२ माहे एप्रिल सन १८७५ इसवी.

( सही ) नारायणजी वल्लद रघूजी तेली दस्तूर खुद्द

## पत्रव्यवहार

या सदराखालील मजकूर पत्रकर्त्यांच्या मतास मिळूनच असतील असें समजूं नये

रा. रा. वऱ्हाडसमाचारकर्ते यांस:–

वि. वि. एडिटर साहेब अलीकडे आपले सेवेंत आलों नाहीं येणेंकरून रागाऊं नका. मी बहुतकरून या प्रांतांत फिरत असल्यामुळें आलों नाहीं आतां खालील मजकुरास जागा द्याल ह्या उमेदीनें पत्र लिहिलें आहे.

माहाराज वऱ्हाड प्रांतांत ज्या हपिसाकडे पहावें त्या हफिसाचे बाहेर दोन चार दहा पांच रुमालवाले, बडपगड, छोटी पगड, असे सुशोभित, रुमाल आणि दऊत व एक एक बसण्यास आसन घेऊन बसलेले दिसले. मला कांहीं जरूर पडल्यावरून त्यांजपाशीं जाऊन विचारूं लागलों कीं आपण कोठील कोणचे तीर्थाचे उपाध्ये आहात? त्यांणीं कळविलें कीं. आह्मी पोटउपाध्ये आहोत. आमचा धंदा अर्ज वगैरे लिहून उदरनिर्वाह करण्याचा आहे. सर्व सुख आहे परंतु अमलदाराचे हुकमानें बाहेर उन्हांत बसावें लागत आहे. काय करावें कचेऱ्यांतून ज्या लोकांत ह्मणजे रयतेस बसण्याकरितां जागा एक ठेविली आहे तेथें देखील बसण्यास हुकूम नाहीं. अरेरे एडिटर साहेब दयाळू सरकारांनीं ह्या लोकांवर नजर फेकली तर सहज अडचण दूर होणार आहे. अशा उन्हाळ्यांत पांखरूं देखील निवाऱ्याची जागा पाहून चार घटका काळ कंठित असतें तेव्हां माणसासारख्यास सर्व सोयी करितां येतात तेव्हां या बिचारे पोट उपाध्यांस पांखरा इतका देखील निवारा नाहीं. हें पाहून वाईट वाटतें. आतां आपण जरा या लोकांचे हिताकरितां कोसीस कराल तर सहजीं होणार आहे ह्मणजे यांजला एक स्वतंत्र जागा नेमून द्यावी अथवा बाहेरचे बाजूस यांणीं एखादें आपआपले पर्णकुटिकेसुद्धां बसण्यास ठिकाण करावें, त्यांस जागा लागल्यास अधिकारी यांणीं लक्ष पुरवून द्यावी ह्मणजे बिचारे निवाऱ्यांत रहातील व आपणास दुवा देतील. विस्ताराची माफी असावी हे विनंती. तारीख १६ माहे एप्रिल सन १८७५ इसवी.

एक फिरस्ता.

रा० रा० खानदेशवैभव कर्ते यांस.

वि० वि० खालील मजकुरास अवश्य स्थळ मिळेल अशी आशा धरून तसदी दिली आहे.

आजकाल हिंदुस्थानांत इंग्रज सरकारचे राज्याची भरभराटी होऊन त्या राजव्यवस्थेनें प्रजाही सर्वतोपरी सुखी होत आहे परंतु हिंदु या अभिधानाचे कारणानें मराठी राज्याबद्दल तीस आनंद व कळवळा असणें रास्तच आहे.

बडोद्यांतील संकट उपस्थित झाल्यापासून आज गायकवाडींतील प्रजाचशी काय, पण सर्व हिंदुस्थानांतील हिंदु प्रजा त्याचे निरसनार्थ आपले परीनें उपाय करीत आहे. या कामांत नार्थब्रूक यांणीं जें आपलें अप्रतिम चातुर्य प्रकट केलें, त्याबद्दल शेंकडों ठिकाणचे लोकांनीं त्यांस आभारदर्शक पत्रें पाठविलीं. मध्यंतरीं पैशाचे कमताईबद्दल हा हा:कार होण्याबरोबर शेंकडों ठिकाणीं लोक वर्गण्या करण्यास तयार झाले. कित्येक ठिकाणीं पुराणाचे सप्ताह चालले आहेत. कोठें कीर्तन समारंभ होताहेत, कोणी अनुष्ठानें बसविलीं आहेत. कित्येक एकनिष्ट ब्राह्मण तर देवद्वारीं धरणें घेऊन बसले आहेत अशी यथाशक्ती सर्व प्रजा मल्हारीच्या मुक्तीकरितां ईश्वराची सेवा करीत आहे. त्याप्रमाणें हिंदु धर्मास स्मरून मीहीं खालीं लिहिल्याप्रमाणें यथामती रचलेलीं पदें गाऊन ईश्वरास आळवितो कीं, जेणेंकरून त्या जगन्नियंत्या प्रभूचें मन सत्वर दयार्द्र होवो व मल्हारराव महाराज लवकर राज्यावर ( गादीवर ) येवोत अशी इच्छा करितों.

पद.

( उद्धवा शांतवन कर जा, या चालीवर )

गाणगापुरवासी दत्तया ॥ विनतीही परिसावी ॥ ध्रु० ॥ तव इच्छे हा प्रकार घडला ॥ मल्हारी संकटिं सांपडला ॥ तव कोपानळ बहु कडकडला ॥ गति त्या न दिसे अजि बरवी ॥ १ ॥ गाण० ॥ विष पानाच्या आरोपें ॥ प्रभुवधी पति बहु कोपें ॥ अ-

धिकार हिरवुनि बहु तापें ॥ कारागृहीं त्या ठेवी ॥२॥ गाण०॥ तव कृपें हा मंत्री द्रवला ॥ देवुनी अमुप द्रव्याला ॥ हिंदु इंग्रज सम भागाला ॥ नेमुन चौकशि कर्वी ॥३॥ गाण०॥ न्यायांतीं सार निघालें ॥ निरपराधी ऐसें वदलें ॥ मोरेश्वर हर्षें डोले॥ तव चरणीं प्रीति जडवी॥ ॥४॥ गाणगापुर वासी सखया॥

**दिंडी.**

चौकशीचा इत्यर्थ असा झाला॥
दोष नाहीं कांहींच भूपतीला॥
नार्थब्रुकाचे मनीं जलद फूटे॥
प्रेम पाझर तो सकल प्रजा लूटे॥१॥

**पृथ्वी वृत्त**

दयार्द्र प्रभुतो आतां करिल सत्वरी ही कृपा॥
कृतार्थ पद देणगी तशि सतत तीही कृपा॥
प्रजाहि बहु आतळों नृप अभिष्ट चिंता मनीं॥
भुपाहि अशिवुद्धिदे सतत कीर्तिवादे जनीं॥१

**आर्या.**

॥पश्चिम समुद्र वासी ॥
॥राणीच्याही ध्वजास यश येवो
तत्शत्रु सर्व निरबी ॥
॥ भारत वर्षी प्रजाहि गित गावो ॥१॥

**आरती.**

जयदेव जयदेव जय नृसिंह स्वामीन् जय सद्गुरु स्वमीन्॥ सर्वस्वें शरण मी आनन्य दीन मी॥ होतों तुझिये आधिन् जयदेव॥ बहुजन पालक पश्चिम तारा मल्हारी ॥ज्याच्या दुःखा ऐकुनि ज्याच्या विपत्ति पाहुनि नयनीं वाहे वारी॥ सत्वर उघडूनि नयनातें संकट हें वारी॥ तुझिया हेतू मार्वे तुझिया लीला मात्रें आटो हें वारी ॥१॥ जयदेव०॥ बहु जहाली सीमा आतां न पहावा अंत॥ सिंहासनी मल्हारी- छत्र ढळित मल्हारी सत्वर व्हावास्थित॥ सर्व भारत प्रजा ही पडली चिंतेंत॥ मोरेश्वर विनवी- मोरेश्वर आळवी पुरवी हाचि हेत ॥२॥ जयदेव जयदेव ॥

मोरेश्वर बळवंत फणसे

---

वऱ्हाडसमाचार

मिती चैत्र वद्य ५ शके १७९७

## श्री० मल्हारराव गायकवाड यांवर महत्संकटाचा प्रसंग.

बहुत दिवस ज्या गोष्टीचा निकाल कसा काय होतो याविषयीं लोक चातकापरी वाट पहात होते, व जो निकाल बहुधा संतोष कारक व्हावा असें हजार प्रकारावरून लोकांचें अनुमान झालें होतें तो निकाल शेवटीं दुःखकारकच होऊन मल्हाररावांस सर्वतोपरी संकटाचा झाला हे वर्तमान आमचे वाचकांत कळविण्यास आह्मास परम खेद वाटतो.

या आठवड्यांत कांहीं दिवस वर्तमान असें होतें कीं विलायत सरकारचे मनांत मल्हारराव यांस पुन्हा गादीवर बसवावें असें आहे, पण हिंदुस्थान सरकार त्या गोष्टीसवा कडे जातें. पुढें दुसरें वर्तमान निघालें होतें कीं विलायत सरकारचे आग्रहावरून हिंदुस्थान सरकारानें मल्हाररावांसंबंधीं सर्व कागदपत्र विलायतेस रवाना केले व ते तिकडे जाऊन त्यांचे पहाण्यांत येईपर्यंत या गोष्टीचा निकाल समजणार नाहीं. नंतर तिसरें वर्तमान असें निघालें होतें कीं सरकारानीं मल्हाररावांस कळविलें होतें कीं तुह्मी निराश होऊं नये तुमचा परिणाम सुखकारक होईल. नंतर शेवटीं चौथें वर्तमान असें प्रगट झालें कीं गेल्या सोमवारीं हिंदुस्थान सरकारानें सिमला येथें स्पेशियल कौन्सल भरऊन मल्हाररावाबद्दल ठराव केला व विलायत सरकारानें तो करण्याविषयीं त्यांस पूर्ण अधिकार दिला. नंतर सोमवारीं ठराव होऊन अजून बाहेर कां पडत नाहीं याविषयीं लोक साशंक होते शेवटीं हिंदुस्थान सरकारचें विलायत सरकाराविरूद्ध जसें मत होतें तशाच रीतीचा त्यांनीं ठराव करून तो गुरुवारीं अमलांत आणिला तो प्रकार असाः—

सर जनरल मिड साहेब स्पेशियल कमिशनर यांनीं हिंदुस्थान सरकारचे हुकुमावरून मुंबईहून एक स्पेशियल ट्रेन आणविली आणि गुरुवारीं शहरांतून छावणींत व छावणींतून शहरांत कोणीही जाऊं नये असा सक्त बंदोबस्त केला, रेलवे स्टेशनावर कोणास येऊं दिलें नाहीं, रेलवेचें तारायंत्र बंद ठेविलें, मल्हारराव यांस भेटण्यास जाणारे पासवाले लोक यांनाही बंदी केली, व मल्हाररावांची कन्या सौ० कमाबाई साहेब मिड साहेबांच्या भेटीस गेली होती तिचीही भेट त्यांनीं त्या दिवशीं घेतली नाहीं, व मल्हाररावांस आपले बायका मुलांस किंवा कोणासही भेटूं दिलें नाहीं एवढेंच नाहीं पण गाडींत बसावयाच्या मिनिटापर्यंत त्यांस कांहीं कळूंही दिलें नाहीं आणि सर्व तयारी करून गुरुवारीं संध्याकाळचे सहा वाजतां स्पे० ट्रेनमध्यें घालून व बरोबर २६ सोजरांचा पाहारा देऊन त्यांस एकदम बडोद्याहून काढिलें. त्याप्रसंगीं कोणत्याही रेलवे स्टेशनावर मनुष्यें फिरकूं दिलीं नाहींत, व गाडीही दर एक स्टेशनावर उभी न करितां पाहाटेच्या रात्रीं दादरच्या स्टेशनावर उभी करून तेथून जी. आय. पि. रेलवेवर घेतली व थेट अलाहाबादेकडे हाकली. अलाहाबादेजवळ चुनारचा किल्ला आहे तेथें त्यांस ठेवणार.

मल्हाररावांला गुरुवारीं रात्रीं घेऊन गेले परंतु तें वर्तमान त्याच काळीं बडोद्याचा टाइम्सचा स्पेशियल बातमीदार मुंबईस तारायंत्रानें कळवीतअसतां सरकारानें त्याच शुक्रवारचा टाइम्स छापून बाहेर निघेपर्यंत ती बातमी त्यांच्या आफिसांत पोचूं दिली नाहीं. ती मग त्यांस समजली व ती त्यांनीं शनवारचे आपले पत्रांत काल प्रसिद्ध केली.

गुरुवारीं रात्रौ मल्हाररावांस बडोद्यांतून रवाना केल्यानंतर मिड साहेबांनीं सरदार लोकांचा दरबार भरविला व हिंदुस्थान सरकारचा जाहिरनामा त्यांनां कळविला. त्या जाहिरनाम्याची प्रत अजून पहाण्यांत आली नाहीं.

तारेंतून वर्तमान समजलें त्यांत इतकें मात्र समजलें आहे कीं, मल्हाररावास राज्यभ्रष्ट करण्यास "विषप्रयोगाचा प्रयत्न" हेंच केवळ कारण नव्हे. आणखी बहुत गोष्टी आहेत. त्या आतां उदयास आल्यावर त्या विषयीं विशेष लिहितां येईल.

असो एकंदर सर्व गोष्टींवरून लार्ड नार्थब्रूक यांणीं मल्हाररावाचा शेवट फार वाईट प्रकारचा केला व न्यायाच्या दृष्टीनें तो अशा थरावर जाईल असें कोणास वाटलें नव्हतें. अस्तु. इंग्रज सरकार जबरदस्त आहे व सार्वभौम आहे, आणि इकडील राजेलोक दुर्बळ व मांडलीक आहेत ह्मणून कसेंहि झालें तरी इंग्रज सरकारची इच्छा तोच त्यांनां न्याय आहे असें त्यांनीं पूर्णपणें समजलें पाहिजे. अस्तु. आमचें पत्र पुरें होण्याच्या ऐन वेळावर हा महत्वाचा मजकूर आह्मास समजला ह्मणून थोडक्यांत घेतला आहे. आतां याचा विशेष प्रस्ताव पुढें करूं.

---

## क्रिस्तभक्त गोविंद शास्त्री लेले.

या भूतलावर कित्येक प्रसंगीं नानातऱ्हेचे चमत्कार केवळ कल्पनेबाहेर असे घडून येतात. नाशिकाजवळ त्रिंबकास वे. शा. सं. रा. रा. गोविंद शास्त्री लेले या नावाचे एक मोठे विद्वान ब्राह्मण राहात होते ते ख्रिस्ती झाले ह्मणून दोन महिन्यापूर्वीं एकाएकीं ऐकिलें यावरून बहूत लोकांत फार आश्चर्य वाटलें. गोविंद शास्त्री यासारखा कर्मट, विद्वान व चतुर पुरुष ख्रिस्ती झाला हें ऐकण्यास कोणाचें मन घेईना. आमचे वाचकांपैकीं कोणास गोविंद शास्त्री प्रत्यक्ष ठाऊक नसतील तर त्यांनीं शास्त्री बावानीं केलेल्या जानकीपरिणय नावाच्या संस्कृत नाटकाचें उत्तम भाषांतर पाहावें. तसेंच शिवाजी राजावर शास्त्री बुवानीं केलेली कविता दक्षिणाप्राइज कमिटीनें पसंत करून त्यांस ४०० रुपयांचें बक्षीस देऊन छापविली आहे ती पाहावी; या दोहोंवरून त्यांची विद्वत्ता व योग्यता दिसून येईल. असले गृहस्थ ख्रिस्ती झाले यावरून खरोखर हिंदुशास्त्रांत कांहीं जीव नाहीं व ख्रिस्ती धर्मापासून वास्तवीक जिवाचें तारण आहे असें त्यांस वृध्धावस्थेंत सत्याचा शोध करण्याअंतीं आढळलें असावें असें आह्मांस वाटलें होतें आणि तसें असतें तर ती एक अती महत्वाची गोष्ट झाली असती. पण गोविंद शास्त्री यांचें ख्रिस्ती होणें व पुढें त्यांनीं ख्रिस्ती शास्त्रावर विश्वास ठेवणें लटपटीत दिसत असल्यावरून ही केवळ थट्टास्पद गोष्ट झाली असें आतां वाटतें.

गोविंद शास्त्री आजारी होते व तो आजार मोठा असल्यावरून त्यांनीं निश्चय केला होता कीं यांतून आपण निभावलों तर चतुर्थाश्रम ह्मणजे सन्यास घेऊं. ईश्वरकृपेनें ते बरे झाले पण त्यांची घरमंडळी त्यांस सन्यास घेऊं देईना त्यामुळें त्यांचें मन अस्थीर झालें व कोणी ह्मणतात त्यांस भ्रम झाला. पुढें ख्रिस्ती लोकांची त्यांची गाठ पडली त्या प्रसंगीं ख्रिस्ती व्हावें असा बूट निघाला व तो त्यांना पसंत झाला व ते ख्रिस्ती झाले. पण ख्रिस्ती लोकांनीं इतक्या उतावळीनें त्यांस दिक्षा कशी दिली तें आह्मांस समजत नाहीं. व त्या गडबडीमुळें त्यांचें काम कच्चें झालें असें दिसतें. इतर ख्रिस्ती होऊं इच्छिणाऱ्या उमेदवारास मिशनरी लोक बरेच दिवस तपासणीखालीं ठेवित असतात व तो कसोटीस उतरल्यांवर त्याचें धर्मांतर करितात. तसें गोविंद शास्त्री यांचें झालें नसावें. कारण ते ख्रिस्ती झाले आहेत तरी अजून हिंदु धर्मांतील वेद व पुराणें यांवर विश्वास ठेवितात, वेदोक्त मार्ग खरा मानितात व भागवतांत कृष्णाचें वर्णन आहे त्यांत कालःधन्वंतरी असें ह्मटलें आहे तोच धन्वंतरी येशु ख्रिस्त कृष्णाचा अवतार आहे असें उघडपणें ह्मणतात व त्यांची त्यावर श्रद्धा आहे. मिशनरी लोकांनीं त्यांचें जुनें धर्मवेड काढून टाकण्याकरितां ख्रिस्त धर्मानुयायी निळकंठ शास्त्री गोटे यांस आणून त्यांकडून लेले शास्त्री यांस बोध करविला पण तो त्यांस ठसला नाहीं व त्यांची हिंदुधर्म ग्रंथावरून श्रध्धा उडाली नाहीं असें कळतें. ही गोष्ट खरी असल्यास लेले शास्त्री यांचें मन भ्रमित असतां शरणपुरच्या ख्रिस्ती लोकांनीं त्यांची शिकार साधिली. ही मोठी चूक केली. कारण वास्तवीकरित्या ख्रिस्ती होण्यास ते अपक्क होते. व असे वयोवृध्ध, ज्ञानवृध्ध मनुष्य अशा प्रकारानें ख्रिस्ती झाल्यास व त्यांनीं ख्रिस्ताचे भागवतानुरूप घोषण केल्यास ख्रिस्ती धर्माच्या मुख्य मुद्याला मोठा बट्टा आहे व तणेंकरून ख्रिस्ती लोकांचा उपहास आहे असें आह्मांस वाटतें.

---

## प्रभातपत्रिका.

आह्मास असें समजलें आहे कीं, गेल्या बुधवारापासून पुण्यास प्रभातपत्रिका या नावाचें मराठी वर्तमानपत्र नित्य निघूं लागलें आहे. हें राजश्री विठ्ठल सखाराम अग्निहोत्री छापखानेवाले ३ महिने पावेतों काढणार असेंही प्रसिद्ध झालें आहे. नित्याचें वर्तमानपत्र, त्यांतून मराठी, तेंही तीनच महिने, आणि काढणार आग्नहोत्रीबावा तेव्हां तें कसें काय निभेल या विषयीं समजत नाहीं. अग्निहोत्री यांचे छापखाने कित्येक वेळा उदयास येऊन लयास गेले आहेत व नित्याचीं मराठी वर्तमानपत्रेंही एक दोन वेळा उदय पाऊन मावळलीं आहेत. ह्मणून जरा भीति वाटते. बाकी मराठी वाचणारांचा वर्ग वाढला आहे व इतर वर्तमानपत्रें पुष्कळ निघतात त्यांत नित्याच्याही एकद्या पत्राची अवश्यकता आहे ह्मणून विठ्ठल सखाराम हे असलें अवश्यक वर्तमानपत्र मोडू न देण्याविषयीं काळजीबाळगतील व वर्तमानपत्रही लोकांच्या आदरास पात्र होईल. भल्या व विद्वान मनुष्याचे हातून काढितील तर त्यांचा देशावर मोठा उपकार होईलसें वर्तमानपत्र चांगलें व स्थीर चालणें याला वर्गणीदारां

चा चांगला उत्तम आश्रय मिळण्याची हों विशेष अपेक्षा आहे. यासाठीं उत्सुक वाचणारे आश्रय दिल्यावाचून राहाणार नाहींत असेंही आह्मी इच्छितों. परंतु तीनच महिने पत्र काढणार असा पुकारा झालेला आहे यामुळें आश्रयाचें काय होईल हें सांगवत नाहीं कारण अशा कामाला मुख्यत्वें शाश्वती पाहिजे.

## वऱ्हाड

हवा गेल्या आठवड्यांत खराब झाली होती तशी आतां नाहीं. ढगें वगैरे फारशीं येत नाहींत तरी ऊन कडक पडतें व रात्रीही लवकर थंडाई होत नाहीं. नदींतलि तेवाळ काढून पाणी स्वच्छ केलें आहे व क्या० बुलक साहेब डिपुटी कमिशनर यांनीं हवेच्या भीतीनें स्वच्छता व नियमितपणा लोकांनीं चांगला ठेवावा ह्मणून जिल्ह्यांत व येथें अगाऊ बंदोबस्त करविला आहे व त्याचें फल ईश्वरी कृपेनें चांगलें होईल असें दिसतें.

असें दुःखकारक वर्तमान आलें आहे कीं, रा. रा. नागोराव जयकृष्ण उमरावतीकडील असिस्टंट काटन कमिशनर हे इंगोली मुक्कामीं फार आजारी होते त्यांस तिकडे देवाज्ञा झाली. हे गृहस्थ तरुण असून मोठ्या हुद्यावर होते. तसेंच दोन वर्षांपूर्वीं त्यांचें कुटुंब निवर्तलें व त्या वेळीं सिंव्हस्थ पर्वणी होती त्यामुळें या प्रान्तीं लग्नें होण्याचा प्रतिबंध होता यामुळें जेथें कोणत्याही महिन्यांत लग्नास प्रतिबंध नाहीं ऱ्सें क्षेत्र व्यंकटेशाची गिरी मद्रास इलाख्यांत आहे. तेथें जाऊन त्यांनीं आपला नुतन विवाह केला तें मात्र अल्पवयी कुटुंब यांच्या दुःखसागरांत गटकळ्या खाईल. यांचे एक बंधु रा. रा. देवराव जयकृष्ण हे दारव्ह्यास तहशिलदार असल्याचें आमचे वाचकांस ठाऊक असेलच. यांचे वडीलही वऱ्हाडांत नोकर होते व त्यांनीं शिरस्तेदारी वगैरे कामें केलीं आहेत. मेजर अलार्डाइस साहेब यांचा नागोरावजींचे वडिलांवर फार लोभ होता व तोच लोभ पुढें त्यांनीं त्यांच्या उभयपुत्रांवर चालविला. अलीकडे काटन कमिशनरीचें खातें कमी करण्याचा ठराव होऊन नागोरावजींस एक्स्ट्रा अ. कमिशनरची जागा देण्याची खटपट चालली होती पण ती अमलांत येण्यापूर्वींच यांचा काल झाला.

जळगावाहून खामगावास गेलेले नायब तहशिलदार रा. मोहनिराज गोविंद यांजविषयीं कांहीं तजवीज चालू आहे असें आह्मी मागील अंकीं लिहिलें होतें त्याबद्दल हल्लीं असें समजतें कीं, त्यांस बरतर्फ करण्याचा ठराव झाला. मोहनिराज यांनीं जळगाव तालुक्यांत भालेराईचीं कामें बहूत केलीं पण तीं प्रसिद्ध करण्यास पाहिजे तितका पुरावा न मिळाल्यामुळें लोकांच्या दृष्टीपुढें आलीं नाहींत तरी जो जो मनुष्य जळगावाकडून जाऊन आला तो तो यांच्या वर्तनाविषयीं वासल्याशिवाय व नाक मुरडल्याशिवाय राहिला नसेल. त्यांची आजवर सद्दी होती ह्मणून त्यांस एकादा कडक तहशिलदार मिळाला नाहीं नाहींपेक्षां मागेंच त्यांची उचलतंगडी झाली असती. बिच्यारे सखाराम बाबा तहशिलदार ह्मणजे कलींतील केवळ धर्मराज त्यांच्या छायेखालीं याची आजवर निभावणी झाली. व पापाचा घडा भरला तेव्हां ही दशा प्राप्त झाली. मोहानिराज हे वऱ्हाडचे वकिलीचे परिक्षेंत पास झालेले आहेत व यांनीं अमलदारीचें कामही कित्येक वर्षें केलेलें आहे असें असतां विष्णु भिकाजीच्या प्रकरणांत यांची जबानी झाली तींत यांनीं सांगितलें होतें कीं विष्णुपंत लोकांपासून लांच घेत असे व एक प्रसंगीं त्यानें कुळापासून कांहीं पैसे घेतलेले आमचे कानावर आले तेव्हां आह्मी त्याकडून ते कुळास परत देवविले. वाः हा माजिस्त्रेट मोठा उत्तम होय. धडधडीत गुन्हा झाल्याचें यांस कळलें असतां हा त्यावर पांघरूण घालतो तेव्हां याचे न्यायनिपूणतेस काय ह्मणावें? आह्मी असेंही ऐकिलें होतें कीं, या गोष्टीबद्दल मोहनिराज यांजवर मुकद्दमा होणार आहे त्याचें पुढें काय झालें तें समजलें नाहीं. असो झाली शिक्षा ही ही पुरे आहे.

मिस्तर क्रिश्चन साहेब यांस दोन महिन्याची रजा मिळाली व कंवलिंग साहेब यांस तीन महिन्याची रजा मिळाली.

क्या. मेंजीस साहेब रजा घेऊन विलायतेस गेले त्या वर्गावर्गींत मि. नवलिस साहेब असिस्टंट कमिशनर यांस फर्स्ट क्लास व मि. थामसन साहेब यांस सेंकड क्लास मिळाला.

विद्याखात्याचे डायरेक्टर डा. सिंक्लर साहेब यांनीं एक महिन्याची रजा मागितली होती. ती त्यांस मिळाली व त्यांचें काम मि. इलियट साहेब ए. इ. हे पाहूं लागले. ते चिखलदऱ्यास आहेत व वार्षिक रिपोर्टाचें काम चालू आहे. डा. सिंक्लर साहेब चिखलदऱ्यासच आजारी आहेत व त्यांस अर्धांगवायु झाला आहे असें ऐकतों. ईश्वर करो आणि ते लवकर बरे होवोत.

रा. सदाशिव नारायण मुंबईकर वकील यांस वऱ्हाडांत सेशन मुकद्दम्याकारितां कायमचे प्रासिक्युटर नेमिलें असें समजतें. सदाशिवराव हे हुशार व सत्वस्थ असून त्यांस हें सरकारी काम मिळालें याजबद्दल आह्मास संतोष वाटतो दर मुकद्दम्यांस फीचा दर १० रुपये होता तो यांजकारितां २० रुपये केला आहे असें समजतें हें ही यांस भूषण होय.

ज्युडिशियल कमिशनरकडील डिपुटी क्लार्क आफ धि कोर्ट रा. कृष्णाजी हरी कोलटकर यांस एक महिन्याची रजा मिळाली.

मि. गोविंदराज अण्णा तहशिलदार यांचा परवांचे दिवशीं विवाह मोठ्या थाटानें झाला.

मि. मेन साहेब असिस्टंट कमिशनर यवतमाळ हे विलायतेस जाण्याकरितां दोन वर्षांची रजा घेऊन सोमवारीं इकडून मुंबईकडे गेले.

एथील हायस्कुलाचे हेडमास्तर मि. एटकिन साहेब यांनीं आपले असिस्टंट मास्तर, पहिल्या वर्गांतलि मुलें आणि बोर्डिंगांतील मुलें यांस गेल्या सोमवारीं एक थाटाची मेजवानी दिली. मागेंही एकवेळ अशा मासल्याची मेजवानी या साहेबांनीं दिली होती असें समजतें. एटकिन साहेबांमध्यें या गोष्टीवरून हल्लीं हें अपूर्व प्रेम उत्पन्न झालें आहे असें दिसतें, तथापि हें चांगलें आहे व तें वर्धमान व्हावें असें आह्मी इच्छितों. पहिल्या वर्गाखेरीज जे मुलगे ते एटकिन साहेबांचेच विद्यार्थी होत व त्यांस ही पहिल्या वर्गाप्रमाणें साखरभात, श्रीखंडपुरी त्यांनीं दिली असती तर तेही एटकिन साहेबांचे प्रेम विशेष आठवते, असो. पुढें तरी असा पंक्तीप्रपंच न व्हावा असें आह्मी इच्छितों.

अकोल्यास डिस्ट्रिक्ट रेलवेचे रेसिडेन्ट इन्जिनियर यांचें आफिस कित्येक वर्षें पासून आहे तें जुलई महिनाअखेर बंद होणार असें समजतें. बऱ्या मोठ मोठ्या पगाराच्या सहा मनुष्यांस 'तुमचे नौकरीची गरज नाहीं' अशा नोटिसा मिळाल्या. रेलवे हें मोठें मायपोट आहे आणि तिजमध्यें विचारे या लोकांस लहान मोठ्या जागा देवविण्याची तजवीज केली असती तर न होती असें नाहीं पण इतकी कळकळ करतो कोण? त्या आफिसाचे हेडक्लार्क मि. कार्बेट साहेब २९० रुपये पगारवाले यांस मात्र राखून ठेविलें आहे. ठीकच आहे?

एप्रिलच्या १७ वे तारखेस संपणाऱ्या आठवड्यांत वऱ्हाड व मध्य प्रांतांतून कापूस रवाना झाला तो:—

| | फु. गठ्ठे |
|---|---|
| हिंघणघाट | ११२ |
| वर्धा | १२६ |
| उमरावती | २६५९ |
| मुर्तिजापूर | १०० |
| शिगाव | २९७६ |
| खामगाव | ३२७१ |
| नर्मदा व्ह्याली | ३८५ |

## वर्तमानसार

नाशकास माहामारीचा अजार बराच चालू आहे असें दिसतें. १८ दिवसांत २०० मनुष्यें मेलीं असें समजतें.

मि. शांताराम नारायण वकील निसबत हाय कोर्ट यांनीं मुंबई ग्याझेट पत्राचे कर्ते मि. मेक्लीन यांवर अब्रूची फिर्याद केली होती तो कज्जा २ वेळ कोर्टांत आल्यावर आपसांत मिटला. मि. मेक्लीन यांनां ता० १२ रोजीं आपल्या पत्रांत असें छापलें होतें कीं, आह्मी मि. शांताराम नारायण यांच्याविषयीं जें लिहिलें होतें तें असत्य व निराधार होतें यावरून हा वाद शांत झाला. प्रतिवादी हे लौकर उमजून शुद्धीवर आले हें फार चांगलें झालें.

मि० सेज्जविक नामें एक साहेब शिकारीस गेला असतां एका वाघानें त्यास हुंडारून फार घायाळ केलें. पुढें दोन तीन दिवसांनीं तो मरण पावला.

मुंबई एथील ब्रिगेडियर जनरल जलब हे विलायतेस जाणार व त्यांच्या जागेवर क० फेर यांची नेमणूक होणार, असें ऐकतों.

मद्रासेकडून कांहीं पलटणी ब्रह्मदेशाकडे रवाना झाल्या.

अहमदनगर येथील तोफखान्याकडे सरकारची अशी तार आली आहे कीं, लष्करी लोकांची तयारी ठेवावी व सुचना झाल्या बरोबर बडोद्याकडे, लष्कर रवाना करावें काय कारणा करितां नकळे!!

जयपुरचे महाराज बडोदे कमिशनचा निकाल झाल्या नंतर एथून जयपुरास गेले त्यावेळीं अग्र्याहून जयपुरासथेट रेलवेगाडी आहे तथापि ते रेलवेतून न जातां टपालच्या गाडींत बसून जयपुरास गेले. असें करण्याचें कारण दिल्ली ग्याझेट पत्रांत असें लिहिलें आहे कीं बडोद्यास यावयाकरितां ज्या वेळीं जयपूरचे महाराजांची स्वारी जयपूरचे स्टेशनावर आगगाडींत बसावयास गेली होती त्यावेळीं स्टेशनावरील एका पोलिस कामदारानें महाराजांचा कांहीं अपमान केला. पोलिसचे लोकांचे उद्धट वर्तणुकेचीं उदाहरणें नेहमीं घडून येत असतां सरकार त्याकडे दुर्लक्ष करितें हें मोठें नवल आहे!!! डा. च.

युरोपियन लोकांचा अंध जात्याभिमान—त्रावणकोरमध्यें मि० व्हैट या युरोपियनानें एका नेटिवास ठार मारलें त्याबद्दल तेथील रेसिडेंट मि० बालर्ड चौकशी करीत आहेत. कैदी तर्फे मि० जे. एच प्रिन्स मद्रास हाय कोर्टाचे आडवोकेट हे वकील आहेत. कैदीस त्रावणकोरमधील युरोपियन रहवासी व काफी प्लांटर्स यांनीं द्रव्यसाह्य केलें आहे आणि पुष्कळ दुसरे नवीन मित्र पुढें येऊन त्यांनीं वर्गणीचा धडाका लावून दिला आहे असें कोचीन्स आर्गसपत्रावरून समजतें. खुनासारखा मोठा गुन्हा केला असतां ख्रिस्ती व सुधारलेले युरोपियन गुन्हेगारास शासन होऊं नये ह्मणून प्रयत्न व मदत करतात. ही पवित्र व निष्कलंक न्यायबुद्धि ! ! !

त्रिचनापल्ली येथें तारिख ५ रोजीं सोजर व शिपाई यांचा तंटा झाला. ८९ व्या गोऱ्या पलटणीचे दोघे सोजर व एक कारपोरल जात असतां वाटेंत पुलाजवळ त्यांची ३२ व्या काळ्या पलटणीची गाठ पडली सोजरांनीं त्या शिपायास कांहीं विचारलें परंतु त्याला त्यांची समजूत करून देतां येईना हें पाहून एका सोजरानें त्यास सपाटून मारलें आणि सर्व पळून जाऊं लागले- इतक्यांत दुसऱ्या शिपायांनीं हें पाहून त्यांच्या पाठीमागें धावून एकास धरून खूप ठोकलें आणि पहाऱ्यांत आणून ठेविलें- मुख्य मारणारा पळून गेला. या सोजिरांची आतां चौकशी व्हावयाची आहे असें सीध इंडिया टैम्सवरून समजतें.

## रा. रा. रामकृष्ण गोपाळ यांचें प्रार्थना समाजांतील भाषण.

भारतामध्यें यक्षानें युधिष्ठिरास कांहीं

प्रश्न केले असें लिहिलें आहे. त्यापैकीं मोठें आश्चर्य कोणतें ? मार्ग कोणता ? वार्ता कोणती ? असे तीन प्रश्न आहेत. त्यांचीं उत्तरें युधिष्ठिरानें दिलीं तीं हीं — "प्रत्यहीं अनेक प्राणी यमसदनाप्रत जातात, परंतु बाकी जे रहातात ते आपला प्रपंच स्थिर चालावा ह्याच चिंतनेमध्यें असतात ह्मणजे परमार्थाकडे त्यांचें लक्ष्य जात नाहीं; ह्यापेक्षां दुसरें आश्चर्य कोणतें? तर्क पोकळ, वेदवाक्यामध्यें परस्पर विरोध, असा कोणी ऋषि नाहीं कीं, त्याचेंच मत सर्वांशीं प्रमाण, धर्माचें तत्व फार गूढ (किंवा अंतःकरणरूप गुहेमध्यें वसतें ) ह्मणून यावत् जनसमूहाची ज्याचे ठायीं साहजिक प्रवृत्ति होते हा मार्ग. अज्ञानरूप कढईच्या खालीं सूर्यरूप अग्नि प्रज्वलित करून, दिवसरात्रीरूप सर्पण घालून, मासर्तुरूप पळीनें ढवळून, सर्व भूतांस काळ शिजवीत आहे ही मुख्य वार्ता, हि एका प्रकारची वार्ता. दुसरी अद्भुत वार्ता एका इंग्रजी ग्रंथकारानें अशी लिहून ठेविली आहे कीं, कोट्यावधि मनुष्यासारखे प्राणी, कीं, ज्यांच्या अंगीं शाश्वत आनंद शांति, परम शुद्धि इत्यादि अनेक प्रकारचें दिव्य ऐश्वर्य प्राप्त करून घेण्याची योग्यता जगन्नियंत्यानें ठेविली आहे. असे कामक्रोधादिकांनीं पीडित होत्साते, क्षुद्र व्यवहारामध्यें सदा सर्वदा निमग्न होऊन अघोर व नीच अशीं कर्में करून अरण्यांतील पशूंपेक्षांही अधम स्थितीस येऊन पोंचले आहेत. ह्याच्यापेक्षां दुसरी अद्भुत वार्ता कोणती ? एखादा राजा ऐश्वर्यसंपन्न असून, किंवा एखादा राजपुत्र मोठ्या विस्तीर्ण राज्याचा वारस असून अति दीन अवस्थेस जाऊन पोंचला, अशा प्रकारच्या ज्या अद्भुत कथा एखाद्या मनोरंजक गोष्टींच्या पुस्तकांत असतात त्यांचेपेक्षां अद्भुत ही कथा. मनुष्य हा ऐहिक राज्यापेक्षांही मोठे अशा शाश्वत सुखाच्या पदाचा वारस असून अशा नीच व अधम दशेस येऊन मिळाला आहे. तर आह्मा सर्वांची अशी स्थिति आहे. ह्या स्थितींतून मुक्त होऊन आह्मास नेमून ठेविलेलें जे पद, जें आमचें वतन तें आह्मास कसें प्राप्त होईल ? तर त्यास एकच उपाय आहे अन्य नाहीं, एका उपनिषदांत ह्मटलें आहे:—

यदा चर्मवदाकाशं वेस्टयिष्यंन्ति मानवाः।
तदा देवमविज्ञाय दुःखस्यान्तो भविष्यति।

"कातड्याची जशी गुंडाळी करितात तशी जेव्हां मानव आकाशाची करतील तेव्हां देवास न जाणतां त्यांत दुःखाचा अंत ह्मणजे शाश्वत सुखाची प्राप्ति होईल" आकाशाचें गुंडाळें करणें हें जसें अशक्य तसेंच ईश्वराची आराधना केल्याशिवाय अन्य उपायानें मोक्षप्राप्ति करून घेणें हें अशक्य. ह्मणजे ईश्वराचें ज्ञान, त्याची ओळख, त्याचा परिचय, त्याची भक्ति ह्याच एक मोक्षाचा मार्ग. भगवद्गीतेंतही तसेंच सांगितलें आहे.

तमेव शरणं यच्छ सर्वभावेन भारत ।
तत्प्रसादात्परां शान्तिं स्थानं प्राप्स्यासि शाश्वतम् ॥

"हे भरतकुलोत्पन्ना, त्यालाच ( पूर्व श्लोकांत सांगितलेल्या ईश्वरास ) सर्व भावानें शरण जा, त्याच्या प्रसादानें तुला परम शान्ति आणि शाश्वतपद प्राप्त होईल." आणि विच्यार केला असतां हें खरें आहे असें आमच्या प्रत्ययास येईल. मनुष्याची उन्नति मुख्यत्वेंकरून तीन प्रकारची आहे. एक उत्तरोत्तर शाश्वत, अनादि, अनंत, सर्वव्यापी, सर्वत्रगूढ, सर्वज्ञाता, परम पवित्र, शुद्ध, आनंदमय, परम सुंदर, अगाध ज्याचा महिमा, अचिन्त्य ज्याची लीला, अशी अनेक गुणसंपन्न परमेश्वराचें असें जें हें स्वरूप त्याचा अधिकाधिक अंतःकरणाच्या ठायीं अनुभव व्हावा आणि त्यापासून आपली वृति उन्नत व विकसित होऊन ब्रह्मानंदाची अधिकाधिक प्राप्ति व्हावी. तर ह्या प्रकारचा अनुभव व ही प्राप्ति अल्पबुद्धि मानवास स्वयत्नानें व्हावयाची नाहीं. ईश्वराविषयीं ध्यान करूं लागला तर मन त्याच्या ठायीं स्थिर न होतां अन्य विषयांकडे धांवतें, परंतु अशा अस्थिरतेविषयीं खेद होऊन आतां दुसरा कांहीं उपाय नाहीं असें मनांत आणून अनन्यभावें परमेश्वरास शरण गेला ह्मणजे तें आनंदमय स्वरूप त्याच्या अंतःकरणांत उदय पावूं लागतें. आतां दुसरा प्रकार, उत्तरोत्तर दुःखापासून विमुक्त होणें हा. दुःखप्रसंग मुळींच आपणावर येऊं नयेत ही दुःखविमुक्ति नव्हे. तर आले असतां अंतःकरण डगमगूं नेय, त्याच्या ठायीं शांति एकसारिखी राहावी अशी स्थिति ईश्वराच्या कृपेशिवाय प्राप्त होणार नाहीं. भापण मानव कठिण प्रसंग आला ह्मणजे अतिशय घाबरून जातो; दुःखामुळें दीनवाणे, विलाप करितो; आपणास औदासीन्य प्राप्त होतें, सुख कोठेंच नाहीं, शांति नाहीं अशी आमची दशा होते परंतु परमेश्वराचा ज्याणें परिचय केला आहे त्यास त्याचें त्या प्रसंगीं स्मरण झालें, आपल्या मायबापाचें तें शांत, वत्सल, दयाळू स्वरूप अंतःकरणापुढें उभें राहिलें, परमेश्वर करील तें माझ्या कल्याणार्थच करील असा पूर्ण भरंवसा असला ह्मणजे दुःखाचा निरास होऊन शांति आपणास प्राप्त होते. सदासर्वकाळ तें स्वरूप अंतःकरणांत जो वागवितो त्याला दुःखाची बाधा नाहीं. तिसरा प्रकार; उत्तरोत्तर कामक्रोधादिक रिपूंचा निग्रह होऊन पापमलाचें क्षालन होऊन अंतःकरणशुद्धि प्राप्त होणें हा. पाप मोठें दुर्जय आहे. कामक्रोधादि मनोधर्म यांचें बळ फार मोठें. विवेक अति दुर्बळ. ह्मणूनच मनुष्याची अशी पशुवत दशा झाली आहे. कितीही कामाचें, क्रोधाचें, आवरण करीन असा निश्चय केला तथापि तो व्यर्थ जातो. पुनरपि विषय प्राप्त झाले ह्मणजे आह्मी त्यांच्या पाशांत पडतों आणि पापाचे ढीग अंतःकरणावर वाहतों. आणि येणेंकरून ईश्वरापासून उत्तरोत्तर दूर दूर होतों. त्याच्या इच्छेविरूद्ध वागणें याचें नांव पाप आणि त्याच्या इच्छेस अनुकूल असें आचरण करणें याचें नाव पुण्य. तर ही स्थिति आह्मास कशी प्राप्त होईल? पापाचा खरा अनुताप झाला, "पुण्य मार्गानें वागणें आह्मा मानवांस अशक्य, आतां काय करावें?" अशा रीतीनें स्वसामर्थ्याविषयींचा अभिमान गळून गेला आणि वृत्ती विनम्र करून सर्व समर्थ मायबापास खऱ्या भावानें शरण गेला ह्मणजे उत्तरोत्तर दुष्ट मनोवृत्तींचें बळ मोडून मायबापाच्या इच्छेनुरूप वागण्याचें सामर्थ्य येऊं लागतें. तर तें शाश्वत पद प्राप्त करून घेण्याचा, तें आमचें वतन परत मिळविण्याचा उपाय एकच. परमेश्वराची भक्ती. आणि हा मार्ग "महाजनो येन गतः स पन्थाः" अशा प्रकारचा आहे. फार प्राचीन काळापासून तों आजपर्यंत सर्व देशामध्यें एकसारखी मनुष्याच्या अंतःकरणाची प्रवृत्ती याजकडे आहे. मनुष्याचा स्वभावच तसा आहे. कितीही कांहीं काळपर्यंत नास्तिक मतांचा प्रसार झाला तथापि अंतीं ह्याचा जय होतोच. आमच्याच देशामध्यें नास्तिक बौद्ध व जैन झाले, अद्वैत वेदांती झाले, निरीश्वर सांख्य झाले कर्मठ मीमांसक झाले परंतु लोकांच्या मनाची प्रवृत्ती, मनाचा भार जगदीश्वराच्या ठायीं, मिळून ते सर्व एकीकडेस राहून भक्तिमार्गच शेवटीं प्रबल झाला आणि केवळ वैदिक जीं कर्में त्यांच्या ठायींसुद्धां त्याचा प्रवेश होऊं लागला. परंतु मनुष्याच्या ठायीं चर्मचक्षूचें बळ मोठें, विषय सुखें फार मोहक, ह्मणून कांहीं काळानें हा मार्ग राहावा तसा राहात नाहीं, त्याच्या ठायीं अन्य गोष्टींचें संमेलन होतें आणि ईश्वरभक्ति मनुष्याच्या अंतःकरणांत जागृत असावी तशी असत नाहीं. आणि मुख्य जो प्रवर्तक तो होऊन गेल्या नंतर कांहीं काळानें त्याचा पंथ बाह्य आचारावर येऊन बसतो. ह्याप्रमाणें धर्मबुद्धीची, खऱ्या भक्तिभावाची कांहीं काळानें ग्लानी होते. सांप्रतच्या काळीं अशा प्रकारची धर्मास ग्लानी आली आहे. फारकरून निजून उठल्यापासून तों पुनः निजेपर्यंत मनुष्यास काय तीं एक प्रपंचाची चिंता दुसरी गोष्ट मनांतच येत नाहीं. परमार्थाकडे लक्ष वळतच नाहीं. आणि संध्यावंदनादि धर्माचरण जें आहे त्याचा तर अंतःकरणावर कांहींच परिणाम होत नाहीं. तोंडावाटे अर्थ समजत नाहीं असे शब्द बोलून केवळ कांहीं एक प्रकारचे बाह्य संस्कार करण्याच्या समयींही मोठमोठीं पापें करण्याचे बेत मनुष्य करीत असतो. आणि ज्या ज्या ठिकाणीं भक्तिमार्गाची प्रवृत्ति आहे त्या त्या ठिकाणीं अन्य गोष्टींचें फार संमिश्रण आहे, ह्मणून शुद्ध भक्तीचा अभावच आहे. काष्टपाषाणादिकांचे देव कल्पून त्यांचेंच ध्यान केलें असतां काष्टपाषाणमय अंतःकरण होऊन अनंताचें आकलन करणें हें जें आपणास मुख्य साध्य तें एकिकडेसच राहतें परमेश्वराच्या अनेक उत्तम कल्याण गुणांचें ज्ञान नसल्यामुळें त्याच्याशीं आपला खरा संबंध कोणता हें समजत नसल्यामुळें, भक्तिमार्गापासून व्हावी तशी उन्नती होत नाहीं. मनास शुद्धि प्राप्त होत नाहीं. वृत्ति विकसित होत नाहीं. ह्याप्रमाणें सांप्रत खऱ्या धर्माची ग्लानि आहे. परंतु अशी स्थिति झाली ह्मणजे जगदीश्वरच धर्माचें पुनरुज्जीवन करितो. भक्तिभावांचें प्राबल्य लोकांमध्यें कमी झालें ह्मणजे कांहीं काळानें मनुष्यांचीं मनें पुनरपि परमेश्वराकडेस मोठ्या जोरानें धावतात आणि पुनः खऱ्या धर्माचा प्रसार होतो. तो प्रसंग, तो सुदीन आतां आला आहे. ब्राह्मधर्माचा उदय होत आहे. परमेश्वराचा आणि मानवांचा जो वियोग झाला आहे तो नाहींसा करून समागम करविणें हें त्या धर्माचें मुख्य काम. भक्ति, भाव, शुद्ध व जागृत स्थितीमध्यें सध्या त्या धर्मांत आहे. तर त्याच्याकडे दृष्टि लावणें, त्याचा विचार करून त्याचें अवलम्बन करणें हें सर्वांस उचित आहे. आणि विशेषेकरून ज्या तरुण सुशिक्षित गृहस्थांची मनें नास्तिक मताकडे वळताहेत त्यांत माझी अशी विनवणी आहे कीं, इंग्लंडांतील आलीकडील जो नास्तिकशिरोमणी त्याचा जो हल्लीं ग्रंथ छापला आहे त्यांत तो ह्मणतो कीं, ईश्वर नाहीं, परलोक नाहीं, असें ह्मणण्यास कांहीं प्रमाण नाहीं. ही गोष्ट त्यासारख्या मनुष्यानें, ह्मणजे ज्याच्या ठायीं धर्मबुद्धीचा लेश नाहीं, केवळ बाह्यविषयाकार ज्याची बुद्धि अशानें कबूल केली आहे. तर मग ईश्वरानें तुमच्या अंतःकरणांत आपल्या अनाद्यनंत, सर्व समर्थ अतिगुह्य स्वरूपाविषयीं जी पुज्यत्व बुद्धि ठेविली होती तिचा कांहीं लेश जर उरला असेल तर फुकट त्या वादामध्यें आपलीं मनें घालून आपल्या अंतःकरणाची स्वाभाविक जो मोठी योग्यता ती व्यर्थ घालवूं नका.

सु. प.

---

## जाहिरात.

सरकारी मराठी शाळांतील विद्यार्थ्यां करितां हिंदुस्थानवर्णनसार व कवितार्थमाला हीं दोन फारच उपयुक्त पुस्तकें छापून तयार आहेत. प्रत्येकाची किंमत ०१०६ दीड आणा; शिवाय टपाल खर्च. खालीं सही करणाराकडे मिळतील.
ता० १७ माहे एप्रिल
सन १८७५ इसवी.

श्रीधर बाळकृष्ण आपटे क्लार्क
एग्झिक्युटिव एंजिनियरचें आफिस
उमरावती.

---

## धर्मसिंधु.

( प्राकृतभाषांतरसहित. )

**विक्रीस तयार.**

धर्मजिज्ञासु लोकांस कळविण्यांत येतें कीं, हा ग्रंथ ज्या कोणास घेणें असेल त्यानीं खालीं सही करणासंच्या नांवें मुंबईमध्यें काळकादेवीच्या रस्त्यावर निर्णयसागर छापखान्यांत किं० रु० ६. ट० हां० १२ आणे पाठविले असतां त्वरित पुस्तक रवाना केलें जाईल. टिकिटा पाठविणें झाल्यास वर्तावळ्यासुद्धां पाठवाव्या. नाटपेड पत्र घेतलें जाणार नाहीं. तारीख ९ एप्रिल सन १८७५ इसवी.

( सही ) जावजी दादाजी

---

हें पत्र अकोलें एथें खंडेराव बाळाजी फडके यांचे वऱ्हाडसमाचार छा. छा. ०